साप्ताहिक

# माणूस

२२ ऑक्टोबर १९६६
चालीस पैसे

श्री. अटलबिहारी
बाजपेयी

## ते शौर्य हवे मज
## हृदय हवे मज




# ते शौर्य हवे मज।
# हृदय हवे मज।

श्री. अटलबिहारी वाजपेयी

हृदय हवे मज,
संकटात जे कधी न अडे,
भयभाराने कधी न गडबडे
स्वतःस जाळुनि ज्वाला होऊनी
अनेक हृदयी वन्ही चेतवी
मोहमूढ अंधार उजळवी
खदिरांगासम उठे भडकुनी
रोम रंध्री क्रांतीची ज्वाला उठे धडकुनी
ते शौर्य हवे मज
हृदय हवे मज.

हृदय हवे मज
दीर्घ दास्य दुष्प्रभाव धूमी
जे न झाकले–हृदय हवे मज
भूक शमवी जे मानव्याची
अमर तत्त्वयुत हृदय हवे मज
गळे अहंता, उरे नम्रता
मरणाला ये जिथे अमरता
हृदय हवे मज
नित्य कार्यरत दलितोद्धरणी
हृदय हवे मज
जीव जडवी जे बंधु बंधनी
हृदय हवे मज
शांत सागरा उधाण आणी
हृदय हवे मज
अनेक हृदया एक करी जे
हृदय हवे मज......







एक समग्र साप्ताहिक

वर्ष – सहावे
अंक : सोळावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**

अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्र-मैत्री

**स. न.**

मी आपल्या 'माणूस'चा 'नाझी-भस्मासुराचा उदयास्त' चालू झाल्यानंतरच्या तिसऱ्या अंकापासूनचा ग्राहक-वाचक आहे. प्रसिद्ध होणाऱ्या पत्र मैत्रीतील पत्रापासून जवळ जवळ सर्वच साहित्य सुंदर, निवडक, वाचनीय आणि संग्राह्य असते. जवळ जवळ म्हणण्याचे कारण राशी भविष्य हे सवंग लोकप्रियतेचे सदर नसते तर बरे झाले असते. फक्त भारतापुरता विचार केला आणि ४० कोटी लोकसंख्या सरासरीने बारा राशीमध्ये विभागली तर ३३,३३,३३३,३ लोकांचे भविष्य सारखे असेल असे मानणे चूक आहे. आवर्जून उल्लेख केला पाहिजे, तो श्री. अरुण साधू आणि श्री. सुधाकर राजे यांच्या साहित्याचा. 'मुक्ताफळे'ही छान असतात.

— **रामचंद्र गणेश काळे**, ठाणे

**स. न.**

आपला 'माणूस' हा खानावळीतल्या आठ दिवसांनी होणाऱ्या फीस्टसारखा वाटतो पाहा! आठ दिवस इतर नियतकालिकं वाचावीत व रविवारी 'माणूस'-वर तुटून पडावं! पण मिष्टान्नाच्या जेवणात 'व्यंजनं' नसली की जेवण जसं आळणी वाटतं ना तसंच १–१० च्या अंकाचं झालं! आमच्या वाचनाची सुरुवात उर्दू लिपीसारखीमागून पुढं! अगोदर 'स्वस्तिक चप्पल्स', नंतर नाट्य, सिने परीक्षण व नंतर इतर! पण ह्या वेळी कशाचंच परीक्षण नसल्यानं चुकल्या-चुकल्यासारखं झालं! बाकी 'मुक्ताफळे', 'मितीच्या तुकड्या', 'लाल रक्षक', ह्यांची मट्टी मात्र चांगली लागली.

— **व्यंकटेश अंबादास लिगदे**, नांदेड

# श्री. अटलबिहारी

प्रखर देशभक्ती ही सर्वच तरुण संघ–जनसंघ कार्यकर्त्यांची प्रमुख भावना. खासदार अटलबिहारी बाजपेयीही याला अपवाद नाहीत. हे 'हृदयाला हृदय जोडण्याचे' सतीचे वाण त्यांनी वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच स्वीकारले आणि आपली सारी भावशक्ती राष्ट्रोत्थानाच्या या पवित्र कार्यासाठी समर्पित केली.

ग्वाल्हेर येथे २५ डिसेंबर १९२६ या दिवशी एका मध्यमवर्गीय कुटुंबात अटलजींचा जन्म झाला. १९४५ साली ग्वाल्हेरच्याच व्हिक्टोरिया कॉलेजातून बी. ए. ची पदवी घेऊन पुढील शिक्षणासाठी कानपूरच्या लॉ कॉलेजमध्ये ते दाखल झाले. गमतीची गोष्ट ही, की ह्या लॉ कॉलेजमध्ये, त्यांच्याच वर्गात त्यांचे वडील आणि थोरले भाऊही शिकत होते. पिता-पुत्रांचे हे त्रिकुट सर्वांच्या थट्टाविनोदाचा विषय बनले होते. एखादे दिवशी अटलजी कॉलेजमध्ये आले नाहीत म्हणजे प्राध्यापक वडिलांनाच विचारीत "क्यों ? आपके नंबर दो चिरंजीव नहीं आये ?"

पण अटलजींचा ओढा वकिलीपेक्षा राजकारणाकडे अधिक होता. त्यांनी वकिलीचे शिक्षण अर्धवट सोडून एम्. ए. कडे मोर्चा वळवला व १९४७ साली राज्यशास्त्र विषय घेऊन पहिल्या वर्गात ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले.

येथे त्यांचे व्यक्तिगत जीवन संपले. संघाचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून त्यांनी पुढची ३-४ वर्षे देशकार्य केले आणि १९५० साली अखिल भारतीय जनसंघाची स्थापना होताच हिरीरीने पक्षसंघटनेच्या कार्याला त्यांनी आरंभ केला. सुरुवातीचा काही काळ ते डॉ. श्यामाप्रसादांचे वैयक्तिक चिटणीस होते. १९५३ मध्ये जनसंघाच्या चिटणीसपदावर त्यांची नियुक्ती झाली.

वेळोवेळी त्यांनी पत्रसृष्टीतील जबाबदाऱ्याही उचलल्या आहेत. १९४८-४९ मध्ये ते लखनौ येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'राष्ट्रधर्म' या मासिकाचे संपादक होते. १९४९-५० मध्ये लखनौच्याच 'पाञ्चजन्य' साप्ताहिकाचे संपादन आणि त्यानंतर १९५२-५३ मध्ये दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'वीर अर्जुन'ची संपादकीय सूत्रे अटलजींकडे होती.


१९५७ मध्ये उत्तर प्रदेशातील बलरामपूर मतदार संघातून अटलजी ज्या वेळी लोकसभेत निवडून आले, तेव्हा त्यांचे वय अवघे तीस वर्षांचे होते. सुरुवातीपासूनच लोकसभेतील त्यांची भाषणे गाजू लागली. उदयोन्मुख विरोधी पक्षनेता म्हणून त्यांना विदेशभेटीची निमंत्रणे येऊ लागली. आतापावेतो अमेरिका, युरोप, ब्रिटन, आशिया-अफ्रिकेतील काही देश यांना त्यांनी भेटी

दिलेल्या आहेत. सध्या ते कॅनडात आहेत.

पुणे शहरातील नागरिकांच्या वतीने लवकरच अटलजींचा एक सत्कार समारंभ होणार आहे. यानिमित्त त्यांना एक निधी अर्पण करण्याचे ठरले आहे. मागे सांगलीच्या नागरिकांच्या वतीने त्यांचा असा 'निधियुक्त सत्कार' झाला होता. पुण्याचा दुसरा क्रमांक लागत आहे.तिसरा क्रमांक कोणत्या शहराचा लागतो हे पाहायचे. कारण निवडणुका जवळ आल्या आहेत. पैशाशिवाय यापुढे पान हलणार नाही— जरी जनसंघ कार्यकर्त्यांची प्रामाणिक देशसेवा गृहीत धरली तरी. हा पैसा अशा सत्कार समारंभातूनच, लहान लहान देणग्यांच्या रूपाने गोळा होणार. स्वतंत्र-जनसंघ युतीचे नगारे वाजत असले तरी आज जनसंघ हा बड्या भांडवलदारांचा पक्ष नाही. पक्षाची मुख्य शक्ती पांढरपेशा-वर्ग, लहान व्यापारी, छोटा शेतकरी यांतच समावली आहे. समाजातील हे वर्ग तितकेसे लढाऊवृत्तीचे नसल्याने जनसंघाची ताकद संघटनेच्या मानाने कमी भासते हे खरे आहे. एक शासन-कुशल व सुसंघटित पक्ष एवढीच जनसंघाची प्रतिमा आज जनतेसमोर उभी आहे. एवढ्याच पुण्याईवर 'पर्यायी' पक्ष म्हणून यश मिळणे, काँग्रेसला पदच्युत करणे कठीण दिसते. समाजातील सर्व थरांना आकर्षित करील असा लढाऊ कार्यक्रम पक्षनेत्यांनी जनतेसमोर मांडणे आज आवश्यक आहे. ही उणीव दूर झाली तर जनसंघाला काळ अनुकूल आहे— इतर विरोधीपक्ष संघटनेच्या बाजूने दुबळे आहेत, काँग्रेसबद्दलची जनतेची चीड, संताप, अप्रीयता वाढणारच आहे, मनापासून कोणालाच कम्युनिझम नको आहे. सुसंघटित, राष्ट्रवादी पक्ष ही जनसंघाची आजची स्थिती आहे. राष्ट्रवाद ही तर किमान गरजच आहे. पण एवढ्यानेच यापुढे भागणार नाही— देशात समाजवादी क्रांतीचे युग आणणारा पक्ष व नेता हवा आहे. हा समाजवाद कसा आणायचा, इंग्लंड–जर्मनीचे आदर्श यासाठी शिकायला हवेत, की स्वतःचा भारतीय पर्याय शोधला पाहिजे हे तपशीलाचे मुद्दे आहेत. पण समाजवाद-विरोधी अकरणात्मक भूमिका घेऊन चालणार नाही.

कित्येकदा समाजवादाला जनसंघाचा असणारा विरोध केवळ हा वाद 'परकीय' आहे या समजुतीतूनच उद्भवलेला दिसतो. या दृष्टीतूनच पाहायचे तर 'राष्ट्रवाद' हाही 'परकीय' च मानला पाहिजे. औद्योगिक क्रांतीनंतरचा हा विचार तिकडूनच इकडे आला व औद्योगिक क्रांतीच्या वेगाबरोबरच तिचा येथे प्रसार झाला. देशाभिमान ही मानवाची सनातन प्रवृत्ती आहे, राष्ट्रवाद ही आधुनिक कल्पना आहे. ही जर ग्राह्य, तर समाजवाद-त्यातला समतेचा अंश-अग्राह्य हे तर्काशी सुसंगत नाही. जनसंघनेत्यांकडून अटलजींसारख्या राज्यशास्त्र विषयात नैपुण्य संपादन करणाऱ्या विचारवंताकडून याबाबत अधिक मार्गदर्शन होईल अशी अपेक्षा आहे.

●



## □ चिकटपट्टी

जीभ बाहेर काढून वेडावणे, ही गोष्ट प्रत्येकाने लहानपणी केव्हाना केव्हा केलेली असते. सर्व अशक्त व भित्र्या मुलांचे तर हे एकमेव शस्त्र असते. चार गुद्दे देऊन धक्काबुक्की करणे जेव्हा शक्य नसते, जमण्यातले नसते, तेव्हा परमेश्वराने तोंडात लपविलेला जीभ हा शरीराचा भाग शक्य तेवढा तोंडाबाहेर काढून, शत्रूला खिजविणे हा उपाय सवंग रीतीने उपयोगात आणला जातो. हळूहळू अशा या खिजवण्यात स्वत:चाच श्वास दोनचार सेकंद रोखून धरण्यापलीकडे काहीही तीव्र योग घडत नाही, हे लक्षात येते व ही सवय सुटते. मग एखादे वेळेस मोठेपणी डॉक्टर जेव्हा 'जीभ दाखवा' असे म्हणून बाहेर काढलेली जीभ चमच्याने दाबून धरतात, तेव्हाच फक्त हा योग पुन्हा घडतो.

घाटकोपरच्या धनजी देवजी राष्ट्रीय शाळेतील एका विद्यार्थिनीला अशी वेडावण्याची सवय होती असे कळते. कु. पालन नावाच्या या मुलीचे लालन-पालन करणाऱ्या तिच्या आईवडिलांना, या मुलीने कधी वेडावलेले नसावे म्हणून म्हणा, किंवा कशानेही म्हणा, ही मुलगी वर्गात वारंवार जीभ बाहेर काढीत असे, असे सांगण्यात आलेले आहे. एके दिवशी शाळेच्या बाई चिडल्या व ही सवय जावी म्हणून, त्यांनी त्या मुलीच्या तोंडाला चिकटपट्टी लावली.

शाळेत येणाऱ्या मुलींच्या वाईट सवयी जाण्याकरता शिक्षकांनी काही करण्याची आवश्यकता सध्या नसते, ही गोष्ट या बाई कशा विसरल्या कळत नाही ! पूर्वी शाळेत, एका पायावर तासनतास उभे करणे, मुलाचा तळहात उपडा टेबलावर ठेवून त्यावर वेताच्या छड्या मारणे, शंभर शंभर उठाबशा काढायला लावणे, अशा शिक्षा मास्तर लीलया अंमलात आणीत असत व याविषयी घरी काही बोलण्याची सोय नव्हती. कुणी बोललाच, तर मास्तर बरोबर आहेत हे गृहीत धरून, घरी पुन्हा त्याच पाल्याचे पालक पाल्याला थोबाडीत असत. परंतु हा हिंसक कालखंड आता इतिहासजमा झाला आहे. विद्यार्थीच तूर्त मास्तरांना कधीकधी सौम्य शिक्षा करतात.

शिवाय वेडावणे हा विद्यार्थ्यांचा निषेध व्यक्त करण्याचा अहिंसक मार्ग आहे. रागावून दुसऱ्याची जीभ बाहेर काढण्यापेक्षा, स्वत:चीच जीभ बाहेर काढणे अधिक परिणामकारक नसते काय ? अर्थात जेव्हा बाईंनी एका विद्यार्थिनीला चिकटपट्टी लावली, ही गोष्ट बाहेर फुटली, तेव्हा शाळेच्या सर्व हितचिंतक गुंडांनी शाळेवर

दगडफेक करून त्या मास्तरीणबाईंना धडा शिकवला."

जीभ दाखवण्याचा हक्क प्रस्थापित करण्याकरता विद्यार्थिनींच्या वतीने गुंडांनी जी मदत आपण होऊन दिली, तिला शिक्षणक्षेत्रात तोड नाही. शिक्षणाविषयी समाजाच्या सर्व थरांत आस्था वाढत आहे याचा हा पुरावाच नाही काय ?

परंतु जीभ बाहेर काढून वेडावल्यावर चिकटपट्टीचा उपाय वाचून, वेळी अवेळी ओरडणाऱ्या कोकिळा व कावळे यांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने काही जणांनी चिकटपट्ट्यांची मागणी नोंदवली आहे. यांतील काही पत्रे वाचून पाहण्यासारखी आहेत.

**प्रिय श्री. जॉन्सनसाहेब, व्हाईट हाऊस, वॉशिंग्टन**

अमेरिकेने भारताला जी चौफेर मदत देण्याचा संकल्प सोडला आहे, तिचे उपकार विसरून व्हिएटनाम युद्धाच्या प्रकरणात अमेरिकेने बॉबफेक थांबवावी, असा सल्ला पंतप्रधान गांधी, परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग सतत देत असतात. आलटून पालटून हा सल्ला देण्याची त्यांची घातुक खोड मला बंद पाडावयाची आहे. अमेरिकेला या बाबतीत सतत वेडावणे श्रेयस्कर नाही. यासाठी दोन चिकटपट्ट्या तावडतोब पाठवाव्या.

स्वतंत्र पक्ष पुढील निवडणुकीत यशस्वी झाला की या चिकटपट्ट्यांचे बिल आधी सव्याज देऊ. चिकटपट्ट्या चांगल्या मजबूत व तोंडातून अक्षर येणार नाही, अशा खात्रीच्या असाव्यात.

आपला

**चक्रवर्ती राजगोपालाचारी**, मद्रास

**श्री. कामराज, अध्यक्ष, अ. भा. कॉंग्रेस**

ओरिसाच्या राज्यकारभाराबाबत मी तुम्हांला स्पष्टपणे पूर्वी सर्व लिहिलेच आहे. माझेच मंत्री माझे ऐकत नाहीत. याला मुख्य कारण बिजू पटनाईक यांची त्यांना फूस आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. ज्या ज्या वेळी हा नेहरू कुटुंबाचा एकेकाळचा लाडका विजू, माझ्या मंत्र्यांना भेटतो, तेव्हा तो माझेविषयी त्याचे कान फुंकतो. भुवनेश्वरमध्ये राज्य कुणाचे आहे ? माझे की पटनाईकाचे ? यावर खात्रीचा उपाय म्हणून शिंदीच्या चिकापासून तयार केलेली एक चिकटपट्टी तावडतोब धाडावी. पटनाईकांचे तोंड बंद केल्याखेरीज भुवनेश्वरमध्ये शांती नांदणार नाही.

आपला

**सदाशिव त्रिपाठी**, भुवनेश्वर

यांतील राजगोपालाचारी यांची विनंती आतापर्यंत मान्य झाली असून ही चिकटपट्टी भारतात दाखल झाली आहे. या पट्टीवर अक्षरे आहेत—

"हिंदला धान्य हवे असेल तर क्यूबाशी व्यापार बंद करा. सुज्ञांस अधिक सांगणे न लगे."

—प्रे. जॉन्सन

श्री. कामराज हे जॉन्सन साहेबांइतके त्वरित निर्णय घेणारे नाहीत. त्या अध्यक्षांपेक्षा हे अध्यक्ष अधिक खोल व विचारी आहेत. त्यांनी चिकटपट्टी तयार केली

आहे. परंतु ती सदाशिव त्रिपाठींच्या तोंडावर लावावी की बिजू पटनाईकांच्या लावावी याचा निर्णय अजून त्यांनी केलेला नाही. तूर्त ते फक्त रागावलेले आहेत.

## □ हृदय आणि डोके

परदेशातील पुढारीवर्ग हृदयस्पर्शी उद्‌गार सहसा काढीत नाहीत. परंतु हृदयस्पर्शी उद्‌गार निघाल्याचे वृत्त आपल्या वृत्तपत्रांतून आठवड्या-आठवड्याच्या अंतराने आपणांस वाचावयास मिळते, हे साहजिकच आहे. आपल्या देशातील प्रश्न इतके गुंतागुंतीचे व ते सोडवणारे नेते इतके लोणी-मृदू विष्णुदास की हृदयस्पर्शी उद्‌गार सतत न निघाले तरच नवल. प्रे. जॉन्सन, विल्सन, कोसिजिन, माओ या मंडळींनी कधी हृदयस्पर्शी उद्‌गार काढल्याचे आपण वाचीत नाही. परंतु इंदिराजी, यशवंतराव, कामराज ही मंडळी दौऱ्यावर असली, की स्टेशनास्टेशनाला हृदयस्पर्शी उद्‌गार काढतात. ही त्यांची थोर परंपराच आहे. मागे भारताच्या फाळणीचा प्रश्न निघाला. महात्माजींनी हृदयस्पर्शी उद्‌गार काढले– " Vivisect my body before you Vivisect India – भारताची फाळणी करण्यापूर्वी माझ्या देहाची फाळणी होईल." यापेक्षा फाळणीच्या प्रश्नावर हृदयस्पर्शी काही असू शकेल का ? पुढे फाळणी वगैरे झाली, गांधीजींनीही त्यांचा विरोध अखेर मागे घेतला वगैरे, असल्या फालतू गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करू. परंतु उद्‌गार हृदयस्पर्शी होते की नाही ? आजदेखील हृदय हेलावून टाकणारे उद्‌गार गांधीजींचे वारस काढत असतात. एक जनसंघ व कम्युनिस्ट यांचे म्होरके वगळले तर बाकी विरोधीपक्षांचे नेते हे मूळ गांधीजींचाच वारसा सांगतात. तेव्हा हृदयस्पर्शी उद्‌गार काढणे हे फक्त आजच्या काँग्रेस पुढाऱ्यांनाच साधते असेही नाही.

काही दिवसांपूर्वी डॉ. लोहिया यांनी हृदयस्पर्शी उद्‌गार काढले– "भारतात होणारी आगामी सार्वत्रिक निवडणूक ही बहुधा शेवटचीच ठरेल !" हे उद्‌गार सर्व मतदारांच्या इतके हृदयाला भिडणारे आहे आहेत, की कदाचित मग शेवटच्या पाच वर्षांकरता उगाच पक्षाची बदलाबदल नको, म्हणून मतदार काँग्रेसला निवडून देतील असे वाटते. नाहीतरी निवडणूक शेवटचीच आहे ! इतकी १८–१९ वर्षे ज्यांनी 'सेवा' केली त्यांनाच आता शेवटची पाच वर्षे करू द्या ! कारण माणूस हा स्थितिप्रिय प्राणी आहे. एकच स्टेशन उरल्यानंतर गाडीत कोपरा मिळविण्यासाठी तो सहसा धडपड करीत नाही. म्हणतो बरा उभा आहे तोच. सगळा प्रवास झाला, आता काय एकच स्टेशन उरले.

श्री. यशवंतराव चव्हाण यांनी नागपूरला असाच लोकांच्या हृदयाला हात घातला. ते म्हणाले– "ग्रामीण जनतेलाच काँग्रेसविषयी आस्था आहे. श्रीमंत वर्गाच्या अपेक्षा काँग्रेस पुऱ्या करू शकत नाही व मध्यमवर्ग निराश आहे." यशवंतरावाचे हे उद्‌गार निघायला आणि बडोद्याच्या महाराजांनी गुजराथचे मुख्यमंत्री

होण्यासाठी काँग्रेस तिकिटासाठी अर्ज केल्याची बातमी यायला एक गाठ पडली. हा केवळ योगायोग होय. स. का. पाटलांनी निवडणूक फंडासाठी जे पैसे जमवायला सुरुवात केली असेल ते सर्व पैसे ग्रामीण जनतेतून येणार नाहीत, ही गोष्टही कदाचित् खरी असेल, परंतु लोकांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की काँग्रेस ही निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी रूपे घेऊन आहे. गुजराथमधली काँग्रेस, ओरिसातील-काँग्रेस, पंजाबमधली काँग्रेस, मुंबई काँग्रेस यांवरून महाराष्ट्रातल्या जिल्हा-परिषदांचा कबजा केलेल्या काँग्रेसविषयी तुम्हांला अंदाज करता येणार नाही. यशवंतराव हे मध्यवर्ती मंत्री असले तरी ते नेहमी बोलतात ते महाराष्ट्रातील काँग्रेस-विषयी ! महाराष्ट्रात ग्रामीण जनता आज काँग्रेसवर खूष आहे. ही गोष्ट हृदय-स्पर्शी आहे. ग्रामीण जनता आज महाराष्ट्राचे नेतृत्व करीत आहे. मागे मुख्यमंत्री नाईकांनी धान्याची लेव्ही बसवली. सुरुवातीला धान्याच्या पोत्यांमधून मंत्री फिरताना फोटो प्रसिद्ध झाले. मग ग्रामीण जनतेने हिसका दाखवला. तांदूळ गडप, ज्वारी गडप. नाईकांचे काही चालले? महाराष्ट्रात श्रीमंत वर्ग असा नाहीच. मध्यमवर्गात नोकऱ्या करणाऱ्या लोकांचा भरणा अधिक. शहरात अडकलेला हा वर्ग निवडणुकीत काँग्रेसला एखादी जागा नाकारतो. असे असूनही मध्यमवर्गाला व अस्तित्वात नसलेल्या मराठी श्रीमंत वर्गाला काँग्रेसमध्ये आणण्याचे उपाय यश-वंतरावांनी सुचवले हा केवळ त्यांच्यातील मोठेपणा होय.

काँग्रेसचे काही कल्पित शत्रू गृहीत धरून यशवंतराव बोलतात म्हणून त्यांच्या उद्गारांना हृदयात फार खोल शिरता येत नाही. परंतु एस्. एम्. जोशी यांचे तसे नाही. सानेगुरुजी विद्यापीठात यांचा एक पाय व सत्तेच्या राजकारणात यांचा दुसरा पाय; यामुळे यांची परिस्थिती आजतागायत ओढगस्तीची आहे. त्यांची एक-सष्टी झाली. परंतु राजकारणातले यश असे त्यांना अजून टाळीतच आहे. त्यांनी हृदयस्पर्शी उद्गार काढले. ते म्हणाले, " मी आज बासष्ट वर्षांचा आहे. बळगाव महाराष्ट्रात आलेले पाहिले, की मी सुखाने डोळे मिटीन. " या उद्गारांबरोबरच वेळगावच्या फाळणीची चर्चा सुरू झालेली पाहून या हृदयस्पर्शी उद्गारांना सुंदर पार्श्वभूमीही निर्माण झाली आहे. इतका महान आणि इतका लहान पुढारी तूर्त कुणी असेलसे वाटत नाही. श्री. नानासाहेब गोरे सहसा पुणे सोडीत नाहीत, परन्तु चीनने गिळलेला प्रदेश व पाकिस्तानला काँग्रेसने दान केलेला प्रदेश परत भार-तात आणण्याची इच्छा ते व्यक्त करीत असतात. प्रजासमाजवादी पक्षाच्या निवड-णूक जाहीरनाम्यात याची आग्रहपूर्वक नोंद आहे. परंतु एस्. एम्. जोशी यांची अखे-रची इच्छा मात्र ' बेळगाव कर्नाटकातून महाराष्ट्रात यावे ' एवढीच आहे !

एस्. एम्. जोशी हे त्यागी आहेत. परंतु त्यांनी मोठ्या स्वप्नांचाही आता त्याग केलेला दिसतो. वयाची केवळ साठीच ओलांडलेल्या एस्. एम्. यांनी इतके तूर्त हृदयस्पर्शी बोलू नये. लोकांच्या हृदयाला आणि बुद्धीला फार त्रास होतो. —ग्यानबा ●

# विचारधारे

— समीर

## □ आजचा त्रिविध जपान

पंडित नेहरूंच्या तत्त्वज्ञानावर योजलेल्या परिसंवादात भाग घेण्यासाठी दिल्लीला आलेल्या परदेशी पंडितांत टोकियो विश्वविद्यालयाचे बौद्ध व भारतीय तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक हजीमे नाकामुरा होते. त्यांच्या मते आजचा जपान तीन निरनिराळ्या पातळ्यांवर जगत आहे—औद्योगिक, परंपरागत आणि 'तथाकथित' पाश्चिमात्य. या तीन पातळ्यांचा समन्वय साधणे ही आधुनिक जपानपुढची समस्या आहे. औद्योगीकरणामुळे तादृश बदल घडून आला आहे व काही भौतिक बंधनेही निर्माण झाली आहेत. जोपर्यंत औद्योगिक क्रांतीला जोर होता तोपर्यंत मूलभूत नैतिक मूल्यांचा प्रश्न मागे पडला. क्रांती पूर्ण झाली तेव्हा जपानचे चित्र पार बदलून गेले होते. शहर व खेडे यांतला भेद नष्ट झाला होता व जीवनमानात सर्वत्र एकप्रकारचा एकजिनसीपणा आला. आज प्रत्येक जपानी घरात टेलिव्हिजन व रेडिओ आहे, मग ते घर डोंगरमाथ्यावर असो नाही तर समुद्रकिनारी. अंतरामुळे येणारा एकाकीपणा आता नष्ट झाला आहे.

पण औद्योगिक क्रांतीमुळे भूतलावर स्वर्ग अवतरला असे काही घडले नाही. कारण पश्चिमेकडून ज्याप्रमाणे तंत्रज्ञान आले, त्याचप्रमाणे तेथल्या समाजातली बरीचशी खळबळही जणू उतू जाऊन जपानपर्यंत पोचली. औद्योगिक सुबत्ता झाल्यानंतर जपानने पश्चिमेकडून जी सांस्कृतिक उसनवारी केली, त्यातली पहिली गोष्ट म्हणजे 'बीट्‌निक संगीत.' हे बीट्‌निक संगीत कर्कश तर असतेच, पण सौंदर्यशास्त्राच्या प्रत्येक नियमाला धाब्यावर बसवते. पण मधाच्याभोवती माशा घोंघावतात त्याप्रमाणे या संगीताच्या अनावर आकर्षणाने आजची जपानी मुले झपाटली गेली आहेत. पालकांना हे संगीत भयंकर वाटते व जपानमध्ये पालकांना अजूनही कौटुंबिक अधिकार बराच आहे.

बीट्‌निक संगीताप्रमाणे पाश्चिमात्य संस्कृतीतल्या इतरही बऱ्याच थिल्लर गोष्टींनी जपानमध्ये इतका धुडगूस घातला आहे की "औद्योगीकरणामुळे सरसकट पश्चिमीकरण होणे अपरिहार्य आहे का ?" असा प्रश्न जपानी बुद्धिमंतांना पडला आहे—आणि त्यांचे एकमुखी उत्तर "नाही" असे आहे. जपानी संस्कृतीत अशा बऱ्याच चिरंतन गोष्टी आहेत, की त्या पुनरुज्जीवित करून नव्याने मांडल्या तर आधुनिक विचारसरणीशी जुळणाऱ्या ठरतील. सम्राटाच्या विभूति-पूजेचेच उदाहरण घ्या. आता ती जवळ जवळ लुप्त झाल्यासारखी आहे. पण ही वृत्ती पूर्वी नव्हती असे

नाही. १३० वर्षांपूर्वी जपानमध्ये अँजे शोकी नावाचा एक अराजकतावादी होऊन गेला; त्याच्या शिकवणुकीचे सार होते—"राजे चोर असतात." त्याचप्रमाणे २०० वर्षांपूर्वी मोटो ऑरी नावाचा एक निसर्गवादी पंडित होऊन गेला. तो "बौद्ध भिक्षू इच्छेचे दमन शिकवितात, पण हे मिथ्या तत्त्व आहे," असे शिकवीत असे. मोटो ऑरीचे तत्त्वज्ञान पुनरुज्जीवित करून कल्पकतेने लोकांसमोर मांडले तर यंत्रयुगामुळे जी भौतिक मूल्ये जनतेसमोर मार्गदर्शक म्हणून उभी राहिली आहेत त्यांच्याशी ऑरीची शिकवणूक सुसंगत ठरेल.

विज्ञानाच्या प्रगतीत पश्चिमेचे नक्की स्थान काय याचाही नवीन दृष्टिकोनातून विचार करता येईल. उदाहरणार्थ, बेंजामिन फ्रँकलिनने विजेचा शोध लावण्याच्या शंभर वर्षे आधी हिरागा जेनाई नावाच्या जपानी शास्त्रज्ञाला हे तत्त्व माहीत होते याची कोणालाही माहिती नाही. तेव्हा भूतकाळाकडे नवीन दृष्टीने पाहणे हे वर्तमानकालीन जपानला अत्यावश्यक आहे.

## ☐ टीव्ही–रेडियोची मक्तेदारी नको

विचारवंतांच्या निरनिराळ्या परिषदांना हजर राहून आपले मत मांडणे भारतातील ब्रिटिश हायकमिशनर जॉन फ्रीमन यांना आवडते. गेल्या आठवड्यात जाहिरात–व्यवसायाची एक परिषद दिल्लीला भरली तेव्हाही ते हजर होते. टेलिव्हिजनच्या चर्चेत ते म्हणाले, "उत्पन्नाचा एक मार्ग एवढ्याच दृष्टीने कमर्शियल टीव्हीकडे पाहिले तर हरकत नाही, पण त्यात सरकारचीही मक्तेदारी नसावी व खाजगी उद्योगधंद्यांचीही नसावी. रेडिओ व टीव्हीचा सत्तेचे साधन म्हणून दुरुपयोग करता येण्याजोगा असल्याने ही खबरदारी घेणे आवश्यक आहे. दोन्ही मार्गांतला धोका टाळणारा मधला मार्ग म्हणजे हा सर्व व्यवसाय एखाद्या जबाबदार सार्वजनिक संस्थेकडे सोपवावा."

## ☐ भारत पौर्वात्य की पाश्चिमात्य ?

कुठल्या देशाला पौर्वात्य म्हणावे व कुठल्याला पाश्चिमात्य म्हणावे, असा प्रश्न नेहरू–तत्त्वज्ञान परिसंवादात उपस्थित झाला होता. जपानचे हृजीमे नाकामुरा म्हणाले की, "युरोप–अमेरिकेच्या दृष्टीने भारत पौर्वात्य देश असला तरी जपानच्या दृष्टीने पाश्चिमात्य आहे." जपानमध्ये नुकताच एक शब्दकोश प्रकाशित झाला आहे. त्याच्या संपादकांनी बरीच चर्चा करून अखेर भारताचा समावेश पश्चिमेत करायचे ठरवले. हुएनत्संगने "भारताचा प्रवास" असे पुस्तक लिहिले त्याचे वर्णनही "पश्चिमेचा प्रवास" असे करण्यात आले आहे. थायलँडचे प्रतिनिधी प्रेम पुराछत्र म्हणाले, "आमच्या दृष्टीने अमेरिका हीच अतिपूर्व !" ●

## हा इष्काचा घाव — !

हृदयी वाहे जखम जुनी पण ओठांवरही गीत नवे
हा इष्काचा घाव तोच पण रोज तयाचे दु:ख नवे
तेन तीच पण झंकार नवा
'आह' हीच पण उद्गार नवा
क्षणाक्षणाला चिरविरहाचे
कढ घेती आकार नवा
सरूप होते दीर्घ व्यथा ही साज लेवुनी नवे नवे
कसा सुटावा हट्ट प्रीतिचा
अप्राप्याचा हव्यास
कशी मीलनाविना शमावी
अति अंतरातिल प्यास
वैफल्याची जळते जाणिव
ते जळणे पण रोज हवे —
असीम वाळू जळते खाली
हूल पावते दुरून पाणी
कुठे काफिला कुठे छावणी
कुठे भटकतो मी अनवाणी
— त्या इष्काचे घेत जना जे
खांद्यावरती रोज नवे —
घाव हवा अन् हवी वेदना
हवे शल्यही उरी अंतरी
हवीस तूही स्मरणी स्वप्नी
श्वास वाहती उरी जोवरी
त्या श्वासातिल स्वर दु:खांचे
कसे कुणाला उमगावे —
कळा वेदना घायाळांच्या
घायाळांनी जाणाव्या
आणि व्यथेच्या गाथा केवळ
व्यथितांनीच रचाव्या
त्या गाथेचे अभंग कळण्या असे भंगले हृदय हवे—

— व. गो. कळस्कर

## माझ्या डोळ्यांच्या कडेशी

आज निळ्याशा आकाशी
ढग सावळा सावळा
माझ्या मनात दाटल्या
आज आगळ्याच कळा
नाही एवढीही कुठे
ढगा सोनेरी किनार
असे काहूर माजले
वाटे आला घातवार
हळू हळू आणखीही
ढग मागोमाग आले
तुझ्या येण्याच्या वाटेला
पहा कसे अंधारले
आता टिपे गळतील
ढग लोंबले, लोंबले
माझ्या डोळ्यांच्या कडेशी
माप दु:खाचे भरले

—चंद्रशेखर पटवर्धन

## रूपगंधा भिजे

डोळ्यांच्या किनारी
आसवांचे थेंब
हुंदक्यांना कोंब
फुटो आले
विखुरल्या गंधी
उस्कटला साज
लावण्याचे तेज
माती झाले !
रूपगंधा भिजे
आसवांच्या डोही
मनात तरीहि
स्वप्न झुरे !

— बरगंज सरोदे

# आस्वाद

'इष्काचा घाव–' बसल्यानंतर रोजच्या वेदना नव्याच असणार. व. गो. कळस्कर यांनी ही व्यथा काहीशा शाहिरी बाण्याने रंगविली आहे. दुर्बोधता कुठे नाही. 'घायलकी गति घायल जाने' हे कवीने पुनः एकदा सांगितले आहे. पण जखमा वाहत असल्या तरी त्या न वाहाव्यात असे मात्र कवीला वाटत नाही. छेः त्यासाठी तर त्याची प्रार्थना आहे ! कळा आणि वेदना हव्यातच. आणि त्या नेहमी नित्य नव्या असाव्यात. मात्र मीलनाने अंतरंगाची प्यास शमेल ही कवीला वाटणारी आशा या विशिष्ट वृत्तींला शोभून दिसली तरी ती तितकीशी खरी नाही. तितकीशी म्हणण्याचे कारण खात्री देता येत नाही. कित्येकदा मीलनाने नव्या वेदना सुरू होतात. पण काही असले तरी आहे या भूमिकेचे मंडन कवीने छान केले आहे –

आणि चंद्रशेखर पटवर्धन यांनी याच उत्कटतेच्या पण काही आगळ्या छटा रेखाटल्या आहेत. 'माझ्या डोळ्यांच्या कडेशी' या कवितेत एका मीलनोत्सुक प्रेमिकाची हुरहूर फार हलक्या हातांनी रंगविली आहे. कोण विचित्र आणि अभद्र कल्पना मीलन-क्षणाच्या आधी थैमान घालतात ! अगदी अंधारून येते आणि ढग पाणी शिपडू लागतात. ही काहीशी करुण पण तितकीच रम्य वेळ असते. चंद्रशेखर पटवर्धनांनी फार आक्रस्ताळेपणा न करता ही कला रंगविली हे विशेष, मन आणि बाह्यसृष्टी यांचा दुवा बेमालूम जुळवून दिला आहे. कविता फार सुंदर आहे.

बजरंग सरोदे हेही पटवर्धनांप्रमाणे डोळ्यांच्या किनारी उभे आहेत. हुंदक्यांना कोंब फुटण्याची कल्पना फार तरल आणि सूक्ष्म वाटते. पुष्कळदा दोन प्रतिमानातला दुवा नीट स्पष्ट होत नाही. म्हणजे होते काय ? ती स्वतंत्रपणे मोहक वाटतात. पण त्यांच्यांत आंतरिक एकता कुठे आहे हे नीट लक्षात होत नाही. असे थोडेसे या कवितेत झाले आहे. दोन कडव्यापर्यंत एकमेकातली गुंफण स्पष्ट होते. पण शेवटचे कडवे जरा अस्पष्ट आहे. पण कित्येकदा अवगुंठनातून सौंदर्य अधिक चित्ताकर्षक दिसते तसा अनुभव येणेही अशक्य नाही. स्वप्नाचे झुरणे या कल्पनेत काही गूढ पण जाणवणारे तरीही स्पष्ट न करता येण्यासारखे लावण्य आहे, हे मात्र खास.

*–गोपीनाथ तळवलकर*

" हे हॉस्पिटल आहे, तुम्ही मिसेस सावंत का ?
मकरंदाच्या आई ? तुमचा मुलगा .. "

# मला मुलगी हवीय

## सौ. मंदाकिनी चिपळूणकर

" मुलगा झाला हो मालूताई, झक्क. चांगला ७ पौंडी." नर्सबाईचे हे शब्द अर्ध-वट गुंगीतच माझ्या कानी पडले. पण नंतर मात्र मी चांगल्याच गुंगीत शिरले. मुलगा ! झालं. परत मुलगाच का ? म्हणजे माझा शेवटचा चान्सपण मी घालवला म्हणायचा !

हा माझा चौथा मुलगा. चारही खेपांना मी याच हॉस्पिटलमध्ये आले आहे. पहिल्या खेपेला मुलगा झाला तेव्हा मला अन् यांना भलताच आनंद झाला. पहिलं-वहिलं प्रीतीचं फूल गोडच असतं नाही का ? दुसऱ्या खेपेला मुलगी होईल असं वाटलं, पण मुलगा झाला म्हणून आम्हांला तसं काही वाईट वाटलं नाही.

तिसरं गर्भारपण जरा जडच गेलं. डॉक्टरांनी सांगितलंसुद्धा, " मिसेस सावंत, आता पुरे हं. नाहीतर . . . . " या वेळी आम्ही दोघांनी पैजच लावली. नक्की मुलगीच होणार. पण छे ! मी आपली एका मुलाला घेऊन घरी आले. सगळ्या स्त्रिया माझा हेवा करायच्या–मुलावर मुलगे– काय नशीबवान बाई. पण खरं म्हणजे मला मुलीची भारी हौस. लहानपणापासूनच बाहुल्यांचा खेळ मी कित्ती दिवस खेळत होते. माझ्या मुलांवर माझं प्रेम नव्हतं असं नाही. पण मुलगी म्हणजे– ते छोटे छोटे गोजीरवाणे, तऱ्हेतऱ्हेचे फ्रॉक्स, त्या लेसवाल्या चड्ड्या, ते पेटीकोट, ते एरिंग्ज, सगळंच कसं लोभस असतं. फूटपाथवरचे ते छोटे छोटे नाजूक मुलामय फ्रॉक्स मी येताजाता आशाळभूतपणे बघत असे–आई ग, असं माझं मन कळवळायचं.

डॉक्टरांनी बजावलं तेव्हा खरं म्हणजे आम्ही काळजी घ्यावयाला हवी होती, पण मनाच्या खोल कप्प्यात कुठंतरी सुप्त इच्छा दडून राहिली होती, त्यामुळे मी क्षणिक मोहाला बळी पडले–हे मात्र फार म्हणजे फारच घाबरले– " माला, आता ग ? " मी त्यांच्या छातीवर विसावत म्हटलं, " काही होत नाही हो ! बघाल



तुम्ही. आता या वेळी मात्र नक्की मुलगी होणार ह्ये. तीन मुलांच्या पाठीवर हट-कून मुलगी होते म्हणे ! " त्या दिवशी हॉस्पिटलात जातानासुद्धा छोटचाशा मुलीचा चेहराच माझ्या डोळचांसमोर फिरून फिरून येत होता . . . पण हाय–!

नर्सबाईंच्या त्या विखारी शब्दांनी मी जास्तच गुंगीत शिरले. शेवटचा चान्स गेला. आता जास्त ताणण्यात काही अर्थ नाही. मुलांची न् यांची जबाबदारी; सर्वांना वाऱ्यावर सोडून हे जग सोडायची माझी इच्छा नाही. हे भेटायला आले तेव्हा मी माझी निराशा चांगलीच लपवून ठेवली. पण हे गेल्यावर माझ्या डोळचां-तून सतत गळणारे अश्रू मी थांबवू शकले नाही. माझ्या लाडक्या मुलांना मी बहीण देऊ शकले नाही. दर भाऊबीजेच्या आठवणी माझ्या मनात गर्दी करू लागल्या. " आई, तू का आम्हांला ओवाळतेस ? तू आई ना आमची ? शशीला कशी त्याची ताई ओवाळते ? " मुलांच्या या प्रश्नांना काहीतरी गंमतीचं उत्तर देऊन मी वेळ साजरी करीत असे.

तिन्ही मुलांना छोटा जयंत फारच आवडला. अतिशय गुटगुटीत, खेळकर. कधी मुळी तो रडायचाच नाही. अतिशय गुणी. जणू काही आपण मुलगी झालो नाही, याची भरपाई तो आपल्या चांगुलपणानं भरून काढीत आहे असं मला वाटे. आमचा तिसरा मुलगा मकरंद तर त्याच्या पाळण्याशी तासन् तास उभा राही, त्याच्याकडे टक लावून पाहत बसे. मोठे दोघे शाळेत जात, पण मकरंद होता चार वर्षांचा त्यामुळे तो घरीच असे. मी जयंताचे सगळे करीपर्यंत तो माझ्या मागून मागून इकडे तिकडे फिरे, नाना प्रश्न विचारी. जयंताला आंघोळ घालायला लागले की हा छोटचा छोटचा पेल्यानं मला पाणी देई. कपडे घालायला लागले की पावडर, तीट, काजळ पुढे करी–माझ्या सगळचा कृती तो निरखून बघे.

नेहमीच्या सवयींचीच माझी ती कामं. त्यामुळे मी ती पटापटा करी. शिवाय मागं कामाचा पसारा असेच. पण मकरंदला वाटे, आई इतकं भराभर का संपवते जयंताची कामं! त्याचे पापे घेत नाही, काही नाही. एक दिवस तो आपला इवलासा चेहरा बराच गंभीर करून मला म्हणाला, "आई, तुला लहान बाळं आवडत नाहीत का ग? जयंत मुलगी नाही म्हणून तू अजूनसुद्धा रागावली आहेस का त्याच्यावर?" त्याचं बोलणं ऐकून मी अगदी थक्कच झाले. आपल्या मोठ्या माणसांच्या लक्षात येत नाही, पण ही छोटी मुलं आपल्या छोट्या शोधक डोळ्यांनी इवल्याशा मनात काय काय टिपून ठेवीत असतात! मी झटकन त्याला जवळ घेत म्हटलं, "छेरे मका, काहीतरीच काय? मला तर छोटी बाळं इतकी आवडतात." पण त्याचं काही समाधान झालेलं दिसलं नाही. तो परत म्हणाला, "तू बाबांना सांगत होतीस ना ते आमी ऐकलंय! तुला मुलगी हवी होती ना. पण आई, आम्ही तर सगळे मुलगेच!" तो अगदी रडव्या आवाजात बोलत होता. खरं तर त्याच्याबरोबर मलाही रडू येऊ लागलं होतं. पण मी ते आवरलं. "आई, किती शहाणा माझा बाळ!" मी वरवर हसत म्हटलं, "वेडा रे! वेडा! ते आपलं उगीच. अरे! तू जयंता, मदन सगळेच किती छान आहांत. मला फार फार आवडता नेहमी तुम्ही मला हवेत रे!" मकरंद खुलला. त्याला पटकन हसू आलं. मी त्याचे त्या दिवशी जरा जास्तच लाड केले. मला वाटलं, सगळं विसरेल आता तो, सगळं ठीक होईल नंतर. ..पण...नाही. मी माझं 'मुलगी पाहिजे' हे म्हणणं बऱ्याचवेळा ऐकवलं असलं पाहिजे. बाकीच्यांच्या लक्षात आलं नसेल, पण मकरंदाच्या चांगलंच घ्यानात राहिलं असलं पाहिजे. कारण......

त्या दिवशी जयंताचा वर्षाचा वाढदिवस होता. मी सगळ्या मुलांना घेऊन बाजारांत गेले होते. प्रत्येकाजवळ थोडे थोडे पैसे देऊन त्यांनी जयंताला त्यांच्या आवडीची काहीही वस्तू द्यावी असं मी मुलांना सांगितलं होतं. मदननं पिपाणी घेतली, विश्वासनं खडूच्या कांड्यांची डबी घेतली...खरं म्हणजे जयंत त्या खाऊनच टाकील बहुतेक......मकरंद मात्र बाहुल्यांच्या कपाटाशी रेंगाळत उभा होता. मदननं त्याला चिडवलं "अरे, जयंता मुलगा आहे वेड्या! त्याला ब्राहुली कसली देतोस! मी बघ कशी टॉप पिपाणी घेतली आहे." मी नकळत तिथली एक बाहुली उचलली "काय छान आहे नाही! आपल्या घरात बेबी कुठे आहेपण......" मी ती बाहुली परत ठेवीत मकरंदाला म्हटलं, "हं चल, ती रबरी मांजरी घे बरं. दाबली की छान आवाज काढते."

रस्त्यातून जाताना मकरंद एक शब्दही बोलत नव्हता. त्या दिवशी दुपारी मी मकरंदबरोबरच्या मुलांना, तसंच इतर काही मदन-विश्वासच्या मित्रांना आणि माझ्या बहिणीच्या छोट्या मुलीला वाढदिवसाच्या पार्टीला बोलावलं होतं. बहिणीची मुलगी मेघा माझ्या मकरंदाएवढीच होती. मला ती भारी आवडायची, पण त्याच-

बरोबर मला तिचा सूक्ष्म रागही यायचा. तिच्या बालिश चाळ्यांचं माझी बहीण इतकं कौतुक करायची – मेधाला अस्से एरिंग्ज आवडतात, ती अशीच वेणी घाल म्हणते, अस्साच फ्रॉक मागते – मला तिचा जरा हेवाच वाटायचा.

पार्टीच्या आधी मी मुलांना हाक मारली, " चला, हातपाय धुवा आता. खळ पुरे. " मला वाटलं मकरंद पण असेल त्यांच्यांत ! मी जयंताला नवे कपडे चढवले, तीट-काजळ केलं. सगळी तयारी झाल्यावर मुलांना बोलावलं. फक्त मदन-विश्वास आले.

" हे काय, मकरंद कुठाय ? " दोघांनीही थेट त्यांच्या बाबांसारखे खांदे उडवले. बऱ्याच वेळात तो त्यांना दिसला नव्हता. कदाचित शेजारच्या कुत्र्याच्या पिलाबरोबर खेळत असेल, म्हणून तिकडे बघितलं. तिथंही मकरंद नव्हता. सबंध घरदार शोधलं, पण मकाचा पत्ता नाही. आता मात्र मी घाबरले. ऐन वेळीं गेला कुठे हा मुलगा ? तितक्यात माझी बहीण आली, तिला मुलांना खायला द्यायला सांगितलं. दोघींनाही काहीच सुचेना. गाडीखाली सापडला की बसखाली चेंगरला. नाही नाही ते मेलं मनात येतं अशा वेळी ! म्हण आहे ना, ' मन चिंती ते वैरी न चिंती. '

हे त्या दिवशी मुद्दामच लवकर घरी येणार होते, तसे आलेही. मी त्यांना घाईघाईनं सांगत होते, तेवढ्यात फोन वाजला. मी धावले. कापऱ्या हातांनी फोन उचलला. फोनवरचं बोलणं ऐकून माझं काळीज क्षणभर थांबलंच. " हे हॉस्पिटल आहे ! तुम्ही सौ. सावंत का ? मकरंदाच्या आई ? " मला डोळ्यांपुढे एकदम अंधारीच आली. यांनी मला सावरलं आणि त्याच वेळी फोनही घेतला तोच डॉक्टरांचा शांत आवाज परत आला, " तुमचा मुलगा इथं सुखरूप आहे, काळजीचं कारण नाही. पण लवकर येऊन घेऊन जा. " सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. पण हा हॉस्पिटलात कशाला गेला ? हॉस्पिटल चार पावलांवरच होतं पण ते त्या वेळी केवढं लांब वाटलं. रस्ता संपता संपेना. माझी बडबड व रडणं दोन्ही एकाच वेळी चालू होतं. आम्ही आत शिरतो तो डॉक्टरच मकरंदाला बोटाला धरून घेऊन येत होते समोरूनच. इतकं आश्चर्य वाटलं. डॉक्टर हसत म्हणाले, " हे घ्या तुमचे शहाणे चिरंजीव मि. मकरंद सावंत. पाच वर्षांपूर्वी हा तुम्हांला इथं मिळाला ना, म्हणून तो इथं आला. आपल्याबदली तो एक मुलगी मागत होता तुमच्या घरी पाठवायला. " म्हणजे मला काहीच कळेना. " आपल्याबदली ? मका, राजा म्हणजे काय सांग तरी मला ? "

माझा लाडका मला बिलगत रडू लागला – फुलूनफुलून. उमाळे अगदी त्याला आवरेनातच. तरी तो म्हणत होता, " तुला...बेबी हवी होती ना ?...नेहमी...पण मी काही मुलगी नाही. जयंता...पण अं...अं नाही...पण तो फारच लहान आहे... त्याला चालत...अं अं...इथं येणार नाही येता...म्हणून मी माझ्या बदली...मुलगी मागितली...म्हणजे जयंताला...वाढदिवसाला बहीण मिळाली असती... . " असा धक्का बसला मला.

हे माझ्याकडे विस्फारित नेत्रांनी आश्चर्याने बघू लागले – मी शरमले. खरंच हा माझाच दोष ! मला मुलगी हवी असेल, प्रत्येक आईला आपली प्रतिकृती घरात असावी असं वाटणं साहजिकच आहे. पण हे माझं वाटणं, एवढ्याशा छोट्या मुलाच्याही लक्षात यावं, इतकं मी उघड करून, बोलून वागून दाखवलं का ? अरेरे, काय माझा मूर्खपणा ! एका कोवळ्या जिवावर मी केवढे आघात केले. नकळत का होईना, कोवळी कळी किती कोमेजली ! मी मकरंदाजवळ वाकून त्याला उचललं, त्याचे केस सारखे केले, त्याचे नाकडोळे पुसले. त्याचे पापे घेत मी म्हटलं, " राजा, मला फक्त तू हवा आहेस. देवाच्या मनात आईला मुलगी द्यायचं नाही, त्यानं तुला आम्हांला दिलं आहे – चल, आता घरी जाऊ या ना ? जयंता, तुझी केव्हा-पासून वाट पाहतो आहे. " जयंताचं नाव ऐकताच मग मात्र त्याला घरी जायची अशी घाई झाली ! वडिलांच्या खांद्यावर बसून त्यांच्याशी गुलूगुलू गोष्टी करत स्वारी घरी निघाली. हे माझ्याकडे मधूनमधून डोळे वटारून पाहत होते, पण मला आता त्याचं काहीच वाटत नव्हतं – मला मुलगी नाही याचंही दुःख मला वाटेनासं झालं– एकदम – सगळं सगळं ठीक होणार होतं. ●

.. प्रकाशनाच्या वाटेवर ..

नाझी भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

मधुसूदन गोखले




# व्यसन !!

दि. १४ ऑक्टोबर १९६६ रोजी रघुनाथ धोंडो कर्वे यांना आपल्यातून जाऊन एक तप–एक वर्ष पूर्ण झाले. संततिनियमनाची कल्पना ज्या काळात समाजांत अश्लील, अनीतिमूलक आणि अधार्मिक मानली जात होती अशा काळात त्यांनी ती तर्कशुद्ध युक्तिवादाने लोकांपुढे मांडली. संततिनियमनाच्या चळवळीचा प्रचार आणि प्रसार हेच जीवितकार्य. मानले. त्यासाठी अपार कष्ट सहन केले, हालअपेष्टा भोगल्या. आपल्या मतप्रचारासाठी त्यांनी अनेक पुस्तके लिहिली व सतत २५ वर्षे 'समाज-स्वास्थ्य' हे मासिक चालविले. दुर्दैवाने त्यांच्या मृत्यूच्या दिवशीच या मासिकाचा निघालेला अंक हा शेवटचा अंक ठरला.

गणिताच्या उच्च शिक्षणासाठी फ्रान्समध्ये गेले असताना रघुनाथरावांनी संततिनियमन व गुप्तरोग या विषयांसंबंधी अद्ययावत् ज्ञान संपादले. तत्पूर्वी त्यांच्या कॉलेजमधील अभ्यासाच्या काळातच त्यांचा लैंगिक विषयासंबंधीचा अभ्यास सुरू झाला होता. या विषयाचा अभ्यास करत असता आपले लक्ष विशेषतः दोन गोष्टींकडे वेधल्याचे ते सांगतात. "लैंगिक संबंधांतून दोन समस्या निर्माण होतात. त्या म्हणजे स्त्रियांच्या बाबतीत नको असलेली गर्भधारणा टाळणे व स्त्री आणि पुरुषांच्या बाबतीत लैंगिक संबंधांतून निर्माण होणाऱ्या गुप्त रोगापासून बचाव करणे."

कॉलेजात असताना पुढे पॅरिसमध्ये या विषयासंबंधी त्यांनी केलेला विचार व अभ्यास हाच पुढे त्यांच्या जीवित-

कार्याचा पाया ठरला. या विषयावरील पुस्तके महत् प्रयासाने मिळवून त्यांनी हे ज्ञान संपादन केले. मात्र सरकारी नोकरीत असेतोपर्यंत त्याची वाच्यताही केली नाही. फ्रान्सहून परत येताच सरकारी नोकरीत खटका उडाल्याने त्यांनी राजीनामा दिला व नंतरच्या फावल्या वेळांत 'संततिनियमन', ' गुप्तरोगापासून बचाव ही दोन पुस्तके लिहिली. तो काळ असा होता की ही पुस्तके प्रसिद्ध करण्यास कोणी तयार होईना. " मला ही पुस्तके स्वतःच्या खर्चाने प्रसिद्ध करणे भाग होते, आणि माझा खिसा तर या वेळी जवळ जवळ रिकामा होता." अशा परिस्थितीत २१ साली मूळ इंग्रजीत लिहिलेल्या या दोन पुस्तकांचे मराठीत रूपांतर करून त्यांनी स्वखर्चाने ती पुस्तके १९२३ साली प्रसिद्ध केली.

१९२३ साली ' संततिनियमन ' या प्रथम प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या १० जून १९२५ रोजी लिहिलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत रं. धो. म्हणतात, " काल्पनिक लोकमतास भिऊन येथील मासिक मनोरंजन छापखान्याच्या मालकांनी पुस्तकाची पहिली आवृत्ती छापण्याचे नाकारले. त्याचप्रमाणे मासिक मनोरंजन, मॉडर्न रिव्ह्यू, केसरी व इतर मासिकांच्या व साप्ताहिकांच्या पारंपरिकतेमुळे अशा पुस्तकांची जाहिरात देणेसुद्धा कठीण होऊन बसते. "

या विषयासंबंधी तत्कालिन वृत्तसृष्टीचा दृष्टिकोन कसा होता हे १९५१ साली आपल्या एका भाषणात र. धों. नी सांगितले आहे. " केसरीचा वारसा श्री. न. चिं. केळकर यांचेकडे आला होता. माझ्या पुस्तकांची जाहिरात केसरीत घेण्याचे त्यांनी नाकारले. माझी व केळकरांची व्यक्तिशः ओळख होती. आणि त्यांच्याशी पत्रव्यवहाराने प्रदीर्घ चर्चा करून मी माझे म्हणणे थोड्या प्रमाणांत त्यांना पटवू शकलो. केसरीत एकच वेळ माझ्या पुस्तकांची जाहिरात देण्याचे त्यांनी कबूल केले, पण फक्त एकच वेळ ! कारण अशा विषयांची सार्वजनिक चर्चा होणे योग्य नाही, असे त्यांना वाटत होते. "

१९२३ साली प्रसिद्ध झालेले 'संततिनियमन ' हेच या विषयावरील मराठीतील पहिले पुस्तक होय. या पुस्तकाच्या आजवर अक्षरशः हजारो प्रती खपल्या आहेत. १९२३ ते ५३ च्या दरम्यान या पुस्तकाच्या ११ आवृत्त्या निघाल्या. त्यांच्या मृत्यूनंतर श्रीमती शकुंतलाबाई परांजपे यांनी त्याची १२ वी आवृत्ती प्रसिद्ध केली आहे. या पुस्तकाखेरीज ' गुप्त रोगापासून बचाव ',' आधुनिक कामशास्त्र ',' त्वचेची निगा ',' वेश्या व्यवसाय ' ही महत्त्वाची पुस्तके त्यांनी लिहिली. याखेरीज ' न्यायाचा शोध ', ' गुरुबाजी ' ही सामाजिक नाटके त्यांनी लिहिली. तसेच स्वतःच्या स्वतंत्र अशा तेरा कथांचा संग्रह ' तेरा गोष्टी ' या नावे प्रसिद्ध केला, तसेच अनेक फ्रेंच कथांची भाषांतरे त्यांनी आपल्या 'समाजस्वास्थ्या 'त प्रसिद्ध केली.

## राईट एजन्सीची स्थापना

१९२१ साली संततिनियमनाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी व गुप्तरोगांबाबत माहिती व प्रतिबंधक उपाय-

योजना यांचा प्रसार करण्यासाठी रघुनाथरावांनी आपल्या राहत्या घरी (नं.१३ नवी भटवाडी गिरगाव, मुंबई) 'राईट एजन्सी' नामक संस्था सुरू केली. आणि आपल्या पत्नीच्या साहाय्याने तेथे त्यांनी संततिनियमनाची सशास्त्र माहिती स्त्री-पुरुषांना देण्याचे व साधने बनवणे व त्यांचा वापर यांचे शिक्षण देण्याचे कार्य सुरू केले. त्याचबरोबर गुप्तरोग व त्यांचा फैलाव, तसेच त्यांपासून बचाव कसा करावा याविषयी तेथे माहिती देण्यात येई व काही गुप्तरोगविषयक व प्रतिबंधक साधने व औषधेही पुरवली जात.

ग्रंथलेखन व 'राईट एजन्सी' द्वारा उघडपणे संततिनियमनाबाबत रघुनाथरावांनी प्रचार-प्रसाराला सुरुवात केली. या विषयावर प्रकटपणे व्याख्यानातून ते आपले विचार अत्यंत तर्कशुद्धरीत्या मांडत. १९२३ सालचे पुण्याच्या 'वसंत व्याख्यान माले'तले त्यांचे एक भाषण फारच गाजले. त्यांचे लेख मात्र कोणी छापण्याचे धाडस करत नव्हते. याला्ही काही अपवाद होतेच. सुरुवातीपासूनच र. धों. च्या कार्याविषयी 'किर्लोस्कर खबर' या मासिकाने सहानुभूतीचे व प्रोत्साहन देण्याचे धोरण ठेवले होते. त्या वेळी 'किर्लोस्कर खबर' किर्लोस्करवाडीहून प्रसिद्ध होत असे. त्या मासिकात र. धों.नी लिहिलेल्या एका लेखावर उठलेल्या वादळवणव्यांत र. धों. ना विल्सन कॉलेजातील आपल्या नोकरीची आहुती द्यावी लागली.

अशा चहूबाजूंनी झालेल्या कोंडीतून आपल्या विचारांना प्रसिद्धी देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वतःचे स्वतंत्र मासिक काढणे हा मार्ग रघुनाथरावांच्या मनात बरेच दिवस घोळत होता. संततिनियमन व लैंगिक प्रश्न यांबाबत त्यांचे लेख छापण्यास बहुतेक मासिके कचरू लागल्यामुळे त्यांनी आपले 'समाज स्वास्थ्य' हे मासिक जुलै १९२७ मध्ये सुरू केले. रघुनाथरावांचे अनेक विषयांवरील क्रांतिकारक विचार, त्यांच्या विविध चळवळी, 'राईट एजन्सी' मार्फत त्यांनी तयार केलेल्या 'संततिनियमन' व 'रोग प्रतिबंधक' औषधांच्या व साधनांच्या जाहिराती, तसेच त्यांनी लिहिलेल्या विविध विषयांवरील पुस्तकांच्या जाहिराती या साऱ्यांचे 'समाज स्वास्थ्य' हे त्यांच्या हयातभर एक उत्कृष्ट माध्यम ठरले.

## एकखांबी तंबू

रघुनाथरावांना त्यांच्या या कामात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. अश्लील वाङमय प्रसिद्ध केल्याच्या आरोपाखाली त्यांच्यावर तीन वेळा खटला झाला. त्यांपैकी पहिल्या व दुसऱ्या वेळी त्यांना दंड भरावा लागला. हे मासिक कधीच फायद्यात चालले नाही. खटले झाल्यामुळे उलट त्याच्या विक्रीवर परिणामच झाला. दरवर्षी या मासिकापायी रघुनाथरावांना ८०० रुपये तोटा सहन करावा लागत असे. 'समाजस्वास्थ्य' रघुनाथराव निष्ठेने चालवत. अंक दर महिन्याच्या १४ तारखेस न चुकता बाहेर पडत असे.

मजकूर लिहवयाचा, छापखान्यात पोचवायचा, प्रुफे तपासायची, बुकपोस्टे करायची ही कामे स्वतः र. धों.च करीत. डेमी आकाराची ३२ ते ३६ पाने असलेल्या 'समाज-स्वास्थ्या'ची वार्षिक वर्गणी सुरुवातीस टपालखर्चासह दीड रुपया होती. किरकोळ अंकाची किंमत सुरुवातीला काही वर्षे २ आणे, नंतर ३ आणे व शेवटी शेवटी ४ आणे करण्यात आली.

'समाजस्वास्थ्या'तील बहुतेक सर्व लेखन स्वतः र. धों.च करत. मोपासा, हॅवलॉक एलीस यांच्या मूळ फ्रेंचवरून अनुवादित लेख, जेरा रसेल, मार्सेल लॅम्ब इ. च्या लेखांचा अनुवाद, विल्यम जे रॉबिनसन् यांचे मासिक, प्रेस मेडिकल, सायंटिफिक अमेरिकन् इत्यादी मासिकांमधून घेतलेली माहिती, वेस्टरमार्कच्या ग्रंथातील उतारे, 'फ्रेन्चवरून' 'फ्रेंच लेखाच्या आधारे,' अशा विविध प्रकारचे शास्त्रीय व लैंगिक विषयावरील उद्बोधक लेखांनी 'समाजस्वास्थ्य' नेहमी भरलेले असे.

'समाजस्वास्थ्या'च्या नंतर नंतरच्या काही वर्षांत ग. र. मुळे (कर्जत), श्री. वि. ग. भिडे, डॉ. के. भा. लेले, श्री. म. भा. भोसले (मळवली), श्री. माधवराव बागल (कोल्हापूर), श्री. स. सहृदय (महाड) इत्यादी लेखकांचे लेख व कथा अधूनमधून दिसतात. सतत २५ वर्षे 'शारदेचे पत्र' या सदरात स्वतः र. धों. कर्वे 'शारदा' या टोपण नावाने विविध सामाजिक वाङमयीन व तत्कालीन प्रश्नावर लेखन करीत. 'समाजस्वास्थ्याचा कोणताही अंक उघडून पाहा. त्यात पत्रव्यवहार या विभागास दोन–चार पाने खर्च केलेली आढळतील. विविध प्रकारच्या लैंगिक प्रश्नांबाबत शंका-कुशंका, प्रश्न–उपप्रश्न, अडी-अडचणी यांना र. धों. या सदरांत शास्त्रशुद्ध उत्तरे देत असत.

प्रत्येक अंकाच्या मुखपृष्ठावर बहुधा नग्न स्त्रीचे चित्र असे. याबाबत घेतल्या गेलेल्या आक्षेपांना र. धों. नी 'समाजस्वास्थ्या'तून अनेक वेळा उत्तरे दिली आहेत. एके ठिकाणी ते लिहितात—

"अश्लीलता हा एक मानलेला गुण आहे. इतर सर्व प्राणी नग्न हिंडतात. त्यात कोणालाही काही अश्लील दिसत नाही. मनुष्य नग्न असेल तर ते मात्र अश्लील! तसेच मनुष्याच्या शरीराचे काही भाग अश्लील, बाकीचे अश्लील नाहीत. अमुक इंद्रिये आणि त्यांच्या क्रिया अश्लील का मानाव्या याला कारण नाही. जी चित्रे वैद्यकीय पुस्तकांत अश्लील नाहीत ती इतर पुस्तकांत अश्लील होतात, असे काही लोकांना वाटते. तरीदेखील कायद्यात वैद्यकीय पुस्तकासंबंधी अपवाद सांगितलेला नाही. एक मॅजिस्ट्रेट ज्याला अश्लील म्हणतो त्याला दुसरा म्हणत नाही. त्यामुळे **"अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणाऱ्यांच्या मनाचा गुण होय."** या उताऱ्यातील शेवटचे वाक्य ते 'समाजस्वास्थ्या'च्या प्रत्येक अंकाच्या

पहिल्या पानावर ठळक अक्षरांत चौकटीत छापत असत.

## अशा जाहिराती

'समाजस्वास्थ्या'ची काही पाने 'राईट एजन्सी'तर्फे तयार करण्यात आलेल्या व विकल्या जाणाऱ्या विविध संततिप्रतिबंधक, रोगप्रतिबंधक व कामोत्तेजक औषधांच्या जाहिरातींनी भरलेली असत तर मलपृष्ठावर र. धों. नी लिहिलेल्या विविध पुस्तकांची जाहिरात असे. 'समाजस्वास्थ्या'त येणाऱ्या इतर काही जाहिरातींपैकी पुढील लक्षणीय आहेत.

— पंचवीस वर्षाखालील विवाहित अथवा कशीही कंपॅनियन पाहिजे. द्रव्य साहाय्यही मिळेल. पत्रव्यवहार गुप्त.

पत्ता × C/o **समाजस्वास्थ्य**

— एक पंचवीस वर्षांच्या गृहस्थास सुशिक्षित, मोकळ्या मनाची मैत्रिण पाहिजे. वयाची व जातीचीही अट नाही. पत्रव्यवहार गुप्त.

पत्ता B. C/o राईट एजन्सी

**— पुणेकरांची सोय**

श्री. शकुंतलाबाई परांजपे ह्या स्त्रियांस स्वतः तपासून योग्य आकाराची रबरी टोपीची निवड करून ती वापरण्यासंबंधी संपूर्ण माहिती देतील. टोपीबरोबर वापरावी लागणारी जेली व टोपीही त्यांजकडे विकत मिळेल. गरजूंनी चौकशी करावी.

भेटण्याची वेळ: दुपारी ३ ते ५

पत्ता—नं. १२२० रँग्लर परांजपे रोड, भांबुर्डा, पुणे ४.

**— मुंबईत सोय**

स्त्रियांस तपासून योग्य आकाराची टोपी निवडून ती स्वतःला बसविण्यास शिकवून संपूर्ण माहिती देण्याचे काम सौ. मालतीबाई कर्वे करतात.

भेटण्याची वेळ: सकाळी ९ ते १० व दुपारी ३ ते ४

पत्ता— नं. १३ नवी भट वाडी गिरगाव, मुंबई ४.

या किंवा असल्या जाहिरातींखेरीज १९३५ सालापर्यंत दुसऱ्या जाहिराती 'समाजस्वास्थ्या'त दिसत नाहीत. १९३६ साली अलेंबिकच्या 'हेमो द्राक्षो माल्ट' चीं पूर्ण पानी जाहिरात, ब्राह्मी तेल, डॉ. एस्. एच्. खान यांच्या 'बंद विटाळ गोळ्या', सांडू ब्रदर्स चेंबूर इ. च्या जाहिराती दिसतात. १९४५ सालच्या दरम्यान मात्र 'समाजस्वास्थ्या'स सिनेमाच्या पूर्णपानी जाहिराती मिळत गेल्या आणि त्याबरोबरच चित्रपट परीक्षणाचे सदरही सुरू झाले.

## इतर शास्त्रीय विषय

'समाजस्वास्थ्या'त केवळ लैंगिक विषयावरच लेख येत असे नव्हे तर विविध शास्त्रीय व सामाजिक विषयांवर लेख येत. या लेखाच्या विषयांची विविधता पुढील लेखांच्या नावांवरून सहज लक्षात येईल. जाती आणि भाषा, कॅन्सरवरील लेखमाला, आहारशास्त्रावरील लेखमाला, बुवाबाजी, शेतीचा प्रश्न, अन्नोत्पादन व प्रजा, ईश्वराचे अस्तित्व, मृतात्म्यांचा इतिहास, भारतांतील विविध देवालयांतील शिल्प, सत्य आणि नीती

बाल मानसशास्त्र असले विषय 'समाजस्वास्थ्यां'त चर्चेला न घेता या मासिकात कामशास्त्रविषयक माहितीचेच सगळे लेख यावेत अशा सूचना अनेक वाचक करीत. या वाचकांना र. धों. नी पुढील मासलेवाईक उत्तर दिले आहे. "आमचे मासिकात कोणते लेख यावेत हे आमचे मताने ठरायचे असते. तुमच्या नव्हे. मासिकाच्या नावावरूनही त्यांत फक्त कामविषयकच लेख द्यावेत असे होत नाही. आपणांस त्याचा अर्थ कळत नसल्यास इतर कोणास विचारावा ! जो जो विषय समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे तो तो आम्ही लिहिणार.'.

'समाजस्वास्थ्या'चे संपादक म्हणून आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत सतत २५ वर्षे र. धों. नी अविरत काम केले व लेखणी झिजवली. र. धों. म्हणजेच ,समाजस्वास्थ्य' व 'समाजस्वास्थ्य' म्हणजेच र. धों. असे समीकरणच बनून गेले होते. टीकेचा आणि निंदेचा वर्षाव त्यांनी सतत सहन केला. आपली मते त्यांनी कोणाचीही क्षिती न बाळगता मांडली. जे खरे असेल व जे जे योग्य वाटेल, ते ते लिहिण्यास कधीच डगमगले नाहीत. 'समाजस्वास्थ्य' हजारो लोक वाचीत पण वर्गणीदार मात्र फार नव्हते. हे मासिक त्यांना कधीच फायद्याचे झाले नाही. परंतु त्यामुळे डगमगून न जाता त्यांनी हा एकखांबी तंबू आमरण उचलून धरला. इतका तोटा सोसून हे मासिक कशाला चालवता असे विचारणाऱ्याला र. धों. उत्तर देत. "**कोणी जुगारावर पैसा उधळतात, कोणाला बायकांचे व्यसन असते, कोणी दारूत पैसे ओततात, तसेच माझे हे व्यसन समजा.**" ●

## 'लूप नव्हे खरोखरीच कुलूप'

स्कॅन्डिनेव्हियन देशातील ग्रीनलॅन्डमध्ये अशी एक विलक्षण समजूत परवा परवापर्यंत प्रचलित होती की वधूने आपल्याला मूल केव्हा हवे हे ठरविण्यासाठी वरातीचे वेळी प्रार्थनामंदिराकडे जाता जाता वाटेत गुपचुपपणे एक कुलूप न लावलेल्या स्थितीत रस्त्यावर हळूच टाकून द्यावे. प्रार्थनामंदिरातून परत येताना ते ठिकाण लक्षात ठेवून आपण टाकलेले कुलूप पुन्हा शोधून काढावे व स्वतःकडच्या किल्लीने ते बंद करत असताना तोंडाने पुढील वाक्य म्हणावे, "जोपर्यंत हे कुलूप बंद आहे तोपर्यंत मला गर्भधारणा होणार नाही."

आणि ज्या वेळी तिला मूल हवे असेल त्या वेळी तिने हे कुलूप उघडून म्हणावे, "आता मला हवे आहे तेव्हा ते होऊ दे."

प्रार्थनामंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरती पडलेली बिनकिल्ल्यांची उघडी कुलुपे अनेक वेळा पळवली जात. आणि बिचाऱ्या वधूची मोठी पंचाईत होत असे. आणि मग तिला मूल होणे अगर न होणे हे आता आपल्या हाती नाही याची जन्मभर रुखरुख लागून राहत असे. —भ्रमर—

*जर्मनीला सिसेरोकडून फिल्म्सबरोबर दोस्तांच्या तिजोरीच्या चाव्यापण मिळाल्या. जर्मन नेते अजूनपण आपल्या सत्तास्पर्धेच्या खेळात गुंग होते. सिसेरोच्या हालचालींची बातमी ब्रिटिशांना लागली असावी, अशी आमची खात्री झाली. नवीनच नेमणूक केलेली माझी चिटणीस एलिझा, हिची वागणूक संशयास्पद वाटत होती. सिसेरो तर दोस्तांची आणखीनच महत्त्वाची गुपिते आमच्या हाती देत होता. ६ जून १९४४ च्या नॉर्मंडीच्या प्रलयाची सूचना देऊन सिसेरो कुठे नाहीसा झाला ते कळले नाही...*




**एल्. सी. मोझिस**

अनुवाद : **अशोक खरे**

लेखांक : पाचवा

**क**धीतरी हे होणारच होते ते मार्चच्या शेवटच्या आठवड्यात घडले. एलिझाला 'ऑपरेशन सिसेरो' ची चाहूल लागली. एकदा मी काही कारणानिमित्त इस्तंबूलला गेलो होतो, त्याच वेळी बर्लिनहून माझ्यासाठी काही खाजगी पत्रे आली. पण पत्रांवर नेहमीप्रमाणे या वेळी लिहिलेले नव्हते. आणि घोटाळा झाला. एलिझाने पत्र फोडले व तिला सिसेरोची चाहूल लागली.

मी अंकाराला आलो. पत्र देत ती म्हणाली, "हा सिसेरो कोण आहे बाई ?"

मी दुर्लक्ष केले. पण ती जास्तच डोक्यावर बसू लागली. तेव्हा मी स्पष्ट सांगितले, "ऐक. काही गोष्टी अशा आहेत की त्याचे सर्व काम मलाच बघावे लागते. हे त्यांपैकी एक आहे. तेव्हा याबाबत काही विचारू नकोस. उत्तर मिळणार नाही."

"काय माणूस आहे बाई ? या लहानग्या एलिझाला अजूनही विश्वासात नाही का घेतली ?" अवखळपणे ती म्हणाली. या तिच्या बडबडेपणामुळे तिची उचल-बांगडी करण्याचे मी निश्चित केले.

एक दिवस एलिझाच्या आग्रहावरून काही वस्तू खरेदी करण्यास जावे लागले. तिला टर्किश भाषेचा गंधही नव्हता. त्यामुळे तिने माझी मदत मागितली. असे म्हणतात की, शहाण्याने बायकांबरोबर खरेदीस जाऊ नये. ते दुर्दैवी नोकर वस्तूंचा ढीग एलिझाच्या पुढ्यात टाकत होते. पण काहीच तिच्याच पसंतीस येईना. दैवयोग असा की याच वेळी मी सिसेरोला दुकानात येताना पाहिले. पण मी त्याला टाळले. त्यानेही शहाणपणा दाखवला. त्याने स्वत:साठी उंची कपडे मागवले. इतर अनेक वस्तू घेतल्या. इकडे एलिझाचे अजूनही समाधान झालेले नव्हते. सिसेरोने तिचा दुभाषा म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली. एलिझा त्याला फ्रेंचमध्ये सांगे व तो दुकानदाराला टर्कीत सांगे. त्याने तिच्यासाठी अंडरवेअर्सही घेतले. ते अंडरवेअर्स एलिझाच्या मापाचे आहेत की नाही हे पाहण्यासाठी तो पुढे सरसावला. पण एकदम त्याला काय वाटले कोण जाणे, एकदम स्वत:च घालून पाहिले. त्या वेळी तो फार विनोदी दिसत होता.

एलिझाची खरेदी झाली. सिसेरोने तिची वास्तपूत केली व तिचा निरोप घेतला हीच सिसेरोची व एलिझाची पहिली भेट.

दरम्यान एलिझाच्या बापाने पॅपेनला पत्र लिहिले होते. त्यांची एकाएकी बुडा-पस्टला बदली झाल्यामुळे पत्राला उशीर झाला होता. पत्रात त्यांनी मुलीविषयी काळजी व्यक्त केली होती.

अजूनही एलिझाची वागणूक सुधारली नव्हती. पण माझे नशीब, असे की मिसेस् स्नुर्शेन पुन्हा आपल्या कामावर रुजू झाली व पुन्हा एलिझाची तिच्या भाषांतराच्या कामावर रवानगी झाली. चुका पुन्हा दिसू लागल्या.

एक दिवस मी भडकून तिला स्पष्ट सांगितले की, "असल्या गचाळ कामाची मला मुळीच जरुरी नाही. तुझे काम म्हणजे चुकांचा डोंगर आहे. चल कर हे भाषांतर पुन्हा."

ते 'टाइप केलेले कागद तिच्या अंगावर फेकले. ती रागाने थरथरली. ते कागद उचलून अक्षरही न बोलता ती चालती झाली. नंतर बराच वेळ तिचे हुंदके मला ऐकू येत होते.

मी एलिझाची समजूत काढायला गेलो. ती फणकाऱ्यात म्हणाली, "बाकी कशाचे नाही; पण तुम्ही ज्या तऱ्हेने मला वागवता त्याचे फार वाईट वाटते. मला

भाषांतराचे काम मुळीच आवडत नाही. मला दुसरे एखादे काम द्याल तर बरे होईल."

तुला काम आवडत नसेल तर तू परत सोफियाला जाऊ शकतेस. मी तुला अडवणार नाही."

"म्हणजे माझी अडगळ व्हायला लागली तर" ती मुसमुसत म्हणाली. थोड्याच वेळात ती पाय आपटत निघून गेली व तासाभरातच क्षमा मागण्यास पुन्हा आली. मला वाटले आतातरी जाईल, पण छे.

एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यातील सोमवार उजाडला. ईस्टरचा सण जवळ येऊ लागला. तिच्या बापाने ईस्टरच्या दरम्यान तिला नोकरीतून मुक्त करण्यास सांगितले होते. त्यामुळे मीही जरा आनंदात होतो. एक दिवस आपणहून मला विचारले,

"साहेब, मला ईस्टरसाठी काही दिवस रजा मिळेल काय? बुडापेस्टमध्य माझ्या आईवडिलांना मी भेटीन. माझा भाऊही रजेवर येणार आहे. किती किती मजा येईल! द्याल ना रजा?"

मला फारच आनंद झाला. पण ते तिला दाखवायचे नव्हते. मुद्दामच मी रागाने म्हणालो,

"रजेवर जायला चांगली वेळ साधली अं! ते तुंबलेले काम कोण करणार?"

"साहेब, गुरुवारच्या आत सर्व काम संपवते. परंतु प्लीज रजा देणार ना?" ती लाडात आली.

"या एकाच अटीवर तू रजा घेऊ शकतेस. तुला विमानात जागा मिळवून देण्याचे काम माझ्याकडे लागले. पण काम मात्र संपवलेच पाहिजेस."

मंगळवार-बुधवार माल खरेदीसाठी ऑफिसात आली नाही. बुधवारी संध्याकाळी थोडेसे काम केले. माझे सारखे आभार मानत होती आज. आज विशेष खुशीत होती ती.

तोपर्यंत मीही तिच्यासाठी इस्तंबूलचे तिकीट काढले होते; पण त्याच्यासाठी मला दुप्पट पैसे भरावे लागले. कारण रेल्वेक्लार्कने सर्व तिकीटे संपल्याचे सांगितले होते.

## एलिझा निसटली

एप्रिल १९४४ चा दिवस उजाडला. एलिझाने आमचा निरोप घेतला. स्नुर्शेनसाठी बुडापेस्टमधून विशेष पदार्थ आणण्याचे कबूल केले व आनंदातच तिने ऑफिस सोडले. अर्थात तिकीटे माझ्याकडे ठेवली होती. ती खरोखरच इस्तंबूलला जाते का आणखी कोठे याची मला खात्री करायची होती.

संध्याकाळी ५॥ च्या सुमारास मी स्टेशनवर पोचलो. इस्तंबूलला जाणारी रेल्वे स्थानकावर उभीच होती.

"ती मूर्ख मुलगी अजून कशी येत नाही?" मी माझ्याशीच म्हणालो. गाडी

सुटायला पंधरा मिनिटे वेळ होती. स्टेशनवर मी फेऱ्या घालीत होतो. ओळखीचा आवाज वाटला म्हणून मागे पाहिले तो वकिलसाहेब एका बडया पाहुण्याला पोचवायला आलेले दिसले. त्याचा निरोप घेतल्यावर वाटेतच त्यांची व माझी भेट झाली. एलिझा आज रजेवर जात आहे हे त्यांना मी सांगितले होते व ते म्हणाले होते, " सुंठीवाचून खोकला गेला. बरं झालं. "

ते माझ्याजवळ आले व म्हणाले,

" तुझी ती सेक्रेटरी येत नाहीसे दिसते. नाहीतर गाडी सुटायच्या वेळेवर यायची धडपडत. अनेक बायकांना सवय असते तशी. " मला तिच्यावर लक्ष ठेवण्यास सांगून ते निघून गेले.

इतक्यात इस्तंबूल एक्स्प्रेसने शिटी मारली व ती जागची हलली. आता मात्र ती येत नाही हे नक्की झाले. तरीही गाडी स्थानक सोडेपर्यंत वाट पाहिली. पण छे, ती आलीच नाही. माझा मस्तकशूळ उठला. मी तडक तिच्या हॉटेलात गेलो. तिच्या खोलीवर येऊन बेल दाबली, एका सुंदर तरुणीने दार उघडले. मी विचारले,

" ती कार्टी एलिझा कुठाय ?"

मी तिचा बाप असावा अशी तिची समजूत झाली असावी. पण माझ्या ते फायद्यात पडले. तिने खरी बातमी सांगितली की सर्व सामान घेऊन ती तीनच्या सुमारास बाहेर पडली आहे. मी खोलीत शिरलो. तिच्या खाटेवर बसलो व विचार करू लागलो. तिला अपघात झाला की काय ? का तिने आत्महत्या केली ? काहीच सुचेना. ब्रिटिशांना जाऊन मिळाली असेल तर मात्र आपला खासच शेवट झाला.

मी माझी मोटार बाहेर काढली. शहराचा प्रत्येक कानाकोपरा तपासला. सर्वांना मी एकच प्रश्न करी, " माझ्या सेक्रेटरीस पाहिली काय ?" पण सगळे नकार देत.

### ते कॉन्सेंट्रेशन कॅम्प्स

मी असहाय्य झालो. तिनेसुद्धा फितुरीचा मार्ग स्वीकारला काय ? नाही...नाही. ते शक्य नाही. जर्मनीतील बडया राजकारण्याची मुलगी असे कसे करील ?...अरे, पण हे काय तो पाहा, तो पाहा कॉन्सेंट्रेशन कॅंप. ती पाहा त्यात कोंबली जाणारी माणसे. ते निरागस चेहरे, त्या पाहा सुकुमार ललना कशा कोमेजून गेल्या आहेत... खाड् खाड्...आणि हा आवाज तर ओळखीचा वाटतो. होय तोच. तोच तो गेस्टापो. जणू यमराजच येत आहे. ती पाहा त्याची मग्रूर मुद्रा, डोळ्यांतील रानटी भाव, स्त्रियांकडे बुभुक्षित नजरेने पाहणारा तो राक्षस, बालकांना गॅस चेंबरमध्ये ढकलणारा तो खाटिक...अयाई,...अरेरे, गेला गेला बिचारा. माणूस असून कुत्र्याप्रमाणे मेला. पाणी पाणी करीत मेला. आणि हे काय. ही परेड कसली. तो पाहा काल्टेन्, रिबेन्ट्रॉप आदी नेते. कुठे चाललेत ते ? देहदंड भोगायला का ? हो. तसेच वाटते.

" अहो, उठा आता. किती वेळ असल्या स्थितीत झोपणार ?" मी खडबडून जागा झालो, तो समोर माझी प्रिय पत्नी उभी होती. माझ्या डोळ्यांत अश्रू जमा झाले.

जरा वेळाने मी पुन्हा एलिझाच्या शोधार्थ निघालो. पुन्हा एकदा हॉटेलात जावे असा विचार केला. अजूनही माझी विचारमालिका तुटली नव्हती. त्याच धुंदीत मी खोलीजवळ आलो. बेल दाबली. दार उघडले गेले. एका वृद्ध बाईने माझे स्वागत केले.

"ती कुठाय ?" तिला ऐकू आले नाही.

"ते घरात नाहीत. आताच बाहेर गेलेत." ती म्हणाली. ते! ते कोण? मी दारावरची पाटी पाहिली. तेव्हा समजले ती खोली ब्रिटिश वकिलातीतील दुय्यम चिटणीसाची होती. झाला, अपशकुन झाला. डोके शाबूत ठेवून मी आता एलिझाच्या खोलीत आलो. तिचा पत्ता नव्हता. प्रकरण विकोपास गेले. मी ताबडतोब टर्कीच्या गृहमंत्र्याला फोन केला. जानी दोस्त होता तो माझा. मी त्याची भेट मागितली.

साधारण अर्ध्या तासातच त्याने मला भेटीस बोलावले.

मी त्यास सर्व काही सांगितले.

त्याने मला स्पष्ट सांगितले, "अपघात वगैरे काही नाही. मला वाटते ती फितुर झाली आहे." मी उठलो. उठवत नव्हते तरीही उठलो. तो मला दारापर्यंत पोचवायला आला.

"देवा, माझ्या मित्रासाठी तरी हा तर्क खोटा ठरो !" तो म्हणाला.

आता मात्र बर्लिनला कळवणे भाग होते. कळवणे कसले यमराजाला आपणहून भेटण्याची तयारीच होती ती. तरी मला तसे करणे भाग होते. आत्महत्या का फितुरी ! दोघांचीही शक्यता सारखीच.

मी बर्लिनला संदेश दिला. अपेक्षेप्रमाणे बर्लिनहून संतापयुक्त संदेशांचा भडिमार झाला. एलिझाच्या बापाकडूनही काहीच समजले नाही, म्हणून मी फारच बुचकळ्यात पडलो. तिला अदृश्य होऊन आज पाच दिवस झाले. तोच काल्टेन्‌ने मला ताबडतोब बर्लिनला येण्यास सांगितले.

१२ एप्रिलला मी इस्तंबूलला आलो. १३ ला खास विमानाने मी बर्लिनला जाणार होतो.

आमच्या वकिलातीत टपाल वेगळे करण्याचे काम चालू होते. माझ्यासाठी काही टपाल आहे का म्हणून मीही पाहू लागलो. तेव्हा काल्टेनची दोन पत्रे व रिबेन्ट्रॉपचे एक अशी पत्रे मिळाली. तीनही पत्रांत एलिझा फितुर झाल्याबद्दल मला दोष दिला होता व मलाच जबाबदार धरण्यात आले होते. ती पत्रे बॅगमध्ये घुसडली तोच एक मळकट पाकिट माझ्या दृष्टीस पडले. अर्थात् ते माझ्यासाठीच होते. ते मी फोडले व वाचू लागलो. परराष्ट्र खात्यात काम करणाऱ्या एका दोस्ताचे होते ते. त्याने आगाऊ जाणीव दिली होती,

"जर्मनीला येताच अटक होण्याचा संभव. कारण एलिझाला पळून जाण्याची फूस दिल्याचा गंभीर आरोप तुझ्यावर ठेवण्यात आला आहे."

याचा अर्थ उघड होता.

[ अपूर्ण ]

# प्रपंचात साक्षित्वाने वागावे

सत्य वस्तू ओळखणे हा परमार्थ आणि असत्य वस्तूला सत्य मानून चालणे हा प्रपंच होय. आपल्याला वस्तू दिसते ती असेलच असे नाही. पण ती मुळीच नाही असे मात्र नाही. ती काहीतरी आहे. एका दृष्टीने खरी वस्तू अशी आहे की प्रत्येकजण जो गुण त्या वस्तूला लावतो ते सर्व गुण तिच्या ठिकाणी आहेतच; शिवाय आणखी कितीतरी गुण तिच्या ठिकाणी आहेत, म्हणून ती निर्गुण आहे. दुसऱ्या दृष्टीने ती अशी आहे की, प्रत्येकजण जो गुण तिला लावतो तो कल्पनेनेच तिच्या ठिकाणी आहे, असे आपण म्हणतो. म्हणून ती वस्तू गुणांच्या पलीकडे आहे. या अर्थानेसुद्धा ती निर्गुणच आहे. जशी आपली देहाची रचना तशीच सर्व सृष्टीची रचना आहे. देहामधील पंचकोश सृष्टीमध्येदेखील आहेतच. फरक एवढाच की देहामध्ये ते मूर्त आहेत तर सृष्टीमध्ये ते अमूर्त स्वरूपात आहेत. भगवंताला एकटचाला करमेना म्हणून तो एकाचा अनेक झाला. त्याचा हा गुण माणसाने घेतला. आपण हौसेसाठी आपला व्याप वाढवितो, पण भगवंताने व्याप वाढविला तरी त्यामध्ये तो साक्षित्वाने राहिला आणि आपण मात्र व्यापामध्ये सापडलो. भगवंत हा सुखदुःखाच्या पलीकडे राहिला पण आपण मात्र दुःखात राहिलो. व्यापाच्या म्हणजे परिस्थितीच्या बाहेर जो राहील त्याला दुःख होणार नाही. खरे पाहिले तर व्यापातून वेगळेपणाने राहण्यासाठी सर्व घडपड आहे. व्याप दुःखदायक न व्हावा, असे वाटत असेल तर आपण साक्षित्वाने राहण्यास शिकले पाहिजे. आपल्याला झोप लागली की काय 'जाते' व जागे झालो की काय 'येते' हे नित्याचे असून आपणांला कळत नाही. जगणे म्हणजे शरीरात चैतन्य असणे होय. चैतन्य हे केवळ सच्चिदानंदात्मक आहे, म्हणून जोपर्यंत आपण जिवंत आहोत तोपर्यंत स्वाभाविक आनंद असलाच पाहिजे. हा आनंद आपण भोगावा. ब्रह्मानंद व सुषुप्ती यांमध्ये फरक आहे. ब्रह्मानंद हा आहेपणाने आहे व सुषुप्तीचा आनंद हा नाहीपणाने आहे. शिवाय ब्रह्मानंद एकदा प्राप्त झाला की तो पुन्हा नाहीसा होत नाही, पण सुषुप्तीचे तसे नाही. भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला उदासीनता कधीच नाही, परंतु जसे नाटकात पार्ट घेतल्यानंतर ते काम उत्तम केले पाहिजे तसे अज्ञान पांघरलेल्या रामचंद्राने उदासीनता दाखविली. जे बाधते ते सोडणे हा त्याग होय, जे आपल्या साधनाच्या आड येते त्याला दूर ठेवणे हे त्यागाचेच लक्षण आहे. आपण प्रपंच पुरा होण्याकरिता मरेपर्यंत कष्ट सोसतो. वाटेल तो त्याग करायला तयार असतो मग परमार्थाच्या वाढीकरिता, साधनास जोर येण्याकरिता मन घट्ट करून विषयाचा त्याग केला तर त्यामुळे प्रपंचाचेही कल्याणच होईल.

# प्रपंचातील लाभहानी

प्रपंच हा परमेश्वरप्राप्तीच्या आड कधीही येऊ शकत नाही. आपण पाहतोच की प्रपंचात आपला किती तरी लोकांशी निरनिराळया स्वरूपात संबंध येतो. आई-वडील, बायको, मुले, बहीण, भाऊ, मित्र व इतरेजन या सर्वांचा जर उत्तम उपयोग करायचा असेल, तर या सर्वांशी आपण व्यवहार करताना आपली सर्व कर्मे एका हरिस्मरणाच्या धाग्यात ओवून करावीत म्हणजे सर्वांशी संबंध सलोख्याचे राहून, प्रपंच फार सुखकर होईल. निदान तो तापदायक तरी खचित होणार नाही. या सर्वांशी संबंध बिघडण्यास आपला अभिमान, अहंपणा हा विशेषेकरून कारणीभूत होत असतो. हा अभिमान श्रीमंतांनाच असतो असे नाही तर गरिबांनाही तो सोडत नाही. आपण पुराणात वाचलेच आहे की हिरण्यकशिपूला जेव्हा भगवंतांनी मांडीवर घेऊन पोट फाडण्यास सुरुवात केली, तेव्हा त्याचा हात अभिमानाने तरवारीकडे गेला. प्रत्यक्ष भगवंत समोर असूनही, त्याने काही हात जोडले नाहीत. केवढा हा अभिमानाचा जोर ! गरीब लोकसुद्धा या अभिमानाच्या आहारी किती गेलेले असतात ! एकदा एक भिकारी एकाच्या दाराशी येऊन भिक्षा मागू लागला, तेव्हा तो गृहस्थ त्या भिकाऱ्याला म्हणाला " तुला काही काळवेळ समजते की नाही ?" त्यावर तो भिकारी म्हणाला की, मला काही तुमच्या एकटयाचेच घर नाही, अशी गावात शंभर घरे आहेत." पाहा, अभिमानाचे तण किती खोल गेलेले असतात. अभिमान हा शेतात उगवणाऱ्या हरळीसारखा आहे. ही हरळी समूळ नाहीशी केल्याशिवाय चांगले पीक हाती येत नाही. त्याप्रमाणे अभिमान संपूर्णपणे नाहीसा झाल्याशिवाय परमेश्वरीकृपेचे पीक येणेच शक्य नाही. तुमच्या इकडच्या भागात फणस विपुल आहेत. तो चिरताना एक काळजी घ्यावी लागते. हाताला तेल लावून तो कापावा लागतो व त्यातील गरे काढावे लागतात. त्यामुळे हाताला चिकाचा वगैरे त्रास न होता गरे चटकन निघतात, त्याचप्रमाणे प्रपंचात 'नाम' घेऊन व्यवहार केल्यास अभिमानाचा किंवा विषयवासनेचा चीक हाताला न लागता हा अहंपणा टाकल्यास प्रपंचातील लाभहानी हसत खेळत झेलता येईल. लहान मुले पावसाळयात कागदाच्या होडया करून सोडतात, त्यांतील होडी बुडाली तरी हसतात, तरली तरी हसतात, तसे आपण प्रपंचात वागावे. ज्याने नामस्मरण हेच परमेश्वरप्राप्तीचे स्थान मानले त्याने प्रपंचात सर्व काही मिळवले.

● ● ●

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक अकरावा

अरुण साधू

चुह तेह या नावालाच चिनी भाषेत एक विशिष्ट अर्थ आहे. चुह तेह म्हणजे 'लाल चांगुलपणा.' चीनच्या मध्य भागातील स्झेचुआन प्रांतात नी लिंग येथे त्याचा जन्म झाल्यावर त्याच्या आईबापांनी मोठ्या हौसेने जेव्हा मुलाचे नाव चुह तेह ठेवले, तेव्हा भविष्यात या नावाला कोणता भयंकर अर्थ प्राप्त होणार आहे याची त्यांना कल्पनाही नसेल. जर ही कल्पना असती तर त्यांनी घाबरून जाऊन ते नाव बदलूनच टाकले असते.

कम्युनिस्टांच्या अधिकृत चरित्रकारांचे मांडणीनुसार चुह तेह हा अगदी खालच्या थरातल्या कुटुंबातून वर आला असून त्याने आयुष्यातील अनेक वर्षे अतिशय कष्टाचे हमाली काम करण्यात घालविली. परंतु चुह तेहचे असे वर्णन करून खरे म्हणजे कम्युनिस्ट त्याचे मोठेपण कमी करतात. चुह तेहचे पूर्वायुष्य आणि त्यातील बदल हा अधिक उदात्त आणि त्याचा मोठेपणा दर्शविणारा आहे.

अत्यंत श्रीमंत जमीनदाराच्या घरात जन्म झालेल्या चुह तेहचे सुरुवातीचे आयुष्य एखाद्या राजपुत्राप्रमाणे चैनीत आणि विलासात गेले. परंतु आयुष्यातील सारी तारुण्यावस्था आणि काही प्रौढावस्था अशा बेजबाबदार चैनबाजीत गेल्यावर त्याचे एकाएकी परिवर्तन झाले. आपली सारी मानसिक शक्ती पणाला लावून तारुण्यातील सारी दुर्व्यसने त्याने तोडून टाकली. आपल्या घरादाराचा त्याग केला

आणि क्रांतिकार्याला आपले सारे आयुष्य अर्पण केले. ज्या क्रांतिकार्याच्या ओढीने चुह तेहमध्ये हा आमूलाग्र बदल घडवून आणला, त्या क्रांतिकार्याच्या यशासाठी त्याने तळहातावर शिर घेऊन आयुष्यभर लढा दिला. त्याच्या मस्तकासाठी त्याच्या शत्रूंनी १५ लाख रुपयांचे बक्षीस लावले होते.

## बालपण आणि तारुण्य

आपल्या विलासी तारुण्यात चुह तेह अतिशय उच्छृंखल, धाडसी आणि धीट होता. जुन्या चिनी काव्यातील स्झेचुआन प्रांतात नद्याखोरी व जंगलांमध्ये लढणाऱ्या आणि मुक्त संचार करणाऱ्या नायकाची त्याला फार ओढ होती. त्यामुळे लष्करी जीवनाकडे तो साहजिकच आकर्षित झाला. त्या वेळी नव्यानेच स्थापन झालेल्या युनान मिलिटरी अॅकेडमीत आपल्या घराण्याच्या नावाच्या जोरावर त्याला प्रवेश मिळाला. युनान मिलिटरी अॅकेडमी ही आधुनिक लष्करी शिक्षण देणारी चीन-मधील पहिलीच संस्था होती. ज्या थोड्या चिनी विद्यार्थ्यांना आधुनिक लष्करी शिक्षण प्रथम मिळाले त्यांमध्ये चुह तेह होता.

शिक्षण पुरे झाल्यानंतर चुह तेहने युनानच्या 'परकीय' सैन्यात प्रवेश केला. त्या सैन्याला स्थानिक लोक 'परकीय' म्हणत. कारण त्यांच्या युद्धाच्या आणि कवायतीच्या पद्धती परकीय होत्या आणि परंपरागत चिनी पद्धतीप्रमाणे हे आधु-निक सैन्य वाद्यवृंदाच्या संगीताच्या सुरावर लढाई करीत नसे. हे 'परकीय' सैन्य चीनमध्ये प्रथमच आधुनिक शस्त्रास्त्रे वापरू लागले होते.

१९१२ साली मांचु राजघराणे पदभ्रष्ट करण्यास या युनानच्या सैन्याचा मोठाच हातभार लागला आणि याच सुमारास चुह तेहने एक शूर योद्धा म्हणून नाव कमविले. डॉ. सन् यत सेननंतर प्रजासत्ताकाचा अध्यक्ष झालेला जनरल युआन शिह कै याने स्वतःला १९१३ साली बादशाहा म्हणून अभिषेक करवून घेतला तोवर चुह तेह ब्रिगेडियर जनरलच्या पदापर्यंत पोचला होता. आणि त्याच्याच युनानी सैन्याने प्रथम युआनविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला आणि युआनचा बेत शेवटी हाणून पाडला. याच सुमारास दक्षिणेमध्ये उत्तरेकडचे जे चार जहाल-जन-रल्स म्हणून प्रसिद्धी पावले त्यांमध्ये चुह तेह होता.

अशा रीतीने लष्करात त्याचे नाव सर्वतोमुखी होत असतानाच राजकारणानेही त्याला एकदम हात दिला. युनान प्रांतातील नागरी संरक्षणाच्या आणि अर्थखात्याच्या संचालकाचे पद त्याला मिळाले. ही पदे फार महत्त्वाची आणि मोठ्या अधिकाराची होती.

चीनमधील युनान आणि स्झेचुआन हे दोन अफूचे प्रांत म्हणून फार कुप्रसिद्ध होते. या दोन्ही प्रांतांत चहाप्रमाणेच अफूचेही सेवन सरसकट होत असे. आईबाप आपल्या अर्भकांनी आणि मुलांनी गडबड न करता स्वस्थ पडून राहावे म्हणून त्यांना मिठाईबरोबर अफू देत. या दोन्ही प्रांतांतील सरकारी अधिकारी हे भ्रष्टाचारी

आणि अफूचे व्यसनी असणारच हेही गृहीत असावयाचे.

जनरल चुह तेहचे बालपण आणि तारुण्य याच दोन प्रांतांत गेले होते. त्यामुळे अगोदरच त्याला अफूसेवनाचे जबरदस्त व्यसन जडले होते. त्यात युनान प्रांतात त्याला मानाची जागा मिळाली. त्या वेळच्या नोकरशाहीच्या प्रथेप्रमाणे त्याने आपल्यासाठी आणि आपल्या कुटुंबियांसाठी भरपूर संपत्ती जमा करून ठेवली.

आपल्यासाठी त्याने एक मोठा जनानखाना जमा केला. अनेक लग्ने केली. रखेल्या ठेवल्या आणि त्यांच्यासाठी युनानच्या राजधानीत टोलेजंग राजवाडे उठवले. थोडक्यात म्हणजे जनरल चुह तेह अत्यंत सुखात होता. जगातील सारी सुखे त्याच्या पायांशी लोळण घेत होती. ऐश्वर्य, सत्ता, मान, मोठे पद, बायका आणि भविष्याची निश्चिती. सारे सारे काही होते. पण या सर्वांत त्याला एकच अतिशय वाईट खोड होती. ती म्हणजे पुस्तके वाचण्याची.

## क्रांतीची धुगधुगती ज्योत

या साऱ्या चैन विलासात मश्गुल असतानाही चुह तेहमध्ये तत्त्वप्रियतेची आणि क्रांतिप्रियतेची लहानशी ज्योत धुगधुगत होतीच. त्याच्यावर त्याच्या वाचनाचा आणि परदेशांतून शिक्षण घेऊन युनानमध्ये परत आलेल्या विद्यार्थ्यांचा हळू हळू प्रभाव पडू लागला. १९११ साली झालेल्या क्रांतीने एकूण जनतेचे काहीच हित झाले नाही, हे आता कुठे त्याच्या ध्यानात आले. या उठावाने एका जुलमी नोकरशाहीची जागा दुसऱ्या जुलमी नोकरशाहीने घेतली एवढेच, हेही त्याला कळून चुकले. आणि या चैनीतही त्याला आपल्या देशाबद्दल मनापासून काळजी वाटू लागली. आपल्या विलासांची, आपल्या व्यसनांची, आपली राजधानी युनानफू येथील ४० हजार गुलाम स्त्रियांची, त्याला एकाएकी शरम वाटू लागली आणि त्याच वेळी पाश्चात्त्य धर्तीवर चीनचे आधुनिकीकरण करावे, असे त्याला तीव्रतेने वाटू लागले. तो जो जो अधिक वाचू लागला तो तो स्वत:विषयीच्या शरमेने तो जळून जाऊ लागला. आणखी अभ्यास करण्याची, दूर कुठे प्रवास करण्याची इच्छा त्याच्यात निर्माण झाली. आणि त्याने निर्णय घेतला.

१९२२ साली म्हणजे वयाच्या सदतीसाव्या वर्षी त्याने आपल्या बायकांच्या आणि रखेल्यांच्या जनानखान्यातून स्वत:ला मुक्त करून घेतले. साऱ्या स्त्रियांना पेन्शने देऊन वाटेला लावले. त्याचे हे धाडसाचे कृत्य चिनी परंपरेत न बसणारे होते. परंतु कुणाची पर्वा न करता चुहने ठरवलेल्या गोष्टी अंमलात आणल्या. युनान सोडून तो शांघाय येथे गेला. तेथे अनेक क्रांतिकारकांशी त्याच्या ओळखी झाल्या. पण हे क्रांतिकारक त्याला मुळीच मान देत नसत. एक जुना लष्करशहा, भ्रष्ट अधिकारी, अफूचा व्यसनी आणि अनेक बायका ठेवणारा म्हणून ते चुहचा तिरस्कार करीत. तो क्रांतिकारक होणे त्यांच्या मते शक्य नव्हते.

दरम्यान चुह तेहने आपली सारी व्यसने सोडण्याचे ठरविले. अफूपानाचे त्याचे

व्यसन फार जुने होते. पण त्याची इच्छाशक्ती अतिशय प्रबळ होती. अफूपान त्याने एकदम बंद केले. अफूशिवाय त्याला कित्येक दिवस बेशुद्धीत पडून राहावे लागले. अफूपानाची वारंवार होणारी प्रबळ इच्छा महत्प्रयासाने त्याला मोडून काढावी लागली. शेवटी काही औषधे घेऊन त्याने यांगत्सी नदीवरील एका ब्रिटिश जहाजावर प्रवेश मिळविला. हे जहाज शांघायपासून यांगत्से नदीमध्ये व्यापारासाठी प्रवास करीत असे आणि जहाजावर अफूपानाला बंदी होती. एक महिना या जहाजावर राहून चुह तेह आपल्या व्यसनाशी निकराचा सामना करीत होता. अफूची इच्छा झाली की, तो अतिशय अस्वस्थपणे जहाजाच्या डेकवर भराभरा चकरा मारी पण इच्छेला बळी पडून किनाऱ्यावर मात्र कधी उतरत नसे.

एक महिन्यानंतर तो जहाजातून खाली उतरला तेव्हा अफूपानाने लाल झालेले त्याचे डोळे आता स्वच्छ झाले होते. चेहऱ्यावर तेज आले होते आणि चालण्यात नवा आत्मविश्वास आला होता. शांघायच्या एका रुग्णालयात आणखी काही दिवस काढून तो पूर्ण व्यसनमुक्त झाला आणि नव्या जोमाने त्याने आपल्या नव्या आयुष्याला सुरुवात केली.

वयाची चाळीशी जवळ आली होती तरी आणखी शिकण्याची चुह तेहला जबरदस्त इच्छा होती. काही चिनी विद्यार्थ्यांबरोबर तो खास शिक्षणासाठी म्हणून जर्मनीला गेला. त्याला फ्रेंच भाषा येत नव्हती. जर्मन भाषा तर अगदीच मोडकी तोडकी येत होती. त्यामुळे शिकण्याची त्याला फार अडचण पडत होती. परंतु आपल्या चिनी मित्रांच्या साहाय्याने त्याने कसून वाचन केले. जर्मनीमधील चिनी विद्यार्थी त्याच्या मुलांसारखे शोभत. पण त्यांच्याजवळ बसून त्यांच्याकडून शिकण्यात त्याला मुळीच कमीपणा वाटत नसे.

जर्मनीतील हॅनोव्हर या शहरात चुह तेह राहत होता. तेथील जर्मन कम्युनिस्टांशी त्याचा निकटचा संबंध आला आणि आपल्या मायदेशाला दारिद्र्याच्या जोखडातून सोडविण्याचा नवा मार्ग त्याला दिसू लागला. कम्युनिस्ट वाङ्मयाचाही त्याने इथेच अभ्यास केला. जर्मनीतील कम्युनिस्ट चळवळ त्या वेळी जोरात होती. तीपासून स्फूर्ती घेऊन तेथील चिनी विद्यार्थ्यांनी चिनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. त्यात चुहनेदेखील भाग घेतला होता.

जर्मनीतून चुह फ्रान्समध्ये गेला. आणि पॅरिसमध्ये वु त्झे हुई या जुन्या कोमिन्टांग क्रांतिकारकाने स्थापन केलेल्या चिनी शाळेत त्याने काही काळ शिक्षण घेतले आणि तेथून तो मॉस्कोला गेला. मॉस्कोतील ईस्टर्न टॉईलर्स विद्यापीठात त्याने प्रवेश मिळवून तेथील चिनी अध्यापकांच्या हाताखाली मार्क्सवादाचा अभ्यास पूर्ण केला.

१९२५ च्या शेवटास जनरल चुह तेह मॉस्कोहून शांघायला परतला आणि पुन्हा आपल्या जुन्या युनानी सैन्याला जाऊन मिळाला. या सैन्याचा प्रमुख जनरल

चुह् पै तेह् याचे त्या वेळी कोमिन्टांग लष्करात बडे प्रस्थ होते. जनरल चँग-कै-शेकनंतर त्याच्याच मताला मान होता. १९२७ मध्ये चँगच्या उत्तरेच्या मोहिमेत या युनानी सैन्याने चांगलीच कामगिरी बजावली आणि यांग-त्से नदीच्या दक्षिणेचे अनेक प्रांत त्यांनी ताब्यात घेतले. जनरल चुह् पै तेह्ने जनरल चुह्ला कियांगसी प्रांताची राजधानी नानचांग येथे प्रांताच्या संरक्षणव्यवस्थेचा प्रमुख म्हणून पाठवले. कियांगसी प्रांताच्या दक्षिणेस त्याच वेळी डाव्या कोमिन्टांगचे काही सैन्य होते आणि जनरल चँग-कै-शेकला मिळण्यासाठी ते उत्तरेकडे जात होते. या सैन्याचा तळही नानचांग येथे पडला.

## लाल उडी !

१ ऑगस्ट १९२७ हा जनरल चुह् तेह्च्या निर्णयाचा दिवस होता. दोन्ही लष्करी तळांतील कम्युनिस्टांनी उचल खाल्ली होती. त्यांना जनरल चुह्चा पूर्ण पाठिंबा होता. पण त्याच्यावरील जनरल चुह् पै तेह् याने हा उठाव दडपून टाकण्याची आज्ञा जनरल चुह्ला दिली. आजपर्यंत जनरल चुह् याने उघडपणे कधी कम्युनिस्टांना पाठिंबा दिला नव्हता. शेवटी त्याने निर्णय घेतला आणि जाहीरपणे त्याने कम्युनिस्टांच्या बाजूने उडी घेतली. उठावात कम्युनिस्टांच्या बाजूने उडी घेणारा दुसरा नेता होता चाऊ–एन्–लाय.

उठाव यशस्वी झाला खरा, पण नानचांग शहर फार दिवस कम्युनिस्टांच्या ताब्यात राहू शकले नाही. काही दिवसांनी कम्युनिस्ट दोन तुकड्यांनी नानचांग-बाहेर पडले.

नानचांगमधून निघाल्यानंतर चुह् तेह्च्या क्रांतिकारक सैन्याने स्वाटोव या दक्षिणेकडील शहरावर हल्ला केला. त्यावर त्यांनी पूर्ण ताबा मिळवला. पण पुन्हा त्यांना तेथूनही पळून हुनान-कियांगसी सीमेवर यावे लागले. चुह्च्या हाताखाली त्या वेळी व्हाम्पोआत शिक्षण मिळालेला चेन-यी (सध्याचा कम्युनिस्ट चीनचा परराष्ट्र मंत्री ) आणि लिन पियाओ ( सध्याचा चिनी संरक्षण मंत्री आणि सैन्यप्रमुख ) यांसारखे अधिकारी होते. स्वतःला चुह्चे सैन्य ' लाल सैन्य ' असे अद्याप म्हणवून घेत नव्हते. राष्ट्रीय क्रांतिकारक सैन्य असेच ते स्वतःला म्हणवून घेत. स्वाटोवमध्ये पराभव पत्करावा लागल्याने सैन्यातील बरीच माणसे सोडून गेली होती. असलेल्या ९०० सैनिकांजवळही पुरेशा बंदुका आणि दारूगोळा नव्हता.

अशा स्थितीतच जनरल चुह्ला युनानमधील एक सरदारी सेनापती जनरल फॅन शिह् थेंग याची आपणांला येऊन मिळण्याची सूचना आली. जनरल फॅनची प्रचंड सेना त्या वेळी दक्षिण हुनानमध्ये होती. तो स्वतः कम्युनिस्ट नव्हता पण कम्युनिस्टांचा चाहता आणि जनरल चँग-कै-शेकचा कट्टर विरोधक होता. त्याच्या सैन्यास जनरल चुह्चे छोटे सैन्य येऊन मिळाले आणि जनरल चुह्ला मोठ्या मानाची जागा मिळाली. पण इथेच एका जिवावरच्या प्रसंगातून चुह् कसाबसा वाचला.

चुह-फॅन युतिपासून जनरल फॅनच्या सैन्यातील कम्युनिस्टांचा प्रभाव वाढू लागला आणि त्यामुळेच फॅनच्या सैन्यात एक कम्युनिस्टविरोधी गट तयार झाला या गटाचे गुप्त संबंध चँग-कै-शकशी होते. जनरल चुहविरुद्ध उठाव करण्याचे या गटाने ठरविले.

एका प्रवासामध्ये चाळीस जणांच्या छोट्या तुकडीसह जनरल चुह एका खाणावळीत मुक्कामाला असताना एकाएकी या गटाने खाणावळीवर हल्ला केला. एकदम गोळीबारास सुरुवात झाली. पण रात्र अंधारी होती. स्पष्ट काहीच दिसत नव्हते. चुह तेह पकडला गेला. पाच-सहा जण त्याच्यावर पिस्तुले रोखून होते. ते गोळ्या झाडणार एवढ्यात चुह ओरडला, " मला मारू नका. मी सैपाकी आहे. तुमच्या अन्नदात्याला तरी मारू नका. "

त्याबरोबर मारेकऱ्यांना त्याची दया आली. त्याची अधिक तपासणी करण्यासाठी त्याला बाहेर प्रकाशात नेण्यात आले. त्याबरोबर एकाने त्याला ओळखले आणि तो ओरडला, " हाच् चुह तेह. मारा त्याला "

पण चुह तेहीने एव्हाना आपल्या पोशाखात लपवून ठेवलेले पिस्तुल बाहेर काढले होते. त्या ओरडणारावरच त्याने गोळी झाडली आणि त्याला पकडून ठेवणाऱ्या सैनिकांच्या हातांना हिसके देऊन तो अंधारात निसटला. त्याच्यासारखे त्याचे फक्त पाचच अनुयायी जिवंत निसटू शकले.

चुह तेह जिवंतपणे आपल्या सैन्याला जाऊन मिळाला खरा पण आता जनरल फॅनबरोबर आणखी काही काळ युती कायम ठेवणे, शक्य होणार नाही हे त्याने जाणले. आणि जनरल फॅनची त्याने आपल्या सैन्यासह रजा घेतली. फॅनला खरे म्हणजे चुहचे सहकार्य हवे होते. कारण चँग-कै-शेकच्या विरोधात चुहचा चांगला उपयोग होईल हे तो जाणून होता. त्याचबरोबर या अल्पकालीन युतीमध्येही चुहने फॅनच्या सैन्यातील बऱ्याच अधिकाऱ्यांचा विश्वास आणि आदर संपादन केला होता. निदान चुहशी संबंध तरी चांगले राहावेत म्हणून जनरल फॅनने चुहच्या सैन्याला भेट म्हणून ५० हजार डॉलर्स दिले.

परंतु चुहच्या सैन्याची स्थिती तेवढीशी चांगली नव्हती. फॅनचे पैसे ही स्थिती सुधारायला विशेष उपयोगी पडले नाहीत. सैनिक जनरल चुहच्या आज्ञा मानत होते ते केवळ त्याच्यावरील त्यांच्या निष्ठेमुळे. त्यांचे गणवेश अद्यापही छुप्या कोमिन्टांग सैन्यातलेच होते. गणवेशांची लक्तरे लोंबत होती. पायात बूट नव्हते. जे निकृष्ट अन्न खायला मिळत होते तेही पुरेसे आणि नियमित नव्हते. त्यामुळे कच्च्या दिलाचे काही सैनिक त्याला सोडून जाऊ लागले होते.

पण जनरल चुहची हिंमत हरली नाही. जनरल फॅनची रजा घेतल्यानंतर त्याने आपले सैन्य हुनान, कियांगसी व क्वांगटुंग या प्रांतांच्या सीमांवर आणले. तेथेच आपला तळ स्थापला. जवळपासच्या खेड्यांमध्ये त्याने शेतकऱ्यांची कर्जमुक्ती

जमिनीची फेरवाटणी आणि श्रीमंतांच्या संपत्तीचे जप्तीकरण हा कार्यक्रम अंमलात आणण्यास जोशात सुरुवात केली.

## माओचा निरोप

या दरम्यान माओ-त्से-तुंगच्या लाल सैन्याने चिंगकाशान येथे आपला तळ स्थापन केला होताच. चुह तेहचा तळ चिंगकाशानपासून विशेष दूर नव्हता. पण दोन तळां-मध्ये दळणवळणाची साधने नव्हती. परस्परांच्या कार्यक्रमांची कल्पना नव्हती आणि चुह व माओ यांचीही ओळख नव्हती.

१९२८ च्या सुरुवातीला माओने आपला धाकटा भाऊ माओ-त्से-मिंग याला लाल सेनेचा प्रतिनिधी म्हणून जनरल चुह तेहशी बोलणी करण्यास पाठविले. माओच्या लाल सैन्याच्या कार्यक्रमाची, शेतकी आंदोलनाची, शेतकऱ्यांच्या लढ्याची, सर्वत्र सोव्हिएटस् उभी करण्याची कल्पना या प्रतिनिधीने जनरल चुह तेहला दिली. शेवटी चुह माओला येऊन मिळण्यास तयार झाला.

मे १९२८ मध्ये चुह तेह आपल्या सैन्यानिशी चिंगकाशान तळावर आला. चुह आणि माओ यांनी परस्परांना या वेळपर्यंत पाहिलेदेखील नव्हते. पण भेट होताच ताबडतोब परस्परांची ओळख पटली. संपूर्ण एक दिवस आणि एक रात्र चिंगकाशान वरील एका बौद्ध मठीत ते अखंडपणे बोलत बसले होते. या प्रदीर्घ चर्चेच्या शेवटी त्यांनी जेव्हा चिनी पद्धतीने परस्परांना अभिवादन केले तेव्हा त्यांचे संपूर्ण मतैक्य झाले होते. चुहने आपले सैन्य लाल सैन्यात विलीन करून टाकले.

दोन्ही सैन्ये एकत्र आली तेव्हा त्यांच्या ताब्यात त्या सीमा प्रदेशातील पाच जिल्हे होते, आणि ५०,००० अनुयायी होते. ४ हजार सैनिकांजवळ बंदुका होत्या. उरलेल्यांपैकी १० हजारांजवळ भाले, तलवारी, बर्च्या अशी मध्ययुगीन शस्त्रे होती तर इतर निःशस्त्र लोक होते. निःशस्त्रांमध्ये सैनिकांची बायकामुले, पक्ष कार्यकर्ते आणि राजकीय प्रचारक होते.

तेव्हापासूनच या ऐतिहासिक चिंगकाशान तळावर चुह-माओची सुप्रसिद्ध युती जमली ती शेवटपर्यंत. चुह हा अत्यंत निष्णात आणि धाडसी लष्करी अधिकारी होता. तो येऊन मिळाल्यापासून आपल्या लाल सैन्याची सारी सूत्रे माओने त्याच्या-वर विश्वासाने सोपविली. माओला चुह येऊन मिळाल्यापासून लाल सैन्याच्या आणि सोव्हिएटस्च्या चळवळीला जोराची चालना मिळाली. लाल सैन्याचा दरारा वाढू लागला आणि लवकरच एक कुशल रणयोद्धा म्हणून चुहची सर्वत्र ख्याती झाली.

आपल्या लाल सैन्यानिशी चुहने शेकडो छोट्या लढाया, डझनावारी मोठी युद्धे दिली. चँग-कै-शेकच्या कम्युनिस्ट नामशेष करण्याच्या पाच जबरदस्त मोहिमांना चुह तेहने आपल्या या अपुऱ्या शस्त्रांनी युक्त असलेल्या लाल सैन्याच्या आधारे निकराने तोंड दिले. अवजड तोफा, चिलखती गाड्या, बाँबफेकी विमाने आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेल्या चँगच्या सैन्याला त्याचे मध्ययुगीन

शस्त्रे वापरणारे सैन्य अखेर पुरून उरले. त्याचे रणनीतीचातुर्य, विजेच्या वेगाने चपलता, सैन्याच्या हालचालीमागील त्याची कल्पकता अप्रतीम होती.

## दंतकथांचे वलय

चुह तेहच्या या असामान्य कर्तृत्वामुळे त्याच्याभोवती अनेक दंतकथा गुंफल्या गेल्या आहेत. अनेक तऱ्हेच्या अमानवी शक्ती त्यांमध्ये असल्याच्या अफवा लाल सैन्यात होत्या. त्याला आपल्या सभोवतालच्या तीस मैलांवरील सर्व वस्तू दिसतात, आकाशात तो उडू शकतो, शत्रूसमोर धुळीची वादळे निर्माण करू शकतो, बंदुकींच्या गोळया त्याच्या शरीरावर काहीच परिणाम करू शकत नाहीत, एकदा मेला तरी पुन्हा तो जिवंत होऊ शकतो आदी अनेक शक्ती त्याचेजवळ असल्याच्या कथा भाविक लाल सैनिक एकमेकांना श्रद्धेने सांगत.

या कथांमध्ये अर्थातच तथ्य नाही. पण एवढे मात्र खरे की, चुह तेहला अनेक प्रसंगी गोळयांच्या जखमा झाल्या, अनेक जिवावरचे प्रसंग त्याच्यावर आले. पण त्या सर्वांतून तो वाचला. अनेकवार कोमिन्टांग सरकारने तो मृत्यू पावल्याचे घोषित केले, तो कसा मेला याचे तपशीलवार वर्णन जाहीर केले. तरीही चुह तेह पुन्हा प्रकट झालाच.

इतके असूनही चुहचे व्यक्तिमत्व अतिशय साधे होते. साधारण ठेंगणा पण भरदार शरीराचा, पोलादी हाता पायांचा चुह अतिशय शांत, विनयशील आणि बोलण्यात अतिशय सुसंस्कृत होता. आपला जवळचा नातलग वाटावा एवढी ममतेची भावना त्याच्या मल्या मोठ्या डोळयांत होती. लाल सैन्यात आल्यानंतर त्याने एका शेतकऱ्याच्या मुलीशी लग्न केले. ही मुलगीही मोठी धाडसी आणि उमदी होती. नवऱ्याच्या बरोबरीन तो लढायांमध्ये भाग घेत असे.

चुहचे आपल्या सैनिकांवर अमाप प्रेम. लाल सैन्यात आल्यापासून त्याने आपल्या सैनिकांसारखाच गणवेश घेतला. त्यांच्या कष्टांत तो सहभागी झाला. कित्येक दिवस त्याने पादत्राणांशिवाय काढले. लागोपाठ कित्येक महिने आपल्या सैनिकांबरोबर त्याने रानातील फळांवर काढले. आपल्या सैनिकांमध्ये मिसळणे त्याला फार आवडे. त्यांच्या बरोबरीने तो त्यांच्या खेळांमध्ये आणि गप्पा-गोष्टींमध्ये भाग घेई. सैन्यातला कोणताही माणूस त्याच्याकडे आपल्या अडचणी सांगायला येई. अवघ्या चीनमध्ये गोरगरिबांमध्ये त्याचे नाव माओबरोबरच देवाप्रमाणे घेतले जाऊ लागले.

कम्युनिस्ट सत्तेवर आल्यानंतर माओएवढेच चुह तेहलाही महत्त्व प्राप्त झाले. लाल सैन्याच्या क्रोधाच्या तडाख्यात जे जे सापडले त्या त्या कोमिन्टांग सैनिकांनी चुहच्या क्रौर्याच्या अनेक कथा चँग-कै-शेकच्या राजधानीत आणल्या. त्यामुळे कोमिन्टांग राजवटीत चुहची जबरदस्त दहशत होती. परंतु लाल सैन्याच्या अंमलाखाली आलेल्या प्रदेशातील दलितांचा मात्र तो लाडका नेता, स्वातंत्र्यवीर होता. ●

[ अपूर्ण ]

पुस्तकें

# नाट्याने नटलेल्या कथा

'कळप 'मधल्या कथा वाचताना पहिल्यांदा जाणवते ती त्यांतली नाट्यमयता. या साऱ्याच कथा नाट्यानं रंगलेल्या आहेत. तेच त्यांचं वैशिष्ट्य आहे. निरनिराळे प्रसंग, त्यांची रचना, त्यांत भाग घेणाऱ्या व्यक्ती, त्यांच्या स्वभावांतल्या वैशिष्ट्यांमुळं बनणारे पेच नि समस्या यांतून हे नाट्यमय स्वरूप जोपासलं गेलं आहे. 'कळप 'मधली बंधमुक्त जीवनाची आवड असणारी सीमंतिनी, 'बदली 'मधली अनूताई, 'बहीण 'मधली सुमार रूपाची पण बुद्धिमान नीला या खऱ्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा. पण लेखिकेने त्यांचा उपयोग असा केला आहे, की त्या व्यक्तिरेखेला उठाव न येता त्यांच्यामुळे घडणारे नाट्य जास्त परिणामकारक बनते. सीमंतिनी कुमारला धुडकावत अखेर त्याच्याशी लग्न करून विवाहित स्त्रियांच्या कळपात शिरते. अनूताई बापूकाकांचा संसार सांभाळायला जाते नि तो आपला करून टाकते. उपेक्षिली जाणारी नीला अखेर सुंदर बहिणींपेक्षा वरचढ ठरते. हे या नाटकाचे उत्कर्षबिंदू. बंधमुक्त जीवनाची हौस असणारी सीमंतिनी आणि पांढरपेशा नवऱ्याचा आज्ञाधारक संसार करणाऱ्या तारामावशी, बेताच्या रूपाची, बुद्धिमान, शांत नीला आणि सुंदर पण थिल्लर, उथळ अशी तिची बहीण तिलोत्तमा अशा परस्परविरोधी व्यक्तिचित्रांनी हे नाट्य रंगत जाते.

'कळप 'मधल्या प्रत्येक कथेची रचनाच नाटकासारखी रंगली आहे. प्रत्येक कथा सुटचासुटचा प्रसंगांतून घडत जाते. प्रत्येक प्रसंग म्हणजे एक पूर्ण दृश्य असते. त्यात खटकेबाज संवाद असतात. पात्रांच्या कृती असतात. पात्रांच्या मनातील विचार–विकार त्यांच्या कृतींतूनच सांगितले जातात. प्रसंगांची रचनाही उत्कंठा वाढविणारी, कथा पुढे नेणारी आणि संघर्ष बिंदू गाठणारी अशी असते. यातल्या प्रत्येक कथेला कथानक आहे. घटना आहेत. आणि कथानक पूर्ण केलेले आहे. या 'लघुकथा ' नाहीतच. कमीत कमी पात्रे, प्रसंग, एकच एक गोष्ट वगैरे गोष्टी इथे नाहीत. जीवनाचे दर्शन वगैरे दाखविण्याचा अट्टाहास नाही. या 'पूर्णकथा ' आहेत. काही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती, काही वैचित्र्यपूर्ण घटना, विरोधात्मक परिस्थिती यांतून एक मनोवेधक कथानक तयार करून त्याची उत्कंठापूर्ण रचना करावयाची हे या पूर्णकथांचे स्वरूप आहे.

कित्येकदा यातले प्रसंग काही फारसे चातुर्याने निवडलेले नसतात. सरळधोपट

एकमार्गी असतात. उदाहरणार्थ, 'रिकामी' या कथेत एकुलत्या एका नरूला मास्तरांच्या प्रोत्साहनानं अक्का वाढवतात, शिकवतात. नरू मोठा होतो. सरकारी नोकरी, बंगला त्याला मिळतो. स्वतःच्या पसंतीनं तो लग्न करतो. अक्कांना जुलमाचं रिकामपण येतं. घरात कुठल्याच कामाला त्यांना हात लावता येत नाही. नातवाचं कोडकौतुक मनासारखं करता येत नाही. अखेर नरू व त्याची बायको अमेरिकेला जातात. नातवाला विहिणीकडे ठेवण्यात येतं आणि अक्का खेडेगावात परत येतात. अशी ही सरळमार्गी कथा. पण त्यात निवडलेल्या प्रसंगांचे बारकावे लेखिकेनं इतक्या चटकदारपणानं रंगविले आहेत की कथेला ओघ आणि रंगत चढते. या सर्व घटनांमागे अक्कांच्या मनाची रुखरूख चढत राहते.

गोष्टीत एखादे प्रतीकात्मक वर्णन करायची स्नेहलताबाईंना हौस आहे. 'कळप'-मधला मेंढ्यांचा कळप, 'रिकामी'च्या शेवटी अक्कांना दिसलेली पोराला पाजणारी माकडीण, 'आग आणि लोणी'मधला कोसळणारा पाऊस अशांसारखी प्रतीके त्या कथेमध्ये वापरतात. ही प्रतीके अगदी ढोबळ असतात. कथेच्या आशयाला त्यांनी फारसा काही उठाव मिळतो असे नाही. पण त्याने काही बिघडत नाही. वेगळ्या गुणामुळे कथा रंगते. मात्र 'अधिकार'सारखी कथा प्रतीकात्मक प्रसंगचित्रणातूनच आकार घेते. रत्नाकराच्या भेटीला निघालेल्या सरितेला एक अशिक्षित जोडपं आणि एक प्रोफेसर नि त्यांची पत्नी भेटतात. त्यांच्या परस्परांशी वागण्यानं ती आपल्या भावी संसाराचे चित्र रेखाटू लागते. त्यांच्या भांडणांमुळं तिलाही उदास वाटू लागतं. हे सर्व चित्रण फार चांगले झाले आहे.

या सगळ्या कथांमध्ये संवाद फार चित्तवेधक आहेत. खटकेबाज आहेत. उत्तरं-प्रत्युत्तरं, खोचदार मार्मिक बोलणी आणि नमुनेदार स्वभावदर्शक वाक्यं संवाद आकर्षक बनवतातच, शिवाय तो तो प्रसंग घडताना प्रत्यक्ष दाखवतात. विशेषतः, 'थोरली बायको' या कथेतील ग्रामीण संवाद आणि त्यामुळे साधलेली वातावरण-निर्मिती उल्लेखनीय वाटते. संवादांखेरीज असलेली निवेदनात्मक भाषा सर्वत्र ओघवती आहे.

एकंदरीत या पुस्तकातील सर्वच कथा आकर्षक नि चटकदार आहेत. त्यातलं नाट्य विलोभनीय आहे. कथेतील चढउतारांचा तोल सुंदर आहे. 'बाजार' कथेला जीवनाविषयीच्या सहानुभूतीच्या जाणिवेचा स्पर्श झालेला दिसतो. नाट्यमय ओघवत्या, सुघड कथा म्हणून या कथांचे कौतुक व्हावे.

—निशिकांत मिरजकर

**[ 'कळप' — सौ. स्नेहलता दसनूरकर : इनामदार बंधू प्रकाशन : किंमत सहा रुपये : पृष्ठे २०२ ]**

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### □ अपयशाची गुरुकिल्ली

कारकून दीर्घायुषी का असतात ? खरे म्हणजे हा प्रश्न " शाळा-मास्तरांनी केव्हा मरावे ? " या प्रश्नाइतकाच मला आतापर्यंत कठीण वाटत असे. पण नुकतेच त्याचे उत्तर सापडले. काही दिवसांपूर्वी कुठे तरी झालेल्या एका वैद्यकीय परिषदेत एका डॉक्टरने सांगितले की, महत्त्वाकांक्षेमुळे माणसाला हृदयविकराचा झटका येऊ शकतो. घ्या ! कारकुनांच्या दीर्घायुष्याची गुरुकिल्लीच सापडली म्हणायची. कारण, एक वेळ हिंदी सिनेमा आणि वास्तवता यांचा संबंध येईल, खानावळीतली आमटी आणि डाळ यांचा संबंध येईल, शिंपी आणि वक्तशीरपणा यांचा संबंध येईल, इतकेच काय, पण आजकालचा विद्यार्थी अन् अभ्यास यांचादेखील कर्मधर्मसंयोगाने संबंध येऊ शकेल, पण कारकून आणि महत्त्वाकांक्षा यांचा संबंध येणे सुतराम् अशक्य. तेव्हा तमाम कारकून जातीला हृदयविकारापासून अभय आहे.

नाही तरी हिंदुस्थानातला कुठलाही सर्वसाधारण माणूस या बाबतीत बिनधोक आहे, असे म्हणायला हरकत नाही. तो शाळा मास्तर असेल तर ' दिपोटी ' होण्याचे स्वप्नातदेखील मनात आणणार नाही. बशीतून जाणारा असेल तर फूटबोर्डावर लोंबकळण्यात समाधान मानील. आत घुसून सीट पटकावण्याची हाव धरणार नाही. पैसे खाणारा असेल तर पाच–दहा रुपयांच्या चिरीमिरीवर खूष होईल. कवी असेल तर अडीच अडीच शब्दांच्या साडेतीन ओळींत आटोपते घेईल (पाहा : ' माणूस '-मधली कुठलीही कविता ! ). उपसंपादक असेल तर रात्रपाळीच्याऐवजी दिवस-पाळी मिळाली हेच प्रमोशन म्हणून देवाचे आभार मानील. अर्थात् ही सगळी मंडळी हृदयविकाराच्या बाबतीत निर्धास्त आहेत हे सुज्ञांस सांगणे नलगे.

अर्थात् माझ्यासारखा लेखक यांच्यांतलाच एक. पण एकदा मात्र माझ्यावर बाका प्रसंग गुदरला होता. झाले काय, भिंतीला रिकामटेकडेपणाच्या तुंबड्या लावता लावता एकदा माझ्या मनात विचार आला–आपण माजगावकरांच्या संपादकीय खुर्चीवर बसलो तर नक्कीच ' माणूस ' अधिक चांगले चालवून दाखवू... विचार आला मात्र, अन् माझ्या बरगडीत अशी सणक आली म्हणता, की मनातल्या मनात ताडकन् त्या खुर्चीवरून खाली उडी मारली म्हणून बचावलो. तेव्हापासून कानाला खडा लावला– लहान पण देगा देवा, चतकोर स्तंभच मला हवा !

## □ स्वयंपाकघरातली मुलुखमैदान

जगात शांतता नांदावी याबद्दल दुमत नाही. कुठलाही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय नेता घ्या, तो शांतीचा पाठ म्हणत असतो. पण जगात शांतता कशी स्थापन होईल ? हे नेते म्हणतात, माणसे लढली नाहीत तर शांतता होईल. माझ्या मते हे अर्धे उत्तर झाले. पुरुष लढले नाहीत तर जगात शांतता नांदेल हा उत्तराचा एक भाग. बायकांची कटकट थांबली तर तेवढीच शांती लाभेल हा दुसरा भाग. चेष्टा नाही. स्वयंपाकघरातली मुलुखमैदान शांत झाली तर जगातला निम्मा कोलाहल शमेल, असे सॉक्रेटिसपासून शेजारच्या नॉन् स्टॉप बडबडणाऱ्या सत्यंकाकूंच्या मूकनायक यजमानांपर्यंत सर्वजणांचे प्रामाणिक मत आहे.

—आणि आता ते सप्रमाण सिद्ध करण्याची सोयही झाली आहे. ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाच्या एका शास्त्रज्ञाने ' चॅटरबॉक्स ' नावाचे एक यंत्र तयार केले आहे, ते कुत्र्याच्या गळचात पट्टा अडकवावा, त्याप्रमाणे बायकोच्या गळचात अडकवले की ती दिवसभरात किती वेळ बोलत असते याचे मोजमाप नवऱ्याला मिळेल. कल्पना अर्थातच रम्य आहे, पण जगातल्या सर्व रम्य कल्पनांप्रमाणे अव्यवहार्यही आहे. कारण एक वेळ मांजरीच्या गळचात घंटा बांधणारा बहाद्दर उंदीर जन्माला येईल, पण बायकोच्या गळचात हे बडबड—मापक यंत्र अडकवू शकणारा नवरा पैदा होईल असे मला वाटत नाही. खरे म्हणजे नवरा हा माणूस आणि मूषक यांच्या बॉर्डर लाईनवरचा पददलित प्राणी. तेव्हा तो असा एकदम सुपरमॅन होईल, अशी अपेक्षा करणेच चूक. शिवाय बायकांनी बोलावे व नवऱ्यांनी ऐकावे (—निदान ऐकत असल्याचा आविर्भाव करीतच पेपर वाचावा) हीच पूर्वापार परंपरा असल्याचे एखादे लहान पोरही सांगू शकेल. परवाच छोट्याला विचारले, " आपल्या भाषेला मातृभाषा का म्हणतात ? " त्याने ताडकन् उत्तर दिले, " बाबांना ती वापरायची संधीच मिळत नाही म्हणून ! "

आपण खरे किती बोलतो ? जेवढे खरे बोलणे शक्य असते तेवढे आपण बोलत नाही. फक्त परवडते तेवढेच खरे बोलतो ! म्हातारपण आले की खरे बोलणे जास्त परवडू लागते.

# रायगडाला

रंगभूमी

# जेव्हा जाग येते

## पितापुत्र संबंध

छत्रपतींच्या जीवनातील संभाजी–प्रकरण हे एक बुचकळ्यात टाकणारे प्रकरण आहे. या पितापुत्रांमध्ये अंतराय निर्माण का झाला, हे जाणून घेण्याची तीव्र उत्कंठा कोणालाही असणे साहजिकच आहे. कारण संभाजी उग्र प्रकृतीचा, तापट प्रवृत्तीचा होता म्हणून तो खलनायकी दुष्ट मनोवृत्तीचा, नादान असा खासच नव्हता. म्हणूनच ही उत्कंठा निर्माण होते. केवळ व्यसनी, दुष्ट, अविवेकी स्वभावाचा संभाजी असता तर त्या संभाजीबद्दल तो अंतराय निर्माण का झाला याबद्दल व्याकुळ करणारे, गूढ निर्माण करणारे कुतूहल निर्माण झाले नसते.

पितापुत्रांच्या संबंधासंबंधी आपण एकदोन मुद्द्यांचा विचार करून त्यावर काही प्रकाश पडतो का, हे पाहू या–

(१) संभाजीचा जन्म १४ मे १६५६ रोजी झाला. त्यांची सख्खी आई तो दोन वर्षांचा असतानाच त्याला सोडून गेली. संभाजीची सावत्र आई सोयराबाई ही संभाजीला पाण्यात पाहत असे. शिवाजी महाराज मोहिमेत गुंतलेले असल्यामुळे त्याच्या वाट्याला पितृसुखही तितकेसे आले नाही. राजमाता जिजाबाई ह्या जिवंत असेपर्यंत संभाजी हा सुखात असावा. कारण त्यांनी त्याचे खूप कौडकौतुक केले असले पाहिजे. पण त्यांच्या निधनानंतर मात्र संभाजी हा स्वकीयांच्या मायेला जवळ जवळ पारखाच झाला. आणि सत्तास्पर्धकांच्या रोषाला हकनाक बळी पडू लागला.

संभाजी हा लहानपणापासूनच मायेला पारखा झाल्यामुळे पुढे तो बिघडत गेला असे काही म्हणतात आणि त्यासाठी वरीलप्रमाणे बतावणी केली जाते. पण हे मत तितकेसे बरोबर आहे, असे मला वाटत नाही. कसे ते पाहा :

जिजामातेचे संभाजीवर जिव्हाळ्याचाच प्रेम होतं हे घटकाभर मान्य केलं तर (आणि तसं प्रेम असणं अगदी शक्य आहे. कारण नातवावर–तेही आईवेगळ्या–आजीचं प्रेम असणारच.) तोपर्यंत तरी सोयराबाईकडून संभाजीला जाच होणं अशक्य आहे. जिजामाता वारल्या त्या वेळी संभाजीचं वय सतरा वर्षांचं होतं. म्हणजे त्या वेळी वयानं तो अगदी लहान नव्हता. समजूत येण्यासारखं ते वय होतं.

हे मराठी रंगभूमीवर यशस्वी ठरलेले प्रा. वसंत कानेटकर यांचे नाटक आता महाविद्यालयांतून अभ्यासक्रमासाठी सध्या नेमले जात आहे.

पुणे येथील शाहू मंदीर महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक श्री. सुधाकर भोसले यांनी या नाटकासंबंधी उपस्थित केलेले हे काही विवाद्य मुद्दे : — संपादक

१६ जानेवारी १६७१ या दिवसापासून म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षांपासून संभाजीला प्रत्यक्ष राज्यकारभार करण्याच्या दृष्टीने महाराजांनी काही योजना केली असल्याचे ऐतिहासिक कागदपत्रांवरून दिसून येते. तेव्हा जिजाबाई गेल्यानंतर सोयराबाईंनी जरी त्याला जाच करण्यास सुरुवात केली असली, तरी तो जाच मनाला लावून घेऊन खंत करीत बसून राहावं असं अर्थातच ते वय नव्हतं. (एक-वेळ असंही म्हणता येईल की, जिजामातेने फाजील लाड केले म्हणून संभाजी बह-कला......बिघडला. पण शिवाजी आणि संभाजी यांच्यांतील दुरावा स्पष्ट करण्या-साठी मातोश्री जिजाबाईंवर अशा तऱ्हेनं ठपका देणं चुकीचं आहे. संभाजीवर नाटक लिहिताना जिजामातेवर थोडा अन्याय झाला म्हणून बिघडलं कुठं, असं जर नाटककार म्हणू लागला तर त्याला त्याच्या कल्पनाशक्तीला आवर घालण्यास वाचकांनी अगर प्रेक्षकांनी सांगितलं पाहिजे.) सोयराबाईकडून संभाजीला अतिशय जाच झाला असल्याचा काळ साधारणपणे जिजामातेच्या मृत्युनंतर संभाजी मोगलांना जाऊन मिळेपर्यंतचा असणार. जिजामाता १७ जून १६७४ साली वारल्या. आणि संभाजी मोगलांना जाऊन मिळण्यासाठी १३ डिसेंबर १६७८ रोजी रायगडहून पळून गेला; म्हणजे मधल्या साडेचार वर्षांच्या काळात (हा काळ एखाद–दुसऱ्या वर्षाने आणखीही कमी करता येईल. मोगलांना जाऊन मिळण्यापूर्वी निदान एक वर्ष तरी संभाजीच्या मनाची तयारी झाली असली पाहिजे.)–वयाच्या १७ व्या वर्षापासून ते २१–२२ वर्षे वयापर्यंत–संभाजी सोयराबाईच्या जाचात होता. सोयराबाईचा आणि प्रधान मंडळातील काही लोकांचा विरोध जमेस धरू-नही संभाजीने डोक्यात राख घालून घेणे आणि त्याचे पर्यवसान त्याने मोगलांना जाऊन मिळणे हे संभाजीला न शोभण्याजोगे आहे. खरोखरच एवढेच निमित्त असेल तर संभाजी हा अविवेकी होता, उतावळा होता, असे नाही का म्हणता येणार ?

(२) छ. शिवाजी महाराज १६७५ च्या सुमारास साताऱ्यास अतिशय आजारी होते. केवळ सुदैव म्हणूनच ते त्या आजारातून वाचले. याच वेळी महाराजांच्या मृत्युची बातमी चौफेर पसरली ! इंग्रजांना तर असे वाटले की, संभाजीनेच शिवाजीला

विषप्रयोग केला! शिवाजी आणि संभाजी यांच्यांत वितुष्ट येण्याचे कारण इतिहाससंशोधक कै. त्र्यं. शं. शेजवलकर 'श्री शिवछत्रपति' या ग्रंथात पुढीलप्रमाणे दाखवितात– शिवाजीच्या परिवारातील प्रमुख ब्राह्मणांपैकी एकाच्या मुलीला भेटण्यासाठी संभाजी रात्री किल्ल्याखाली उतरत असे व तिच्याशी त्याचा अनैतिक संबंध होता. तेव्हा संभाजी ही खोड न सोडील तर त्याला बेशक तटावरून लोटून द्यावे, असे शिवाजीने फर्माविले होते. इंग्रजांच्या पत्रांतील ही नोंद इतकी सहजरीत्या व स्पष्ट स्वरूपात आली आहे की तीबद्दल शंका घेणे कठीण आहे. (पृ. १४२)

यावरून एक गोष्ट निश्चितच स्पष्ट होते की ह्या काळातील (१६७५ चा सुमार) शिवाजी आणि संभाजी यांच्यांतील संबंध बरेचसे दुरावलेले होते. (जिजामाता यांना जाऊन अवघे एकच वर्ष लोटलेले आहे.) आणि त्याचे वृत्त सर्व ठिकाणी जाऊन पसरलेले होते. शिवाजी महाराज १६७५ च्या अखेरीस एका मोठ्या आजारातून सुखरूपपणे बाहेर पडले. त्यानंतर पुढे चार वर्षे ते जिवंत होते. एवढ्या काळात त्यांनी राज्याच्या पुढच्या व्यवस्थेबद्दल निश्चितच विचार केला असला पाहिजे. घटकाभर (घटकाभरच) असे समजू की महाराजांनी त्या वेळी जितक्या गंभीरपणे विचार करावयाला पाहिजे होता तितका केला नाही. पण पुढे तरी तो विचार केला असलाच पाहिजे. १५ मार्च १६८० रोजी शिवाजी महाराजांनी राजारामाचा वयाच्या १० व्या वर्षी विवाह केला. २० मार्चनंतर महाराज आजारी पडले. पुढे आजार बळावत गेला. आणि ३ एप्रिल १६८० साली दुपारी १२ वाजता ते निधन पावले. शेवटपर्यंत महाराज चांगले शुद्धीवर होते, अशी ऐतिहासिक कागदपत्रांत नोंद आहे. महाराज अकाली वारले, पण त्यांचा मृत्यू अकस्मात आणि तडकाफडकी झालेला नाही. शेवटच्या या गंभीर आजारात त्यांनी संभाजीला केवळ 'भावडे पोर– दिल फाटून जाईल त्याचा' (पृ. ८५) म्हणून जवळ बोलावून घेतलं नाही यावर विश्वास बसत नाही. संभाजीच्या हातांतच त्यांना राज्यकारभाराची सूत्रे द्यावयाची असती तर आपल्यामागे सोयराबाई आणि प्रधान मंडळातील काहीजण ती सूत्रे सुखासुखी संभाजीच्या हाती जाऊ देणार नाहीत, हे न जाणण्याइतके महाराज भाबडे निश्चितच नव्हते. त्यांनी निश्चितच आपल्या हयातीत संभाजीला समोर बोलावून जाणत्या लोकांच्यादेखत मानाने अधिकारसूत्रे त्याच्या हवाली अर्पण केली असती. पण तसे घडले नाही. त्यावरून शंभुराजांच्याबद्दल महाराजांना विश्वास वाटत नसावा, असाच यातून निष्कर्ष निघतो आहे.

वरील सर्व विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की, संभाजी हा शिवाजी महाराजांच्या हातून सुटत चालला होता, याचे महाराजांना अपार दुःख होत होते. संभाजी मोगलांना जाऊन मिळालेला पाहून महाराजांच्या मस्तकावर वज्राघातच झाला असला पाहिजे. संभाजीच्या ह्या अधःपतनास महाराज दोषी ठरत नाहीत. केवळ आईवेगळा पोर म्हणून संभाजी हा त्रासला गेला म्हणून तो पुढे बिथरला

हे कारण ढिसूळ वाटते. शिवाजी महाराजदेखील तसे पितृसुखापासून वंचितच नव्हते काय ? शिवाजी महाराज जिजाईसारखी आई मिळाली. तीच जिजाई संभाजीस आजी म्हणून मिळाली नव्हती काय ? महाराजांचा पहिला पुत्र म्हणून त्याचे इतरांच्याकडून अपार कौतुकच झाले असले पाहिजे. बरीचशी माया आणि काहीशी असूया संभाजीच्या वाट्याला आली हेच संभवनीय वाटते.

अष्टप्रधान मंडळातील अण्णाजी दत्तो आणि मोरोपंत यांचा संभाजीला विरोध होता. हे दोघेजण सोयराबाईकडून होते, असे म्हटले जाते. मग बाकीच्या सहा प्रमुखांचे काय ? तेही जर संभाजीच्या बाजूचे नसतील तर संभाजीचेच कुठे तरी चुकत नव्हते काय ? आणि ते जर संभाजीच्या बाजूचे असतील तर संभाजी मोगलांकडे का गेला ? या ठिकाणी दुसरीही एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे, ती म्हणजे संभाजी जरी मोगलांना जाऊन मिळाला तरी संभाजीला मात्र शिवाजीच्या एकाही सरदाराने या बाबतीत पाठिंबा दिला नाही. संभाजीचे हे कृत्य कोणालाच आवडले नाही. मोगलांना जाऊन मिळण्यात संभाजीचा उदात्त हेतू जर होता तर त्याने काही सरदारांना संघटित करून मग मोगलांना जाऊन मिळावयास हवे होते. पण तसे घडले नाही. याचाच अर्थ असा की, संभाजीचा अधःपात झाला आणि तो मोगलांना जाऊन मिळाला.

संभाजीने राज्यकारभार चाणाक्षपणे करून ही अवघी दौलत सांभाळावी, वृद्धिंगत करावी हे तर महाराजांचे जिव्हाळ्याचे ईप्सित होते. आग्र्याला संभाजीस त्याच्या वयाच्या अवघ्या आठव्या-नवव्या वर्षी नेले, ते काय परप्रांतातून सुखेनैव सहल करावी, दौरा करावा म्हणून खासच नव्हे ! वयाच्या १४ व्या वर्षापासून त्यास राज्यकारभाराचे अनुभव यावेत म्हणून महाराजांनी मुद्दाम त्यास अधिकार दिले असल्याचे दिसून येते. इतिहाससंशोधक कै. त्र्यं शं. शेजवलकर यांचे पुढील उद्‌गार मननीय आहेत– ' संभाजीबद्दल शिवाजीचा पूर्वग्रह असलाच तर तो संभाजीला अनुकूल असाच होता. पण जसजसा संभाजी वाढत गेला तसतसे त्याचे नवे पैलू अनुभवास येऊ लागले व या गोष्टीची दखल घेणे शिवाजीला भाग पडले.' ( ' श्रीशिवछत्रपति ' पृ. १४५ )

विस्तारभयास्तव मी अधिक तपशीलात शिरत नाही. मला एवढंच म्हणावयाचं आहे की संभाजीच्या अधःपतनाचं ( काही महाशय संभाजी चुकला असं म्हणावयास तयारच नाहीत. ) खापर दूरान्वयानेदेखील शिवाजी महाराजांवर फोडता येणार नाही. संभाजीचे गुण जमेस धरूनही त्याचे दोष म्हणून जे आहेत, त्यांचे उत्तरदायित्व शिवाजी महाराजांवर ठेवून चालणे निखालस चुकीचे आहे. त्या काळातील परिस्थितीपेक्षाही संभाजीच्या स्वभावातील दोषच त्याच्या व्यक्तिमत्त्वास न्यूनत्व आणण्यास कारणीभूत झालेले आहेत. संभाजी काही वेळा मुत्सद्देगिरीने वागला नाही, तो मोगलांना जाऊन मिळाला, त्याने महात्मा पित्याला दुखा-

विले या साऱ्या गोष्टींचे प्रायश्चित्त त्याला भयंकररीत्या भोगावे लागले. छत्रपतींच्या पराक्रमाने आणि कर्तृत्वाने दिपून गेलेल्या आणि ऋणाईत राहिलेल्या काळानेदेखील त्यांच्या पुत्राच्या बाबतीत न्याय देताना मोठ्या कठोर वृत्तीचा अवलंब केला तर मग त्या घटनांपासून कितीतरी दूरवरचे असलेले साहित्यिक संभाजीच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करताना इतकी अतिरिक्त हळवी भूमिका का घेतात, हेच समजत नाही! स्वराज्याची स्थापना करताना महाराजांना संभाजीकडे लक्ष द्यावयास सवड मिळाली नाही हे 'दुर्दैव' म्हणता येईल. पण तो 'दोष' कसा होईल? पोटच्या पोराला घडवण्यासाठी त्यांना उसंत मिळाली नाही म्हणून आपल्याला 'अरेरे' करता येईल पण 'कारे' म्हणून जाब विचारण्याचे मूर्खपणाचे निर्लज्ज धाष्टर्य कसे करता येईल?

# छत्रपती शिवाजी महाराज

या नाटकातील शिवाजी महाराजांचे व्यक्तिचित्रण अतिशय अन्यायकारक झाले आहे. असे सामान्य– अतिसामान्य– चित्रण करून लेखकाने अक्षम्य प्रमाद केला आहे, असे म्हटले तर त्यात किंचितही अतिशयोक्ती होणार नाही.

पितापुत्रांतील संघर्ष रंगवताना शिवाजी महाराजांस 'अतिमानवी' करून त्यांच्यातील सर्वसामान्य माणसाचे मन दाखवता दाखवता नाटककारांनी महाराजांना पुरते हैराण करून सोडलेले आहे. 'भीक नको पण कुत्रा आवर' त्याप्रमाणे 'समजून घेऊ नकोस पण निंदा आवर' अशी स्थिती झालेली आहे! शिवाजी महाराज म्हटल्यावर– हिंदवी स्वराज्याचा संस्थापक, चाणाक्ष मुत्सद्दी, आयुष्याच्या अंतापर्यंत मोहिमा काढणारा योद्धा, व्यथित पिता असे दमदार, स्फूर्तिदायक, क्वचित अंतःकरणात काहूर उठवणारे व्यक्तित्व उभे राहतच नाही. शिवाजी महाराज म्हणजे खालसा झालेल्या तुटपुंज्या संस्थानाचा नामधारी अधिपती, सबळ मंत्रिमंडळाच्या हातातील क्षीण बाहुले, अगतिक पती, हळवेला पिता असा खचलेला, पेन्शनीत निघालेला एक दुबळा इसम वाटतो!

थोर योगी संत रामदासस्वामी श्रीशिवरायांबद्दल काय म्हणतात पाहा–

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी.
परोपकाराचिया रासी । उदंड घडती जयासी
तया गुण महत्वासी । तुळणा कैची?
कितेक दुष्ट संव्हारिला । कितेकांसी धाक सुटला
कितेकांसी आश्रयो जाला । शिवकल्याण राजा ।।

अशा प्रकारे 'शिवकल्याण राजा'चे दर्शन येथे घडते काय? नाही, नाही नाही, त्रिवार नाही! काही ठिकाणी मोठ्या कलात्मकर्तेने शिवरायाच्या व्यथेचे चित्रण मोठे हृद्य असे केले आहे. पण साकल्याने एकंदर होणारा परिणाम हा अतिशय असमाधानकारक ठरतो.

शिवाजी महाराजांचा आब, दरारा, सामर्थ्य, प्रतिष्ठा नाटककाराच्या किंचितही लक्षात आलेली दिसत नाही. या नाटकातील शिवाजी निष्कर्षरूपाने अत्यंत हळवा अगतिक, दुबळा, तापट, केविलवाणा वाटतो!

शिवाजी महाराजांबद्दल श्रद्धा, पूज्यभाव, निष्ठा यांचा त्यांच्याजवळ वावरणाऱ्या व्यक्तींमध्ये जवळजवळ लोप झालेला आढळतो. संभाजी शिवाजी महाराजांस ( अंक पहिला, प्रवेश पहिला ) एकदम नकळत उलट बोलून जातो. त्यामुळे महाराज कष्टी होतात. नंतर पुढे येसूबाई संभाजीस शिवाजी महाराजांची क्षमा मागण्यास सांगते. तेव्हा संभाजी काय म्हणतो पाहा— "(एकदम उसळून) महाराजांची माफी? आम्ही? आम्ही जाऊन महाराजांची माफी मागावी? ते होणं नाही! होणार नाही! मासाहेब हसतील आम्हांला, अष्टप्रधान घडीघडीला पाणउतारा करतील आमचा! सरकारकून आमचं नाक खाली झालेलं पाहून थयथया नाचतील! ते होणं नाही!... एक मासाहेब! बस, एक थोरल्या मासाहेब. त्यांच्या पायांशिवाय अन्य पायांना आम्ही कधी स्पर्श केला नाही!...' ( पृ. १८ )

नंतर संभाजी शांत होतो. आणि येसूबाईखातर माफी मागण्यास तयार होतो. तरीहीपण संभाजीचे वरील उद्‌गार कितपत साजेसे आहेत? शिवाजीची माफी मागितल्यास मासाहेब हसतील. अष्टप्रधान घडीघडी पाणउतारा करतील इत्यादी संभाजीची तर्कटं अजब आहेत! आणि एक थोरल्या 'मासाहेबांच्या पायाशिवाय अन्य पायांना आम्ही स्पर्श केला नाहीं' या उद्‌गारांतून मासाहेबांविषयी आदर व्यक्त करावयाचा आहे की शिवाजीला कमी लेखावयाचे आहे हे कळत नाही!

दुसरा प्रसंग पाहा—जेव्हा संभाजी येसूबाईस (अंक दुसरा, प्रवेश दुसरा) आपण दिलेरखानाशी सलोखा केल्याचे सांगतो, तेव्हा येसूबाई चकित होते, व्यथित होते. हा करार महाराजांना न विचारता का केला असे विचारता संभाजी तिला उत्तर देतो—' (भडकून) महाराज कोण? त्यांचा संबंध काय? आम्ही स्वतंत्र आहोत. आम्ही आमचे मुखत्यार आहोत.' (पृ. ५०) यावर अधिक स्पष्टीकरण केले पाहिजे असे नाही.

शिवाजी महाराजांबद्दल—आपल्या पित्याबद्दल—संभाजीने काढलेले पुढील उद्‌गार फार विपर्यस्त आणि कृतघ्नपणाचे वाटतात—' आम्हांला जाण आल्यापासून ठाऊक आहे, फक्त आबासाहेबांच्या डोळ्यांतील धाक! आमच्या मनावर कोरली आहे



त्यांच्या ओठांवरली सुन्न जरब! आमच्या पोटात कालवते आहे त्यांचं छत्र, त्यांचं सिंहासन, त्यांची राजमुद्रा!' (पृ. ४८)

पहिल्या दोन वाक्यांवरून शिवाजी जणू काही कोणी एखादा तापट, भडक माथ्याचा, रूक्ष आग्यावेताळ बाप वाटतो. आणि लक्षात घ्या त्याच्यापुढचे वाक्य औरंगजेबाचे किंवा अन्य एखाद्या शत्रूचे नसून शंभुराजांचे आहे!

आता सोयराबाईदेखील प्रसंगी शिवाजीस काय बोलते पाहा. संभाजीस त्याचे ब्राह्मणकन्येशी संबंध होते या आक्षेपावरून महाराजांनी त्याला शिक्षा करावी, असा सोयराबाईचा आग्रह आहे. शिवाजी महाराजांना काय करावे काही सुचत नाही. ते उलटसुलट विचारांत मग्न आहेत. अशा नाजूक प्रसंगी सोयराबाईंचे महाराजांना उद्देशून काढलेले उद्गार पाहा – 'जन्मभर नुसता काथ्याकूटच घालीत बसणार आपण. स्वभावच मुळी संशयी. कोणाच्या शब्दांवर म्हणून कधी विश्वास ठेवायचा नाही. मग–' (पृ. ३०) यावर महाराज एकदम 'भडकतात' थोड्याच वेळात 'चिंतनशील' होतात आणि थोडे पुढे जाऊन 'व्याकुळचित्त' होतात!

अण्णाजी दत्तो, मोरोपंत हेही शिवाजीशी फाजील सलगीने बोलत असलेले दिसतात.

यानंतर व्यक्तिरेखाटनातील आणखी तीन चुका दर्शवितो.

अंक तिसरा – प्रवेश दुसरा – यामध्ये शिवाजीची प्रकृती खराब झालेली आढळून येते. पुढच्याच प्रवेशात शिवाजी महाराज निवर्तल्याचे कळून येते. सोयराबाई आणि अण्णाजी यांच्या संवादांनी प्रवेशास सुरुवात होते. थोड्याच वेळात राजाराम घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करून म्हणतो, 'मासाहेब ... आबासाहेबांची तबीयत खराब झाली. गड चढताना त्यांना दोन वेळा चक्कर आली, (पृ. ६९) सोयराबाई घाबरून जातात. तोच महाराज मंद पावले टाकीत दोन हुजऱ्यांच्या आधाराने

प्रवेशतात. ते सगळ्यांना धीर देतात. थोड्या वेळाने पाणी मागतात. (महाराज पाणी मागतात. आणि महाराणीसाहेब पाणी आणण्यास आत जातात ! कौटुंबिक टच ! सोयराबाई पाण्याचा 'लोटा' घेऊन येतात. हिंदवी स्वराज्याचा संस्थापक लोटयातून पाणी पितो !) आपल्या पश्चात राज्यकारभाराची सूत्रे कोणाला द्यावीत यावर विचारविनिमय चालू होतो. अण्णाजी 'स्पष्टपणे' मत देतात. महाराज शंभूराजांसाठी फक्त एक(च) संधी मागतात. इतक्यात महाराजांना पुन्हा चक्कर येते. (पृ. ७४) ('सगळे धावाधाव करतात. पाणी आणतात. क्षण-भराने महाराज सावरून बसतात व पाण्याचा घोट घेतात.'– महाराजांची ही कोण काळजी ! केवढी शुश्रूषा !) यानंतर थोड्याच वेळाने महाराजांच्या छातीत कळ येते (पृ. ७५) यावर सोयराबाई म्हणते, '... आम्हांला वाटतं वैद्यराजांना बोलावून घ्यावं.' त्यावर मोरोपंत म्हणतात, 'आम्हीदेखील तेच सुचवणार होतो राणीसाहेब.' (वैद्यराजांना ! राजवैद्य नव्हे, वैद्यराज ! राजाराम नव्हे रामराजे ! शब्दांची थोडी उलटापालट !) सोयराबाई अंत:पुरात जातात. केवढी उदार आणि प्रेमळ माणसं ही ! हिंदवी स्वराज्याचा उद्गाता दोनतीन वेळा घाबराघुबरा होतो, अंग तापलेलं आहे, चक्कर येते, छातीत कळ येते हे पाहून सोयराबाई म्हणतात, 'आम्हांला वाटतं वैद्यराजांना बोलावून घ्यावं.' आणि त्यावर मोरोपंत तत्परतेने म्हणतात, 'आम्हीदेखील तेच सुचवणार होतो राणी-साहेब.' आहे की नाही काळजी ! काय हे महाराजांचे हाल ! अरेरे ! आपल्या घरी कोणी घाबरंघुबरं झालं की, आपण पळापळ करून डॉक्टरला बोलावतो. इथं धावाधाव होऊन पाणी आणतात ! आणि शेवटी सोयराबाई वैद्यराजांना बोला-वण्यासाठी अंत:पुरात जातात ! अंत:पुरांत वैद्यराज कसे काय बुवा ? एवढा मोठा रायगड. मराठ्यांचं राजधानीचं ठिकाण. पण शिवाजी महाराजांच्या महालात कोणी दासदासी, हुजरे नाहीत. पाणी आणण्यासाठी, वैद्यराजांना बोलावण्यासाठी खुद्द सोयराबाई जातीने जातात. अंत:पुरात ! जय स्वावलंबन !

यानंतर पुन्हा महाराजांना कळ येते. (पृ. ७७) एकूण (तीनदा चक्कर आणि दोनदा कळ.) महाराज तरी किती भोळे आहेत पाहा. त्यांच्याबद्दल कुणाला 'कळ-कळ' वाटत नसूनही त्यांना मात्र पुन्हा पुन्हा 'कळ' येते ! या वेळी महाराजांच्या जवळ एकटचा राजारामाशिवाय दुसरं कोणी नाही ! राजारामाच्या हाका. सोयरा-बाई, अण्णाजी, मोरोपंत यांचे प्रवेश. धावाधाव. आणि पाण्याचे शिडकावे–महा-राजांच्या कपाळावरती !

थोड्याच वेळात हा प्रवेश संपतो. आणि याच्या पुढच्याच प्रवेशात महाराज निधन पावल्याचे आपल्याला समजते. अशी देखभाल आणि काळजी करणारी माणसे अवतीभवती असल्यावर महाराजांची काय बिशाद होती वाचण्याची !

वरील सर्व प्रसंग मोठा उबग आणणारा वाटतो. शिवाजी महाराज संभाजी

आपल्या पश्चात गादीवर बसावा यासाठी अण्णाजी आणि मोरोपंत यांच्याजवळ 'एक संधी' मागतात. शिवाजीची ही अगतिकता आणि अण्णाजी, मोरोपंतांची त्या वेळची ताठर भूमिका मोठीच विचित्र वाटणारी आहे. हा सर्व प्रकार पाहून प्रश्न पडतो तो हा की शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानमंडळ केले होते की, अष्टप्रधान मंडळाने शिवाजी महाराजांस राजा केले होते ?

## आक्षेपार्ह विचार

समर्थ रामदास आणि राजकारण यांच्याबद्दल एका ठिकाणी शिवाजी महाराज म्हणतात, 'राजकारण म्हणजे अळवावरचे पाणी. त्यात आमचा दिल कधीच गुंतला नाही. परिस्थितीनं आमची स्थापना रायगडावर केली, पण मनानं आम्ही उभी हयात घालवली सज्जनगडाच्या परिसरात...' (पृ. ७०)

शिवाजी महाराजांच्या तोंडी घातलेल्या या विचारावर आमचा आक्षेप आहे. शिवाजी महाराजांची आणि समर्थ रामदासांची भेट झाली की नाही, याबद्दल इतिहास-संशोधकांत एकमत नाही. भेट झालीच असल्यास एखाद-दुसरी, याबद्दल कोणाच्याच मनात शंका नाही. मग महाराज असे कसे म्हणतात की, '...पण मनानं आम्ही उभी हयात घालवली सज्जनगडाच्या परिसरात. मन दुखणाईत झालं म्हणजे समर्थांच्या वाणीसारखं दुसरं औषध नाही.' शिवाजी महाराजांना अध्यात्माची ओढ होती असं दाखवण्याच्या अट्टाहासासाठी, 'राजकारणात आमचा दिल कधीच गुंतला नाही,' असे मत त्यांच्या माथी मारण्यात काय हशील आहे ? 'राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य' या भावनेनेच त्यांनी राजकारण केले असले पाहिजे. केवळ कर्तव्यबुद्धीने त्यांनी हा राजकारणाचा प्रपंच केला नाही. तन-मन-धन अर्पण करून कायावाचामने त्यांनी देशाला वाहून घेतले होते. त्यांच्या तोंडातून असे उद्गार कदापि निघणार नाहीत. लो. टिळकांनी एकदा असे उद्गार काढले होते की, 'मी जर स्वतंत्र भारतात जन्माला आलो असतो तर गणिताचा प्राध्यापक होऊन त्या विषयात रमलो असतो.' या उद्गारांवरून उद्या जर कोणी साहित्यिक लो. टिळकांना असं 'राजकारण म्हणजे अळवावरचे पाणी त्यात आमचे अंतःकरण कधीच गुंतले नाही. परिस्थितीनं आमची स्थापना राजकारणाच्या आखाड्यात केली पण मनानं आम्ही उभी हयात घालवली गणिताच्या ग्रंथाजवळ.' म्हणावयास लावील तर त्यांच्यावर अन्याय होणार नाही काय ?

## आक्षेपार्ह वाक्य

आता शेवटच्या एका गंभीर मुद्याकडे वळू. शिवाजी महाराजांच्या तोंडी अंक तिसरा–प्रवेश पहिला यामध्ये जी दोन वाक्ये आहेत ती अत्यंत आक्षेपार्ह आहेत. लेखकाकडून त्यांमध्ये गंभीर अपराध घडलेला आहे. प्रा. वसंत कानेटकर यांना मोठ्या कळकळीने सदर वाक्ये पुढील आवृत्तीतून आणि प्रयोगातून काढून टाकण्या-

साठी मी सूचना करीत आहे. नाटककारांनी सौजन्य नच दाखविल्यास महाराष्ट्र-सरकारने या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करावा आणि तेरा-चौदा भाषांतून शिवाजीची बदनामी करण्याचा धोका टाळावा. तो प्रसंग आणि ती वाक्ये पुढीलप्रमाणे आहेत–

संभाजीस मोगलांच्या छावणीतून आणण्यासाठी महाराज धोका पत्करून, हंबीरराववाला परत घेऊन आले आहेत त्या वेळी शंभूराजे गहिवरून महाराजांच्याबद्दल वाटणाऱ्या काळजीने म्हणतात, '......आपण आलात, आम्ही कृतार्थ झालो. पण आमच्या भरीला आपण पडू नका. आम्ही आपले पाय धरतो आबासाहेब, पण आपण जा, जा, जा इथून–उभी दौलत धोक्यात आहे आबासाहेब.' ( पृ. ६६ ) त्यावर शिवाजी महाराज म्हणतात, 'तुम्ही नाही तर दौलत कोणासाठी, कशासाठी राजे ? तुमचा जीव धोक्यात आणि आम्ही दौलतीची चिंता करू म्हणता ?' हीच ती दोन विषमय वाक्ये ! केवळ भावनेच्या आहारी महाराज असे म्हणून गेले असे म्हणून नाटककाराला सुटका करून घेता येणार नाही. कारण बोलून गेलेल्या वाक्यांबद्दल महाराजांना कुठे खंत वाटल्याचे दिसून येत नाही. हिंदवी स्वराज्याची स्थापना हा काय महाराजांचा वैयक्तिक लाभ होता ? 'पोटच्या पोरापुढे दौलतीची चिंता वाटत नाही' ही महाराजांची भूमिका खचितच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला बाध आणणरी आहे.

चौदा भाषांतून भाषान्तर झाल्यावर त्या त्या प्रांतांतील लोकांची शिवाजी महाराजांबद्दल काय बरे कल्पना होणार ? आधीच इतर प्रांतीयांतील बऱ्याच लोकांचे मन शिवाजी महाराजांबद्दल स्वच्छ नाही. महाराष्ट्राच्या स्वार्थापायी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी ते झुंजत होते अशी त्यांची समजूत. ( काहीजण तर अजूनही शिवाजी महाराजांस लुटारू, बंडखोर म्हणूनच विचारात घेतात.) त्यांच्या या विचारसरणीमध्ये या वाक्यांनी तेल ओतले जात नाही काय ?

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आयुष्याचा क्षणन क्षण वेचणारा, मोगल, इंग्रज, पोर्तुगीज यांच्यावर दहशत बसवणारा–आसेतुहिमाचल हिंदवी स्वराज्याची स्थापना व्हावी अशी स्वप्ने बाळगून त्याप्रीत्यर्थ धडपडणारा असा शिवाजी कुठं आहे ? पोटचा पोरगा मोगलांना जाऊन मिळाल्याचे हलाहल पचवून पुन्हा नव्या उमेदीने त्या अजाण लेकराला आपल्याकडे आणण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या– आणि त्या स्वप्नाला प्रत्यक्षात आणणाऱ्या शिवाजीचे दर्शन कुठं आहे ?

## सोयराबाई, अण्णाजी आणि मोरोपंत

शिवाजी महाराजांची पत्नी सोयराबाई ही महत्त्वाकांक्षी होती. आपला मुलगा राजाराम हा गादीवर बसावा, असे तिच्या मानसी होते. त्यामुळे ती संभाजीचा दुस्वास करीत असते. नाटककारांनी हा ऐतिहासिक सत्याचा सांगाडा कल्पनेचे

रक्तमांस भरून प्रतिमाशक्तींनी सजीव करताना फार स्थूल, ओबडधोबड केला आहे, असे वाटते. नेमका हाच दोष अण्णाजी दत्तो आणि मोरोपंत यांच्या व्यक्तिरेखाटनेसंबंधी वाटतो.

सोयराबाई, अण्णाजी आणि मोरोपंत संभाजीला उघड उघड विरोध करतात. अपमानास्पद वागणूक देतात हे अगदी अयथार्थ वाटते. यावरून काय वाटते पाहा– उद्याचा राजा म्हणून बरीचशी शक्यता असलेल्या व्यक्तीला उघड उघड दुखावून हे लोक अडाणीपणाने भविष्यकाळातील आपल्या बऱ्यावाईट शिक्षेची तयारी करीत होते. असा विरोध केला तर तो महाराजांच्या लक्षात येईल आणि लक्षात आल्यावर त्याचा महाराजांना जाब द्यावा लागेल याची त्यांना भीतीच नव्हती. शंभूराजांना असा उघड उघड विरोध करूनही शिवाजी महाराजांनी त्यावर काहीच कठोर निर्णय घेतला नाही. त्यामुळे शिवाजी महाराजांचा दबदबा शून्य होता किंवा त्यांची समजच कमी होती हे स्पष्ट होते.

राजारामाच्या लग्नाच्या वेळी शंभूराजे जर उपस्थित राहिले–' त्यांचं रायगडावर पाऊल पडलं तर आम्ही तोंडात पाण्याचा थेंब घालणार नाही–असं निक्षून बजावलं, तेव्हा स्वारी गप्प बसली ' (पृ. ६८) अशी फुशारकी सोयराबाई अण्णाजींच्याजवळ मारीत आहे. यावरून शिवाजीची किंमत, त्याचा दबदबा स्पष्ट होतो.

अण्णाजी दत्तो हे ज्या वेळी (अंक पहिला, प्रवेश पहिला) प्रवेश करतात त्या वेळी कंसात (पृ. ५) त्यांच्या वर्णनासंबंधाने दोन शब्द बुचकळयात टाकणारे आहेत– ' डोळयात महत्त्वाकांक्षा '–कसली महत्त्वाकांक्षा ? संभाजीला बदनाम करण्याची ? राजारामाला गादीवर बसवण्याची ? शिवाजीला छळण्याची ! की स्वतः गादीवर बसण्याची! ! ! पुढे लिहिलेले आहे– ' वागण्यात मुत्सद्देगिरी ओतप्रोत भरलेली '–कुठं आहे हो ही मुत्सद्देगिरी ? मुत्सद्देगिरीचा तर पूर्णतः अभाव दिसतो. शंभूराजांना हा वेळी अवेळी (जास्त अवेळीच) विरोध करतो. ' आपल्याबद्दल एक शब्दही बोलायची आमची इच्छा नाही, ' ( पृ. ११ ) असं तो ठणकावून सांगतो ! केवढं हे धाडस !

सोयराबाई, हंबीरराव, मोरोपंत यांच्या उपस्थितीत शंभूराजांच्यादेखत अण्णाजी शिवाजी महाराजांना ' शंभूराजे जलशाला गेले होते ' म्हणून सांगतात. (पृ. १५) नशीब ते शंभूराजांना याबद्दल कोणती शिक्षा करावी हे महाराजांना सांगत नाहीत.

शंभूराजांवर नाराज होत महाराज ज्या वेळी निघून जातात त्या वेळी शंभूराजांकडे ' तिरस्काराने ' पाहत अण्णाजी, हंबीरराव आणि मोरोपंत चालते होतात. (पृ. १६) यातील ' तिरस्कार ' शब्द वाचून आपल्याला काय वाटते ? युवराजांकडे ही मंडळी ' तिरस्कारा 'ने पाहू शकतील काय ? शंभूराजे म्हणजे काय अण्णाजी आणि हंबीरराव यांनी पालनपोषण करून वाढवलेला, त्यांच्या कृपेवर जगणारा कोण आश्रित होता?

शंभूराजे अण्णाजींबद्दल थोरल्या महाराजांच्याजवळ काही तक्रार करीत आहेत. त्या वेळी अण्णाजी महाराजांना साफ बजावतात ' आपल्या गैरहजेरीत रायगडाची मुखत्यारी जर युवराजांच्याकडंच राहणार असेल–' (पृ. २६) 'असेल' या शब्दापुढे अण्णाजी काय बोलणार होते ? महाराजांना कोणती 'धमकी' अगर 'समज' देणार होते ? रागाने अनावर होऊन शंभूराजे मध्येच त्यांचे वाक्य तोडतात. (राग यायलाच हवा.) पण महाराज मात्र शांतपणे गोष्ट हसण्यावारी नेतात ! म्हणजे महाराज अण्णाजींना घाबरत होते का ? संभाजीला समजावून सांगू शकणारे महाराज अण्णाजींच्या बाबतीत एवढे कच का खात होते ? महाराजांच्या हातातून कोण सुटत चालले होते ? संभाजी की अण्णाजी ?

राजारामाला ( हा राजाराम संभाजीच्या बाजूचा आहे हे माहीत असूनही ) अण्णाजी ('ओतप्रोत मुत्सद्देगिरी भरलेले') शंभूराजांच्या संदर्भात टोचून बोलतात. ( 'शंभूराजांशिवाय दुसरा कोण गुरू भेटणार आहे राजांना' ( पृ. ३३ ) अण्णाजी एवढे उघडपणे शंभूराजांच्या विरोधी कसे बोलू शकतात याचे खरोखर आश्चर्य वाटते.

शंभूराजे ब्राह्मणकन्येच्या नादी लागतात. आणि त्यांच्या हातून काही अपराध घडला असा एक त्यांच्या बाबतीत संशय घतला जातो. काय करावे या विचाराने महाराज अतिशय व्यथित आहेत. अशा या नाजूक प्रसंगी महाराजांची समजूत अण्णाजी कोणत्या शब्दाने काढतात, हे मोठे पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, 'हे सगळं पाहिल्यावर शंभूराजे युवराजपदावर राहण्यात दौलतीला धोका आहे, असा दावा प्रधानांनी मांडला तर त्यांत गैर काय आहे ?' (पृ. ४२) प्रसंग कोणता आणि अण्णाजींची बेलगाम भाषा कोणती ? कीव वाटते छत्रपतींची आणि चीड येते अण्णाजींच्या कुटिल बोलण्याची !

संभाजी मोगलांना जाऊन मिळतो. महाराज आपल्या लेकराला मोठ्या जिद्दीने परत आणण्याची उमेद व्यक्त करतात. (पृ. ५७) अशा वेळी अण्णाजी महाराजांना काय म्हणतात पाहा–'आणि परत आणून तरी काय उपयोग ? बेइमानी अखेर चरतच जायची.' शिवाजी महाराज हे उद्‌गार कसे काय सहन करू शकतात ते कळतच नाही !

अंक तिसरा–प्रवेश दुसऱ्यामध्ये महाराज थकून अंगात ज्वर आलेल्या स्थितीत पडलेले आहेत, दौलतीच्या व्यवस्थेसंबंधी ते क्षीण आवाजांत अण्णाजी आणि मोरोपंतांशी ( फक्त संभाजीच्या विरोधकांशी विचारविनिमय ! ) विचारविनिमय करीत आहेत. संभाजीसाठी 'एकवार संधी'–फक्त एक संधी मागत आहेत ! (पृ. ७४) आणि अण्णाजी, मोरोपंत महाराजांची विनंती मानण्यास तयार नाहीत ! शिवाजी महाराज एवढ्या अगतिकपणे संभाजीसाठी 'संधी' मागत आहेत आणि अण्णाजी, मोरोपंत हे त्यावर नाराजी दाखवितात. हे आहे काय ?

शेवटच्या प्रवेशात अण्णाजी आणि मोरोपंतांना बेड्या घालून शंभूराजांपुढं दाखल करतात. (शंभूराजांचा बंदोबस्त करण्यासाठी फौज घेऊन दोघे निघाले होते.) मोरोपंत तळव्यांनी तोंड झाकून स्फुंदत आहेत. अण्णाजी मात्र बेडरपणे उभे आहेत (पृ. ८१). अण्णाजींना आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप नाही. ते स्पष्ट म्हणतात, 'जाणून बुजून जी पावलं टाकली त्यासाठी उपरण्यात हात बांधायची आपली सवय नाही. सरनोबत, महाराज गेले, आमच्या इमानाची माती झाली.' (पृ. ८२) केवढे करुण उद्गार! 'आमच्या इमानाची माती झाली!' शंभूराजांना हा 'महाराज' म्हणावयास स्पष्ट नकार देतो. (पृ. ८३) आणि पुढे हा निस्पृह मुत्सद्दी बाणेदारपणे येसूबाईस सांगतो;—'शंभूराजे गादीवर येण्यास दौलतीला धोका आहे हे त्रिवार सत्य आहे.' (पृ. ८३) असा आहे हा अण्णाजी दत्तो! अत्यंत उर्मट आणि हेकेखोर.

## भूमिका

छत्रपती शिवाजी महाराज हे एक अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे थोर पुरुष होऊन गेले. त्यांचे सर्व जीवन आम्हा भारतीयांना (केवळ महाराष्ट्रीयांनाच नव्हे). स्फूर्तिप्रद ठरणारे आहे. 'हिंदवी स्वराज्य (अखिल हिंदूजनांचे) स्थापन व्हावे ही तर श्रींची इच्छा आहे.' हे महाराजांचे घोषवाक्य होते. हा त्यांचा जीवींचा ध्यास होता. या एकाच वाक्याने हा युगपुरुष भारतीयांच्या गळ्यांतला ताईत होऊन जाईल. त्याकरिता महाराजांचे ते वाक्य, नुसते वाक्यच नव्हे अवघे चरित्र देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहोचले पाहिजे.

आपल्या वैयक्तिक आयुष्यात महाराज दु:खी असतील. तसं पाहिलं तर या जगात दु:खापासून कोण मुक्त आहे? महाराजांना आपल्या आयुष्यात अनेक अपयशांचा स्वीकार करावा लागला. त्यांच्या प्रत्येक मोहिमेला थोडेच यश मिळत गेले? त्यांची अनेक स्वप्नं प्रत्यक्षात उतरली नाहीत म्हणून महाराजांचे साहित्यकारांकडून चित्रण असे व्हावे काय, की त्यांचे व्यक्तित्व केवळ कारुण्याची मूर्ती वाटावी? छे, हे अगदी चुकीचे आहे. त्यांच्या जीवनातील दु:ख दुसऱ्या कोणास त्यांच्याबद्दल कीव वाटावी किंवा सहानुभूती वाटावी या प्रकारचे नाही. थोरांची दु:खं आपल्याच तालात मोठ्या रुबाबात चालत असतात. तुम्ही त्यांच्याबद्दल जर कीव दाखवलीत तर त्या थोर, क्षमाशील महात्म्यांच्या कपाळावरती आठी चढल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मोठ्या दक्षतेने आणि अत्यंत काळजीपूर्वक त्यांना कोठे कमीपणा तर येणार नाही ना अशी खबरदारी घेत त्यांच्या दु:खाचे चित्रण केले पाहिजे. साहित्यिकांची इथेच कसोटी लागत असते.

शिवाजी महाराजांचे दुःख हे वाचकांच्या अंतःकरणात काहूर उठवीत त्यांना बेचैन करील पण अंती त्यातूनच त्यांना नवी दिशा दाखवणारे तेज दृष्टीस पडेल यात मला शंका वाटत नाही. महाराजांच्या दुःखातून महाराज माणूस असूनही 'महाराज'च म्हणून शेवटी राहतात. मानवाच्या सुखदुःखातून न सुटणारा- पण तरीही त्यात न सापडणाऱ्या, न गुरफटणाऱ्या, न गुंतणाऱ्या एका महात्म्याची चरित्रगाथा-अशी कथा रंगवणारा नाटककार आम्हांला हवा आहे. कारण तिथेच खरे शिवाजी महाराजांचे दर्शन घडेल. ● ●


# "डायमंड"

**टॅक्सी व रिक्षा मीटर्स**

भारतात सर्वप्रथम

**डायमंड ब्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,**

११८० बुधवार पेठ, पुणे २.

**डायमंड वॉच कंपनी**

**११७९ बुधवार पेठ, पुणे २.**

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

# आम्रपाली

## डोळ्यांना मजबूत सुख

आम्रपाली पाहिला. डोळ्यांना बहुत सुख झाले. द्वारका दिवेचांच्या नीटस कॅमेऱ्याने पकडलेले हे ईस्टमनमधील रंगदार चित्र पाहताना कशी मजा येते. भारी कापडाची काचोळी आणि कटिवस्त्र ल्यालेली वैजयंतीमाला, तिच्या सख्या, त्यांची दिलखेचक, चित्तवेधक नृत्ये डोळ्यांना गुंगवून टाकतात. सगळं कसं विलोभनीय वाटतं. भरजरी अंगरखा घातलेला काळाभोर दाढीमिशांचा, हातात आडवी म्यान तलवार घेतलेला, कधी डौलदार चालणारा तर कधी घोड्यावर मांड टाकलेला सुनील दत्त एकदम रुबाबदार दिसतो.

घोड्यावरून धावपळ चाललेली असते. लढाई चालू असते. सगळे कसे मस्त वाटते. हाणाहाणी, पळापळी, झटाझटी. मोठा मजा येत असतो.

कोणीतरी म्हणते तो खांद्यात बाण घुसला ना तो अजातशत्रु आहे. मगधाचा सम्राट असेल. त्याशी आपल्याला काय कर्तव्य आहे ? पुन्हा लढाई. एकटा प्रेमनाथ आठ-दहाजणांना कसा लीलया टोलवतो व पुन्हा सुखरूप येतो. पाहतो तो सम्राट गायब.

पुन्हा कोणाचा तरी आवाज येतो. अजातशत्रु आम्रपालीस भेटला हं ! झकास प्रसंग येतील आता. आम्रपाली ? कोण आहे ती ? हां हां वैजयंतीमाला होय ? दिसते कशी लावण्यलतिका. ईस्टमनरंगांतील तिची कांती केवळ 'लक्स 'नेंच बहारदार बनविलेली असावी असे वाटते. आता वयाबरोबर तिच्या पोटाला एकदोन घड्या पडतात. पण अजून बांधा कसा सुबक आहे. नृत्यातील लचक, वेग कसा और आहे. चपळाई तर साक्षात विद्युल्लतेचीच. शिवाय सवयीने चीड, संताप, प्रणय वगैरे भावनाविष्कारही मधून मधून उत्तम करते.

आता ती आम्रपाली वाटत नाही हे खरे; पण देखणेपण आहे. आणखी काय हवे ? पुन्हा तिच्या सोबतीला भारतीय नृत्यात ट्विस्टची लचक आणणारी बेला बोस किंवा सखी म्हणून कोळणीसारखा वेष घालून वावरणारी माधवी आहे. माधवीचा नखरा कसा झक्क आहे.

बेला बोस, माधवी या चित्रपटात असतात कशाला ? वैजयंतीमालेबरोबर फिरणारा कलाकार शामळू का ? त्याचे काम कशासाठी असते हे विचारले तर आपणांस ठाऊक नाही. कथा-पटकथाकार ओंकारसाहेबांनाही '१०० हून अधिक पुस्तके संशोधून ' ते गवसले नसावे. नाही तर या सर्व पात्रांना त्यांनी अर्थ दिला



बौद्धकालीन प्रणय !

असता. दिग्दर्शक लेख टंडन यांनाही ती अडचण भासली नाही. वैशालीचे राजप्रमुख, राजगुरू, मगधचा वैशालीतील हस्तक– सगळे कसे आजच्या जमान्यात वावरावे असे वागतात. बहुधा वैशाली हे लोकतंत्र राज्य होते म्हणून असावे.

हेही खरे की सुनील दत्त फार मोठ्यांदा– म्हणजे काय फारच मोठ्यांदा– बोलतो. पण आता एकतर तो सम्राट आहे. त्याचा दिवाणखाना केवढा मोठा आहे. त्याचे शरीर केवढे दांडगे आहे. त्याला साजेसा आवाज हवाच. त्याचा आवाज उच्चरवात पिचतो हेही मान्य. पण आधीच्या मोहिमांनी, लढायांनी दमल्याचा व क्षणाचीही उसंत न मिळाल्याचा तो निदर्शक समजावा.

मग प्रणय प्रसंगात तरी त्याने नेहमीची सफाई दाखवावी. आम्रपाली तर त्यात तरबेज होती. पण ख्रिस्तपूर्व, बौद्धकालीन प्रणय होता तो. स्त्रीने पुरुषाच्या छातीवर डोके ठेवलेच तर कसे ओळंबून. यामुळे बोजड कपड्यांनी व अजातशत्रु असल्याच्या भावनेने अवघडलेला सुनील दत्त व कटिवस्त्र जपणारी वैजयंतीमाला यांच्यामध्ये ' जवळीक ' अशी कधी निर्माणच झाली नाही.

पूर्वसंचितावर चाललेल्या शंकर-जयकिशन यांच्या कारखान्यातील संगीत कसे कर्णमधुर आहे. पण त्यांनी या चित्रपटावर फारसे परिश्रम केलेलेच दिसत नाहीत. कारखान्यात जागोजागी पडलेले सुटे भाग घेतले, एकत्र जोडले व उभे झाले आम्रपालीचे संगीत. ही जोडणीसुद्धा बहुधा कोणातरी सहाय्यकानेच केलेली. त्यामुळे ' जाओ रे जोगी ' वगळता बाकी सर्व गाणी एकदम ' रफ ' वाटतात. लता मंगेशकरचा आवाजच असा की त्या रफपणातही माधुरी यावी. संगीतात ' जिस देशमे '-

मधील पिसेस बऱ्याच ठिकाणी वेगळ्या वाद्यांवर वाजवलेले आढळले तरी त्यांतील गोडवा अवीट आहे. विशेषतः, सतारीचा उपयोग असा ‘ जेहत्ते कालाचे ठायी ’ तेहत्त जमला आहे की बस्. डोळे मिटावे व सतारच ऐकत राहावे. पण समोर वैजयंती-मालेचा नृत्याचा सामना चाललेला असतोना. डोळेही मिटता येत नाहीत.

शंकर-जयकिशन यांनी बहुधा आचरेकरांना धडा दिला असावा. त्यामुळे त्यांचे सेटस् बरेचसे ‘ ओळखी ’चे वाटतात. एकूणच त्या काळचे वातावरण निर्माण करण्यात कथालेखक-दिग्दर्शक फसल्यासारखे वाटतात.

हिंदी चित्रपट पाहायचे असतील तर मागल्या शुक्रवारी काय पाहिले हे विसरून जायला हवे. नाहीतर काय होते की मागच्याच आठवड्यातल्या सामाजिक चित्रपटातील काही दृष्ये या आठवड्यातील पौराणिक चित्रपटात दिसू लागतात. हळू हळू पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक सारेच भेद विरू लागतात. आणि मग उदाहरणानेच सांगायचे तर—२।। वर्षे श्रम + लक्षावधी रुपये + लेख टंडन यांचे दिग्दर्शनकौशल्य + ओंकारसाहेब यांची पटकथा एवढे सर्व मिळून होणारा ‘ महान, महत्त्वाकांक्षी ’ वगैरे आम्रपाली कसा फुकट गेल्यासारखा, तोटका राहिल्यासारखा वाटतो.

या क्षेत्रातल्या एका तज्ज्ञ गृहस्थाने मला मागेच मंत्र दिला—बाळ, तुला हिंदी सिनेमाला जायचे असेल तर एक गोष्ट ध्यानी ठेव. बुद्धीला फारसा ताण देऊ नकोस. ऐतिहासिक चित्रपटात पौराणिक किंवा सद्यःस्थितीतली समाजरचना दिसून आली तर तो विनोद समज.

हाच मंत्र म्हटला व ‘ अप्सरा ’ टॉकीजमध्ये शिरलो. डोळे मोहवून टाकणारा अंगप्रत्यंगांस सुख देणारा चित्रपट वाटला बुवा आपल्याला. —क्ष ●

## □ पुन्हा आम्रपालीच

ईगल प्रॉडक्शनचे ‘ आम्रपाली ’ हे चित्र मुंबईत साफ पडले असे ऐकल्यानंतरही ते पाहण्याकरिता मी गेलो आणि थिएटर अर्धेअधिक ओस पडलेले पाहून, ते चित्र एका अर्थी पडल्याचा प्रत्यय मला आला. परंतु चित्र संपूर्ण पाहिल्यानंतर मात्र त्या चित्राचे निर्माते मेहरा, कथा व पटकथा लेखक ओंकारनाथ, दिग्दर्शक लेख टंडन आणि त्यांच्या इतर गुणी कलाकारांना धन्यवाद द्यावेसे मला वाटले; इतके सर्वांगसुंदर चित्र गेल्या कित्येक वर्षांत हिंदी चित्रपटसृष्टीत निर्माण झाले नाही असे माझे प्रांजल मत आहे.

वैशाली आणि मगध या देशांच्या वैमनस्याच्या पार्श्वभूमीवर चित्राची कथावस्तु उभी करण्यात आली असून, मगध देशाचा सम्राट अजातशत्रु आणि वैशालीतील राजनर्तकी आम्रपाली यांच्यांतील मधुर प्रणयाची गुंफण त्या वैमनस्याच्या

कोंदणात गुंफली आहे. निस्सीम राष्ट्रप्रीतीच्या भरात अजातशत्रूसंबंधीच्या प्रेमाची आम्रपालीने जी आहुती अखेरीस दिली ती तिच्यासंबंधी आदर निर्माण करणारी आहे.

वैशालीवर दोनदा आक्रमण करून पराभूत झालेला मगधचा सम्राट अजातशत्रु पुन्हा तिसऱ्यांदा आक्रमण करतो व पुन्हा पराभूत होतो, लढाईत घायाळ होतो; आणि वेश बदलून वैशालीत येतो. आम्रपालीच्या घरात तो तसाच घायाळ अवस्थेत प्रवेश करतो, आणि आम्रपाली त्याची वैशालीचा शूर नागरिक या कल्पनेने शुश्रूषा करते आणि दोघांत मधुर प्रेमाचा उद्‌भव होतो. पण अखेर सत्य ते बाहेर येते आणि प्रेमाचे रूपांतर अजातशत्रूसंबंधीच्या घृणेत होते !

पण उलट अजातशत्रूबरोबर पळून जाण्याचा तिच्यावर वृथा आरोप ठेवण्यात येतो आणि तिला मृत्युदंडाची शिक्षा होऊन कैदेत टाकण्यात येते. तो सगळा भाग प्रेक्षकांच्या मनात अनुकंपा निर्माण करणारा आहे. तिला सोडविण्याकरिता सगळ्या वैशालीचे शिरकाण अजातशत्रूने केल्यानंतर मनात वैराग्य बाणून तिने त्याचाही त्याग केला आणि ती बुद्धानुयायी बनली !

चित्रात घनघोर युद्धे दाखविली आहेत आणि त्याच वेळी युद्धाची निरर्थकताही पटविण्याचा यत्न आहे.

आम्रपालीच्या भूमिकेतली वैजयंतीमालेची नृत्ये जशी आकर्षक तसाच तिच्या मनात प्रणयाचे मधुर तुषार निर्माण होतात त्या वेळची आणि नंतर तिच्या मनाला हेलकावे मिळून घृणा निर्माण झाली या प्रसंगाचा तिचा अभिनय अतिशय हृद्य आहे. सुनील दत्ताचे अजातशत्रूचे काम साधारण झाले असून, बाबूराव पेंढारकरांची राजगुरूंची भूमिका ठसा उमटविणारी आहे.

आम्रपालीतील संवाद विषयाचा परिपोष करणारे आणि प्रतिक्षणी राष्ट्रप्रेमाची ज्योत जागती ठेवणारे आहेत.

असे असताही अतिशय परिश्रमपूर्वक निर्माण केलेले हे चित्र पडावे हे पाहून खेद होतो. चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांची अभिरुचीच पार बदललेली आहे. गांभीर्याने एखाद्या प्रश्नाची उकल उद्‌बोधकपणे करणाऱ्या साहित्याचा, मग ते पुस्तक असो, मासिक असो, की एखादे चित्र असो, रसिकांना आताशा वीट यायला लागला आहे. शम्मी कपूर आणि साधना अथवा इतर नट्या यांच्यातील वेडसर प्रणयाची रंगेल चित्रे पाहणाऱ्या शौकिनांचा वर्ग अलीकडे सुशिक्षितांतही वाढू लागला आहे. नग्न व बीभत्स चित्रे चोरून पाहताना त्यासोबतचा मजकूर वाचणारांची संख्या वाढतच आहे. **आजचा प्रश्न केवळ अश्लील वाङ्‌मयाचा अथवा साहित्याचा नसून दूषित अभिरुचीचा आहे.**

हलके साहित्य वाचण्याची व पाहण्याची सवय झालेल्या प्रेक्षकांनी थिएटरे गजबजत असल्याने तसले साहित्य निर्माण करण्याची प्रवृत्ती निर्मात्यांना व्हावी हा

दैवदुर्विलास होय. नवे मराठी चित्र काढायचे तर निर्माता तमाशाच्या चित्राच्या कथानकाच्या शोधात असतो! तमाशा नसलेली बहुतेक मराठी चित्रे अलीकडे पडली आहेत!

सिनेरसिकांच्या हीन अभिरुचीवर नियंत्रण घालण्याची टीककारांकडून अपेक्षा करावी तर, आम्रपाली चित्र पडण्याचा गवगवा मुंबईच्या चित्रपट टीकाकारांनीच केला आहे! भारतात चित्रपट निर्मितीला जे वळण अलीकडे लागत आहे, त्या धबधब्यात टीकाकारही वाहून गेले आहेत. त्यांची अभिरुची हिणकस झाल्याचेच हे द्योतक मानावयाचे काय? तसे ते आहे; तेव्हा निर्माते निरंकुशच व्हावेत यात नवल नाही!

—अ. तु. वाळके

## फेमस उंदीर-कावळा

एका उंदराने हॉलीवूडच्या चित्रपट-सृष्टीत अमाप लोकप्रियता मिळविली असे जर कोणी तुम्हांस सांगितले तर तुम्ही त्याला मूर्खात काढाल. पण खरोखरच ही गोष्ट सत्य आहे.

'मिस्टर बीच' नावाच्या चौदा इंच लांबीच्या उंदराने एके काळी भयंकर लोकप्रियता संपादन केली होती. तो चित्रपटसृष्टीत इतका लोकप्रिय झाला होता की, त्याची वार्षिक कमाई २० हजारांहून जास्त होती. 'एम्मा' नावाच्या एका कावळ्याची कमाईपण अशीच वाढत होती.

या कावळ्याने किती चित्रपटात भूमिका केल्या असतील अशी तुमची कल्पना आहे? हरलात ना!—त्याने जवळजवळ दोनशेवीस चित्रपटात भूमिका केल्या असून उलटे उड्डाण करण्यात हा कावळा पटाईत आहे.

## स्वतःवरच राग

अनेक सुप्रसिद्ध दिग्दर्शकांना त्यांच्या मर्जीप्रमाणे सेटवर कामे झाली नाहीत तर राग येतो. पण हा राग कलावंतावर काढणे शक्य नसते: त्यामुळे कलावंत गांगरून जाऊन आणखीन चुका करतो किंवा रागावतो. अशा वेळी राग अनावर झालेले हे दिग्दर्शक स्वतःवरच राग काढतात. गुरुदत्त यांना सेटवर राग आला तर ते हाताच्या मुठी जोराने टेबलावर आपटीत. सुप्रसिद्ध बंगाली दिग्दर्शक सत्यजित रे यांना सेटवर राग आला तर ते रुमालाचा बोळा तोंडात घालून त्याला रागाने चावतात.

—*रमेश के. सहस्रबुद्धे*

## विषय चांगला, पण परिणाम शून्य

# नेकेड प्रे

आफ्रिकेतील जंगली जमातींनी इंग्रजी चित्रपटनिर्मात्यांना भरपूर खाद्य पुरविले आहे. 'नेकेड प्रे' ही आफ्रिकी टोळीवाल्यांच्या हातून निसटलेल्या व नंतर त्यांना हूल देत देत मुख्य तळावर येऊन परतलेल्या एका शिकाऱ्याची कथा आहे. गर्ट व्हॅन दर बर्ग हा हस्तिदंताचा व्यापारी सफर घेऊन आफ्रिकेच्या जंगलात जातो. त्याचा मार्गदर्शक शिकारी असतो कॉर्नेल वाईल्ड. स्थानिक रिवाजांची माहिती नसलेला व्यापारी टोळीवाल्यांचा अपमान करतो. यामुळे चिडून जाऊन ते सफरीच्या सगळ्या लोकांना पकडून नेतात आणि एकेकाचा अनन्वित छळ करून मारून टाकतात. कॉर्नेलच्या नोकराचे हात व पाय मागे एकत्र बांधून त्याला उड्या मारायला लावतात व खाली पडताच चेचून टाकतात तर व्यापाऱ्याला जमिनीला पोटावर बांधून त्याच्या तोंडासमोर धगधगत्या आगीच्या वर्तुळात जातिवंत सर्प सोडतात. पिसाळलेला सर्प त्याला डसतो व तो तडफडून मरतो.

अखेरीस उरतो कॉर्नेल वाईल्ड. याची वाट लावण्याची नवी तऱ्हा ते काढतात. वाईल्डला नग्न, निःशस्त्र करून ते पळायला लावतात व दहा सिंहांना भारी असलेल्या या जमातीतील प्रत्येकजण त्याचा पाठलाग करतो.

शिकारी शिकार बनतो त्याची ही कथा पडद्यावर घेतली आहे चांगल्या तऱ्हेने पण अनेक संकटांना तोंड देत देत केलेल्या पलायनातील साहसाचा प्रभाव चित्रपट पाहिल्यानंतर मनावर राहत नाही. याला मुख्य कारणे दोन. एक तर त्याच्यावर ओढवणाऱ्या संकटांत वैविध्य नाही आणि दुसरे म्हणजे जंगली श्वापदांचे जीवन दाखविण्याची (निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता सबकुछ असलेल्या) कॉर्नेल वाईल्डची हौस. यांमुळे सततचा परिणाम टिकून राहत नाही. सरळ छातीत भाला घुसल्याचे काही भेदक देखावे, बऱ्याच दिवसांनी पाणी मिळाल्यानंतरच्या आनंदाचे प्रसंग चांगले वाटतात. पण श्वास रोखून धरणारे, उत्कंठावर्धक वगैरे सगळे झूटच. ● ●

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक २२ ते २९ ऑक्टोबर १९६६

**मेष** :–आपला राश्याधिपती सुस्थितीत आहे. परंतु या सप्ताहात रवीचे परिभ्रमण मात्र प्रतिकूल आहे. त्यामुळे कुटुंबात अशांतता निर्माण होऊन पत्नीच्या बरोबर खटके उडतील. पत्नीच्या प्रकृतीस त्रास होईल. तसेच या सप्ताहात आर्थिक टंचाई भासेल. प्रवास बिलकुल करू नये. नोकरीत अडीअडचणी निर्माण होतील. कामाचा ताण फार वाढेल. अपघाताचा योग आहे. विद्यार्थ्यांत विद्येचे लक्ष लागणार नाही. मानसिक स्थिती बिघडेल. वडील घराण्यातील थोर व्यक्तींस त्रास होऊन अशुभ घटना घडण्याचाही योग आहे. " नको हा संसार " अशीच मनाची समजूत होईल. दिनांक २६–२७ तारखांस प्रतिकूल घटना.

**वृषभ** :– आपला राश्याधिपती या सप्ताहात स्वगृही असल्यामुळे प्रकृतिस्वास्थ्य चांगले लाभेल. नोकरी व्यवसायात मात्र आर्थिक अडचणी निर्माण होतील. या सप्ताहात आपल्या मातुल घरातील कोण्यातरी व्यक्तीस विशेष त्रासाचा योग आहे. मंगळाच्या प्रतिकूलतेमुळे घरात पूर्णत: शांतता लाभणार नाही. दिनांक २९–३० मनाविरुद्ध घटना घडतील. सासुरवाडच्या माणसांची ये-जा होऊन त्यामध्ये अमाप द्रव्यखर्च होईल. स्थावराबाबत व कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. दिनांक २६ व २७ या तारखा शुभ असून त्या दिवशी नवीन कार्य किंवा व्यवहार करण्यास हरकत नाही. त्यामध्ये यश मिळण्याचा संभव.

**मिथुन** :– आपल्या राशीच्या पंचमातून दोन–चार ग्रहांचे परिभ्रमण होत आहे. राशिस्वामी शुभ स्थितीत आहे. गुरू–मंगळाचेही साहाय्य आहे. त्यामुळे आपणांला कोणत्याही कार्यात यश मिळेल. पत्नीच्या नावे काही व्यवहार केल्यास फायदा होईल. सासुरवाडीस मानसन्मानाचाही योग. दिनांक २९ आणि ३० या तारखा आपणांस फारच अनुकूल आहेत. मनाजोग्या घटना घडतील. मित्रांचे सहकार्य लाभल. व्यापाऱ्यांस त्यांनी केलेल्या जुन्या व्यवहारात फायदा होईल. कवी, लेखक, नाट्य-चित्रव्यावसायिक यांना हा सप्ताह आर्थिकदृष्टया फायद्याचा जाईल. ३१ व १ ह्या तारखा अशुभ आहेत. विद्यार्थ्यांस विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. महिलांना त्यांचे हट्ट पूर्ण करून उत्तम रीतीने इच्छित मनोरथ पूर्ण करतील.

**कर्क** :– आपल्या राशीस गुरूची पूर्ण अनुकूलता आहे. परंतु इतर ग्रहांची प्रतिकूलता असल्यामुळे कौटुंबिक व आर्थिक अडचणी निर्माण होतील. या सप्ताहात आपल्या कुटुंबात कोणी ना कोणी आजारी पडून द्रव्यखर्च होईल. सासुरवाडीच्या थोर व्यक्तीस त्रासाचा विशेष योग. दिनांक २४ व २५ या तारखा प्रतिकूल असल्यामुळे विरोधी घटना घडतील. आपण योजिलेल्या कार्यात विघ्ने येऊन ती लांबणी-

वर पडतील म्हणून वाईट काळ संपेपर्यंत थोडे थांबा. द्रव्याचा अपव्यय होईल, दिनांक २६–२७ व ३१ ह्या तारखास चंद्रबळ असल्याने नेटाने प्रयत्न केल्यास अडचणी दूर होऊन त्यात थोडेफार यश मिळेल.

**सिंह :–** आपल्याला फक्त मंगळाचीच अनुकूलता आहे. बाकी इतर सर्व ग्रह प्रतिकूल आहेत. उष्ण विकारांपासून तब्येतीस त्रास स्वतःच्या प्रकृतीस जपावे. भावास अकस्मात त्रासाचा योग आहे. पैशाचे देण्या-घेण्याचे व्यवहारात आपणांस पूर्ण दक्षता घेतली पाहिजे. अकारण कोणा व्यक्तीकडून पैशाच्या बाबतीत फसण्याचा योग आहे. ज्यांना तुम्ही आपले म्हणता ते आपणास ऐनवेळी दगा देतील. कुणाच्याही आर्थिक व्यवहारात आपण पडू नये. जामीन तर राहू नयेच. कारण निष्कारण अपवाद व ठपका येण्याचा संभव आहे. दिनांक २६ व २७ प्रतिकूल आहेत. जपून असावे! विद्यार्थ्यास विद्याभ्यासात अडचणी निर्माण होतील.

**कन्या :–** आपणांस १२ वा मंगळ आहे व धनस्थानात चार ग्रहांची बैठक आहे. याचा विचार करता फक्त गुरूच अनुकूल आहे. नोकरीत अडचणी. पत्नीच्या तब्येतीस त्रास. नेहमीच्यापेक्षा जास्त प्रमाणात कुटुंबामध्ये द्रव्यखर्च होईल. त्यामुळे मानसिक स्थिती बिघडेल. दिनांक २९, ३० प्रतिकूल असल्यामुळे कोणतेही व्यवहार न करता शांततेने दिवस घालवा. भगिनींचे बाबतीत पत्नीला आर्थिकदृष्टया त्रास. प्रवास टाळावा. वाहनांपासून जपावे. दिनांक २६, २७ व ३१ या तारखांस काही अनुकूल घटना घडतील. प्रतिकूल ग्रहांच्यामुळे स्वभाव तापट बनेल. वाद–विवाद व विरोधाचे प्रसंग येतील. कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. व्यापाऱ्यांना धंद्यात नुकसान सहन करावे लागेल.

**तूल :** आपला राश्याधिपती शुभ स्थितीत आहे. दशमात गुरू, लाभात मंगळ अशी ग्रहांची बैठक असल्यामुळे आपणांस काय कमी आहे ? रघुनाथाच्या कृपेमुळे आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील. प्रेमी–प्रेमिकांच्या प्रेमाला उधाण येईल. दिवस केव्हा जातील, असे त्यांना होईल. अविवाहितांचे विवाह होतील. व्यापाऱ्यांना उत्तम प्रकारे फायदा होईल. दि. २९, ३० ह्या तारखा शुभ असल्यामुळे मनाजोग्या घटना घडतील. पत्नी मनाजोगी वागून तिचे पूर्ण सहकार्य मिळेल. साहित्यिक, शास्त्रज्ञ कलावंत यांना हा सप्ताह फार चांगला आहे. घरात आनंदी वातावरण राहील. हाताखालची माणसे मनाप्रमाणे वागतील. एकंदरीत हा सप्ताह आपणांस शुभ आहे.

**वृश्चिक :** भाग्यात गुरू, दशमात मंगळ असे दोन ग्रह आपणांस पूर्णतः अनुकूल आहेत. तथापि सर्व ग्रहांची पूर्णतः अनुकूल स्थिती नसल्यामुळे अडीअडचणी येऊन मग मार्ग दिसेल. प्रकृतीस मात्र अधूनमधून त्रास होईल. घरातील थोर व्यक्तीस त्रास. अचानक बदलीचा येईल. पत्नीच्या प्रकृतीस जपा. दिनांक २६, २७ व ३१ ह्या तारखा शुभ आहेत. म्हणून मनाजोग्या घटना घडून येतील. विद्यार्थ्यांना विशेष अडथळे येतील. कारण मनाची एकाग्रता साधणार नाही. खाणेपिणे–चैन व शुभ कार्यात विशेष

द्रव्यखर्च होईल. भावाच्या प्रकृतीस अग्निपासून किंवा वाहनांपासून भिती आहे.

**धनू** : गुरू सोडून आपणांस बाकी सर्व ग्रहांची अनुकूलता आहे. लाभस्थानात चार ग्रहांची बैठक या वेळेस आहे त्यामुळे आपण योजिलेल्या कार्यात यश मिळून अर्थप्राप्ती पण भरपूर प्रमाणात होईल. नोकरीत बढती मिळून वरिष्ठांची मर्जी संपादाल. ज्यांना उद्योग-व्यवसाय नाही, त्यांना नोकरी मिळेल. दिनांक २९ आणि ३० या तारखा आपणांस फार शुभ आहेत. या तारखांस कोणत्याही कार्यांत आपणांस निश्चित यशप्राप्ती मिळेल. व्यापाऱ्यांस अकस्मात लाभाचा संभव. जुने असलेले येणे वसूल होतील. सावधपणे व्यवहार केल्यास हळूहळू परिस्थितीत सुधारणा होईल. श्वशुरगृही धार्मिक कार्य होऊन आपला त्यात द्रव्यखर्च होईल. विद्यार्थ्यांस विद्येत चांगली प्रगती.

**मकर** : आपला राशिस्वामी वक्री आहे, व तो मंगळाने दृष्ट आहे. त्यामुळे आपल्याला प्रकृतीस चांगले जपावे लागेल. प्रवास शक्यतो टाळावा. वाहनांपासून जपावे. नोकरी व्यवसायात अडचणी निर्माण होतील. अकस्मात त्रास आणि कमीपणा पण स्वीकारावा लागेल. कुटुंबात कोणीतरी अकस्मात आजारी पडेल. मनाविरुद्ध बऱ्याच घटना घडतील. कोणालाही सहकार्य देण्याच्या किंवा कोणाकडूनही सहकार्य घेण्याच्या भानगडीत पडू नका. कारण, अकारण फसगत होण्याचा संभव. दि. २६ व २७ या तारखा साधारणतः शुभ आहेत. त्यामुळे प्रयत्न केल्यास काही फळ मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यात त्रास. २९–३० प्रवासाचा योग आहे.

**कुंभ** : या सप्ताहात आपणांस पुष्कळशा ग्रहांची अनुकूलता आहे. भाग्यस्थानात चार ग्रहांची बैठक आहे. ती आपणांस फारच शुभ आहे. त्यामुळे अकस्मात शुभ घटना घडतील. दिनांक २९ व ३० या तारखा शुभ असल्यामुळे बरेच दिवस रेंगाळत पडलेली कामे पूर्ण निकालात निघतील. प्रवासाचाही योग आहे. प्रकृतीस मात्र अधून मधून त्रासाचा योग आहे. त्यामुळे विशेष लक्ष द्यावे. दिनांक ३ नंतर आपणांस शनिमहाराज पुन्हा अनुकूल स्थितीत येत आहे त्यामुळे उद्योगव्यवसायात अनुकूल वातावरण व बढतीचा पण योग आहे. विद्यार्थ्यांस विद्याभ्यासात चांगली प्रगती व यशप्राप्ती होईल. व्यापाऱ्यांना हलक्या वस्तूंपासून धनप्राप्तीचा योग. महिलांचे संसारसौख्यात अधून मधून त्रासाचा योग.

**मीन** : आपल्या राशीस गुरूचे पूर्णतः साहाय्य आहे. परंतु रवीसारखा तेजस्वी ग्रह प्रतिकूल असून त्याच्या जोडीला बुध-शुक्रही प्रतिकूल आहेत. त्यामुळे उद्योग-व्यवसायात अडीअडचणी निर्माण होतील. पायास दुखापतही होण्याचा योग आहे. कोणत्याही प्रकारे नवीन देण्याघेण्याचे आर्थिक व्यवहार करू नयेत. नाही तर विनाकारण अपवाद व ठपक्याचा योग आहे. नोकरीत अडचणी व वरिष्ठांशी मतभेद होतील. विद्यार्थ्यांना हा सप्ताह अनुकूल आहे. ग्रहांच्या प्रतिकूलतेचे प्रमाण कमी होण्याकरिता जगन्मातेची उपासना करावी म्हणजे सर्व संकटें निवारण होऊन मार्ग दिसेल. या सप्ताहात साडेसातीची आठवण होईल.

● ● ●

# माणूस

पुढील अंकी

## एक खास मुलाखत

कामगार नेते


## जॉर्ज फर्नांडिस

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणे ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**